
पुणे, शनिवार, २२ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 114 • वर्ष ४ थे, अंक ११४ • किंमत ₹ ६ • पाने : १२



जमिन मोजणीच्या वशीलेबाजीला 'लगाम'..!

P३

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



१२ आजपासून आयपीएलचा थरार!

## At a Glance

### अवैध शस्त्रपुरवठा रॅकेटचा पर्दाफाश

**आग्रा :** आग्रा पोलिसांनी अवैध शस्त्रपुरवठा रॅकेटचा पर्दाफाश केला असून या भागात शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणाऱ्या मास्टरमाइंडसह सहा जणांना अटक केली आहे. सहायक पोलिस आयुक्त विनायक भोसले यांच्या नेतृत्वाखाली सदर पोलिस, एसओजी आणि निगराणी पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत गुरुवारी पाच पिस्तूल, पाच देशी बनावटीची हत्यारे, २१२ काडतुसे आणि एक रायफल आणि एक पिस्तूल अशी शस्त्रे जप्त करण्यात आली.

### मंदिरासाठी सत्ता गेली तरी हरकत नाही

**नवी दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिरासाठी सत्ता गमवावी लागली तरी हरकत नाही, असे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे. अयोध्येत लिटरेचर फेस्टिव्हल सुरू केल्यानंतर आपल्या भाषणात आदित्यनाथ यांनी २०१७ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर राम मंदिरावरील आपला विकास आणि राम मंदिरावरील विश्वासाचा उल्लेख केला.


# दहशतवादावरून घणाघात

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा संसदेत काँग्रेसवर प्रहार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी राज्यसभेत जम्मू-काश्मीरमधील दहशतवादावरून मागील काँग्रेस प्रणित संपुआ सरकारवर हल्ला बोल केला. ते म्हणाले की, १० वर्षांपूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा गौरव करण्यात आला होता, त्यांच्या अंत्ययात्रा काढण्यात आल्या. आमच्या काळातही दहशतवादी मारले गेले आणि मारले गेले. मात्र, अंत्ययात्रा कधीही काढली गेली नाही. मारला गेलेला दहशतवादी तिथेच दफन केला जातो.

अमित शहा म्हणाले की, पूर्वी दहशतवादी शेजारच्या देशातून काश्मीरमध्ये घुसून बॉम्बस्फोट घडवून आणत असत. प्रत्येक सणाला खोऱ्यातील जनतेसाठी चिंता उत्पन्न होत होती. काँग्रेस सरकारच्या



धोरणांमुळे दहशतवादाला प्रोत्साहन मिळाले. काँग्रेसने अल्पसंख्याकांचे अनुनय करण्याचे जे धोरण राबवले होते, व्होट बँकेसाठी जे तुष्टीकराचे धोरण अवलंबले, त्याचाच हा परिणाम होता. मात्र, पंतप्रधान मोदी यांच्या आगमनानंतर दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुतेचे धोरण अवलंबण्यात आले आहे.

संसदेत अमित शाह म्हणाले की, यूपीए (संपुआ) राजवटीत ३३ वर्षे जम्मू-काश्मीरमध्ये चित्रपटगृहे उघडली गेली नाहीत, ती भाजप सरकारच्या काळात उघडली गेली. ताजियाच्या मिरवणुकीला परवानगी नव्हती, ती आमच्या काळात देण्यात आली होती. जी-२० शिखर परिषदे दरम्यान जगभरातील राजदूतांनी जम्मू-काश्मीरमधील खाद्यपदार्थ, संस्कृती, सौंदर्याचा शांततेत आनंद लुटला. कलम ३७० हटवून मोदी सरकारने भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्यांचे एक घटना, एक झेंडा हे स्वप्न पूर्ण केले आहे.

ते म्हणाले की, संपूर्ण जगात दोनच देश असे आहेत जे आपल्या सीमेसाठी आणि लष्करासाठी सदैव तत्पर असतात. इस्रायल आणि अमेरिका. पंतप्रधान मोदींनी या दोन देशांच्या यादीत भारताचे नाव जोडले आहे. तिथूनच दहशतवादाविरोधात 'झिरो टॉलरेंस'चे धोरण सुरू झाले. जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, ईशान्य भारतातील बंडखोरी आणि डाव्या विचारसरणीचा अतिरेकी या तीन गोष्टी देशाच्या विकासात अडथळा आणत होत्या; या कारणांमुळे ९२ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता, असे त्यांनी सांगितले.

### दहशतवादी घटनांमध्ये घट

- मोदी सरकारच्या काळात जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी घटनांमध्ये होणाऱ्या मृत्यूंमध्ये ७० टक्क्यांनी घट झाली आहे. दहशतवादी घटनाही झपाट्याने कमी झाल्या आहेत. याशिवाय आकर्षक औद्योगिक धोरणामुळे जम्मू-काश्मीरमध्ये १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली, १.१ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. मोदी सरकारने उरी आणि पुलवामा हल्ल्याला १० दिवसांत सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक करून पाकला चोख प्रत्युत्तर दिले. त्याचबरोबर ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद संपुष्टात येईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

# दिशा प्रकरणी आदित्य ठाकरेंना मोठा धक्का



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दिशा सालियानचे वडील सतीश सालियान यांनी आपल्या मुलीचा मृत्यू आणि उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव आणि महाराष्ट्राचे माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कथित सहभागाची नव्याने चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्वीकारली.

**याचिका**

दिशा सालियानच्या वडिलांनी दाखल केलेली रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीकडे सादर करण्यात आली असून पुढील आठवड्यात या प्रकरणाची तातडीची सुनावणी होण्याची शक्यता आहे. सतीश सालियान यांचे वकील नीलेश ओझा यांनी सांगितले की, पुढील आठवड्यात सोमवार किंवा मंगळवारी तातडीच्या सुनावणीसाठी या प्रकरणाचा उल्लेख केला जाईल.

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियानचे वडील सतीश सालियान यांनी आपल्या मुलीच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनंतर १९ मार्च रोजी मौन सोडले आणि तिने आत्महत्या केली नव्हती आणि ही हत्या असल्याचा दावा केला होता.

सतीश सालियान यांनी आपल्या मुलीची हत्या झाल्याचा दावा केला असून, या प्रकरणाची नव्याने चौकशी व्हावी आणि आदित्य ठाकरे यांच्या कथित भूमिकेचीही चौकशी व्हावी, अशी मागणी

» पान ७ वर

# छत्रपती शिवरायांचे आग्रा येथे भव्य स्मारक; झाला शासन निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीला ३९५ वर्ष पूर्ण झाली. यानिमित्ताने आग्रा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिले होते की, आग्रा शहरात ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना नजरकैदेत ठेवले होते, ती वास्तू महाराष्ट्र शासनामार्फत अधिग्रहीत करून तेथे भव्य स्मारक उभारण्यात येईल. त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येईल. मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेनंतर आता यासंबंधीचा शासन निर्णयही काढण्यात आला आहे.

मराठा साम्राज्याने सतराव्या आणि अठराव्या शतकात भारताच्या विविध ठिकाणी आपले साम्राज्य



निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करुन रयतेचे राज्य निर्माण केले. हे राज्य निर्माण करण्यासाठी महाराजांना अनेक कष्टप्रद आव्हाने स्वीकारावी लागली. प्रसंगी काही ठिकाणी माघार सुध्दा घेऊन तह करण्यात आले.

» पान ७ वर

### पर्यटकांसाठी प्रेरणास्थान..

- अशा या ऐतिहासिक आणि महाराष्ट्रीयन अभिमानाच्या बाबी मराठी पर्यटक आग्रा येथे गेल्यानंतर ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेच्या ठिकाणी राहीले त्या ठिकाणी आवर्जून जाण्याचा प्रयत्न करतो, मात्र या ठिकाणी कोणतीही ऐतिहासिक बाब, स्मारक, संग्रहालय नसल्याकारणाने या पर्यटकांना माहिती समजत नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्यदैवत आहेत. त्यांनी महाराष्ट्राच्या बाहेर अशाप्रकारचा अत्यंत दुर्मिळ असा केलेला पराक्रम ही इतिहासातील अत्यंत महनीय आणि अभ्यासपूर्ण बाब आहे.

### दैदिप्यमान इतिहासाचे जतन

- आजही मराठीसह इतर सर्व इतिहास संशोधक या बाबीचा अभ्यास करत आहेत. ही घटना लक्षात घेता आणि मराठा साम्राज्याच्या पताका डौलाने फडकविल्या गेल्या होत्या अशा त्या महान वीरांच्या पराक्रमाची साक्ष देणारी बरीच स्थळे महाराष्ट्राच्या बाहेर अपरिचित आहेत. अशा स्थळासाठी आणि त्या दैदिप्यमान इतिहासाचे उदात्तीकरण आणि तो वारसा पुढच्या पिढयांकडे कायम रहावा, त्या स्थळांची, त्या वारशांची जतन, सवंर्धन आणि विकास करण्याकरिता शासनाने इतर राज्यातील अशी स्थळे सुध्दा विकसित करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

## जयकुमार गोरेंवर आरोप करणाऱ्या महिलेस अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून भाजप नेते आणि राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर एका महिलेने अश्लील फोटो पाठवल्याचा आरोप केला होता. याप्रकरणी आता धक्कादायक माहिती समोर आली असून गंभीर आरोप करणाऱ्या महिलेने अश्लील फोटो पाठवल्याचे प्रकरण मिटवण्यासाठी तीन कोटी रुपयांची खंडणी मागितली असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी आता सातारा पोलिसांनी एक कोटी घेत असताना संबंधित महिलेला अटक केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, २०१६ मध्ये काँग्रेसमध्ये असताना संबंधित महिलेला जयकुमार गोरे यांनी वादग्रस्त फोटो पाठवला होता. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता,अटक टाळण्यासाठी त्यांनी मुंबई हायकोर्टात धाव

» पान ७ वर

# कर्नाटकात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण; विधानसभेत गोंधळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** मुस्लिम आरक्षणाच्या मुद्यावरून कर्नाटक विधानसभेत प्रचंड गोंधळ पाहायला मिळाला. कर्नाटक सरकारकडून सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याची घोषणा करण्यात आली आहे. यासंदर्भातील विधेयकाला मंजूरी मिळाली आहे. मात्र, भाजप आमदारांकडून या विधेयकाला जोरदार विरोध करण्यात आला.

विरोध करताना आमदारांकडून विधेयकाच्या प्रती देखील विधानसभेच्या अध्यक्षांवर भिरकावण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. भाजप आमदारांनी विधेयकाला विरोध करताना गोंधळ घातल्याने विधानसभा अध्यक्ष यूटी



खदार यांनी मार्शल बोलावून या आमदारांना सदनातून बाहेर काढले. विधानसभा अध्यक्षांनी कारवाई करत भाजपच्या १८ आमदारांना पुढील सहा महिन्यांसाठी विधानसभा कार्यवाहीतून निलंबित केले आहे.

विधानसभा अध्यक्षांनी आमदारांनी पदाचा अनादर केल्याचा आरोप करत १८ आमदारांना निलंबित केले. त्यानंतर मार्शलने निलंबित भाजपला थेट खांद्यावर उचलत बाहेर नेले.

» पान ७ वर



"राहुल गांधी हे राजकीयदृष्ट्या अयोग्य आहेत, म्हणूनच ते तुष्टीकरणाच्या माध्यमातून त्यांच्या महत्वाकांक्षांना पुढे ढकलण्याचा प्रयत्न करत आहेत. जे आरक्षण आज ४ टक्क्यांपासून सुरू झाले आहे, ते एक दिवस १०० टक्के करण्याची त्यांची इच्छा आहे. वक्फ बोर्ड हा 'लँड जिहाद' होता आणि हे 'कॉन्ट्रॅक्ट जिहाद' आहे. कर्नाटकमधील बजेट हे 'मुस्लिम बजेट' आहे."

**— संबित पात्रा,** भाजप प्रवक्ते

## उद्धव ठाकरेंसोबत युती नाहीच : देवेंद्र फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना, उद्धव ठाकरे यांच्यासोबत पुन्हा युती होण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. उद्धव ठाकरे यांनी आमच्याशी सर्व संबंध तोडले आहेत. म्हणजेच आमच्यात मारामारी नाही, पण समोर आल्यास नमस्कार-चांगले बोलणे एवढंच आहे, असे फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

लाडके ठाकरे कोण – उद्धव की राज? या प्रश्नावर फडणवीसांनी थेट उत्तर टाळत मिश्किल टोला लगावला. ठाकरे असे आहेत की, आम्ही त्यांना लाडके म्हणायचे आणि ते आम्हाला दोडके म्हणायचे. त्यामुळे या भानगडीत कशाला पडायचे? गेल्या पाच वर्षांत उद्धव ठाकरेंसोबत संबंध राहिलेला नाही,

» पान ७ वर

**विधिमंडळात प्रथमच पती-पत्नीची जोडी**

# नवनिर्वाचित आमदारांनी घेतली शपथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधान परिषद पोटनिवडणुकीच्या ५ जागांसाठी येत्या २७ मार्च रोजी निवडणूक होणार होती. या निवडणुकीसाठी ६ उमेदवारांनी अर्ज केले होते. मात्र अपक्ष उमेदवाराकडे आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणि नोटरी नसल्याने त्यांचा अर्ज बाद करण्यात आला. तसेच विरोधकांकडून कोणताही अर्ज आला नसल्यामुळे महायुतीचे ५ उमेदवार निवडणूक न होताच विधान परिषदेवर बिनविरोध निवडून गेले. यानंतर आज या पाचही नवनिर्वाचित आमदारांनी विधान परिषदेत शपथ घेतली.

गेल्या वर्षी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे आमश्या पाडवी (अक्कलकुवा), राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राजेश विटेकर (पाथरी) तर भाजपचे प्रवीण दटके (नागपूर मध्य), गोपीचंद पडळकर (जत) आणि रमेश कराड (लातूर ग्रामीण) हे निवडून आल्याने विधानपरिषदेतील या पाच जागा रिक्त झाल्या होत्या. या रिक्त जागांसाठी निवडणूक आयोगाने पोटनिवडणूक घोषित केली आहे. प्रत्येक पोटनिवडणूक स्वतंत्र होणार असल्याने आणि सत्ताधारी महायुतीचे विधानसभेतील प्रचंड संख्याबळ पाहता या पोटनिवडणुकीत विरोधी महाविकास आघाडीला संधी नव्हती.

विधान परिषद पोटनिवडणुकीसाठी २७ मार्च रोजी निवडणूक होणार होती. या निवडणुकीसाठी भाजपाच्या वतीने संदीप जोशी, संजय केनेकर, दादाराव केचे, शिवसेना शिंदे गटाकडून चंद्रकांत रघुवंशी, तर अजित पवार गटाकडून संजय खोडके यांनी उमेदवारी अर्ज सादर केले होते. सहाव्या उमेदवाराने अपक्ष म्हणून अर्ज भरला होता. मात्र, अपक्षाच्या अर्जावर सूचक आणि अनुमोदक म्हणून

» पान ७ वर

### खोडके दाम्पत्याची चर्चा

- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या संजय खोडके यांच्या उमेदवारीच्या निमित्ताने विधिमंडळात प्रथमच पती-पत्नी एकत्र दिसणार आहेत.
- संजय खोडके यांच्या अर्धांगिनी सुलभा खोडके या पंधराव्या विधानसभेत अमरावती मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यामुळे पती-पत्नी एकाचवेळी विधिमंडळाचे सदस्य असण्याचा योग जुळून आला आहे.
- यापूर्वी विधिमंडळात वडील-मुलगा, भाऊ-भाऊ अशा जोड्या कार्यरत राहिल्या आहेत.

## एसएससी बोर्ड पुर्णत: बंद पाडण्याचा डाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी गुरुवारी केली होती. शिक्षणमंत्र्यांनी केलेल्या या घोषणेनंतर राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात वेगवेगळ्या चर्चांना सुरुवात झाली होती. दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांनी या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच या माध्यमातून राज्याचा एसएससी बोर्ड पूर्णत: बंद करण्याचा डाव या सरकारने आखला आहे असा आरोपही त्यांनी केला आहे.

यासंदर्भात सोशल मीडियावर प्रसारित केलेल्या आपल्या प्रतिक्रियेमध्ये सुप्रिया सुळे यांनी लिहिले की,

» पान ७ वर

# शिवराज पाटील-मोदींची सदिच्छा भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची सहकुटुंब सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, सुषा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर आणि कुटुंबीय उपस्थित होते. जवळपास तासभर झालेल्या या भेटीत विविध विषयांवर चर्चा झाली.

या भेटीबाबत बोलताना डॉ. अर्चना पाटील चाकूरकर म्हणाल्या की, शिवराज पाटील चाकूरकर यांच्यासमवेत पंतप्रधानांची झालेली ही सदिच्छा भेट आम्हा सर्वांना ऊर्जा देणारी ठरली.

डॉ. चाकूरकर म्हणाल्या की, केंद्र सरकारच्या शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत ६ ते १४ वयोगटातील



सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचे धोरण आहे. या कायद्याद्वारे दहावीपर्यंतचे शिक्षण म्हणजे ६ ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत देण्यात यावे, अशी आग्रही मागणी केली. त्याला पंतप्रधानांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, यावेळी पंतप्रधानांना लातूर भेटीचे निमंत्रणही दिले. जवळपास तासभर चाललेल्या

» पान ७ वर

# अतिमुसळधारचे राज्यावर सावट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हवामान**

**पुणे :** देशात पुन्हा एकदा हवामान विभागाकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वादळी वा-यासह जोरदार पावसाची शक्यता आहे. आयएमडीने वर्तवलेल्या अंदाजानुसार ५० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच पुन्हा एकदा हवामान विभागाकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

आयएमडीने दिलेल्या इशा-यानुसार पुढील दोन दिवस पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रामध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राजस्थानमध्ये देखील पावसाचा इशारा देण्यात आसा असून, हवामान विभागानं जारी केलेल्या इशा-यानुसार राजस्थानच्या अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. राजस्थानमध्ये देखील पावसाचा इशारा देण्यात आसा असून, हवामान विभागानं जारी केलेल्या इशा-यानुसार राजस्थानच्या अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार दिल्लीमध्ये या काळात जोरदार वारं वाहणार असून तापमान ३४ अंश सेल्सिअसपर्यंत राहणार आहे. तर झारखंडमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्राबाबत

» पान ७ वर

# पुणेकर अनुभवणार शास्त्रीय नृत्यकलेचा अद्भूत आविष्कार

**नृत्यगुरु पंडिता रोहिणी भाटेंना ५०० पेक्षा जास्त नृत्यांगनांची आदरांजली**



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणेकरांना कथ्थक, सत्रीय, ओडिशी आदी शास्त्रीय नृत्यकलेचा अद्भूत अविष्कार अनुभवायला मिळणार असून, जवळपास ५०० पेक्षा जास्त नृत्यांगना नृत्यगुरु पंडिता रोहिणी भाटे यांना आदरांजली वाहणार आहेत. येत्या २२ आणि २३ मार्च रोजी कोथरुडमधील शुभारंभ लॉन्स येथे या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शास्त्रीय नृत्य हा भारतीय सांस्कृतिचा अविभाज्य भाग आहे. प्राचीन काळापासून भारतातील शास्त्रीय नृत्य प्रकारांना एक शिस्त आणि कलेच्या माध्यमातून ईश्वराला समर्पित करण्याचा मार्ग म्हणून शास्त्रीय नृत्य कलेला ओळखले जाते. कथ्थक, भरतनाट्यम्, कुचीपुडी, ओडिसी, कथकली, मोहिनीपट्टणम्, मणिपुरी या भारतीय शास्त्रीय नृत्याच्या विविध शैली असून, या सर्व शैली पुणेकरांना एकाच व्यासपीठावर अनुभवता येणार आहेत.

नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून आणि शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्था पुणे यांच्या माध्यमातून कोथरुडमध्ये २२ आणि २३ मार्च रोजी सायं. ५.३०. वा. शुभारंभ लॉन्स पंडिता रोहिणी भाटे नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, हैदराबादच्या ज्येष्ठ शास्त्रीय नृत्यांगना पद्मश्री आनंद शंकर जयंत आणि कथ्थक उस्ताद निरुपमा आणि राजेंद्र आदींसह जवळपास ५०० पेक्षा जास्त शास्त्रीय नृत्य कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

तसेच, या महोत्सवानिमित्त नृत्य गुरु शमा भाटे, गुरु मनीषा साठे, गुरु सुचेता चापेकर या देखील मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.



शास्त्रीय नृत्य हा भारतीय सांस्कृतीचा कलेचा अविभाज्य भाग असल्याने जागतिक स्तरावर ही भारतीय शास्त्रीय नृत्याला एक आदराचे स्थान आहे. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजींच्या परदेश दौऱ्यावेळी देखील भारतीय शास्त्रीय नृत्य कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वागत केले जाते. तसेच, अनेक परदेशी नागरिक देखील भारतीय शास्त्रीय नृत्य कलेवर अध्ययन करत आहेत. त्यामुळे भारतीय संस्कृतीचे आणि शास्त्रीय नृत्य कलेचे अद्भूत दर्शन अनुभवण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. तरी सदर कार्यक्रमास पुणेकरांनी अवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन ना. पाटील यांनी यानिमित्ताने केले आहे.

» पान ७ वर

# बड्या सोसायट्यांचा पालिकेला 'कात्रजचा घाट...!

## महापालिकेचे आदेश बासनात; नियमापेक्षाही पाण्याचा अतिरिक्त वापर



**पुणे :** महापालिकेकडून पाणीपुरवठ्याचे झोन पूर्ण झाल्यानंतर संबंधित झोनमध्ये होणारी गळती शोधली जाणार आहे. महापालिकेने टाकीवरून सोडलेले पाणी, मुख्य जलवाहिन्या, जोड जलवाहिन्यांना आणि सोसायट्यांना मीटर लावले आहेत. त्यामुळे टाकीतून पाणी सोडल्यानंतर संबंधित परिसरात मीटरवर झालेल्या नोंदीनुसार तेवढेच पाणी जात आहे की, कमी पाणी जात आहे याची तपासणी केली जात आहे. त्यानुसार, ज्या जलवाहिनीवर पाण्याची गळती आहे, अशा जलवाहिन्या बदलण्यात येणार आहेत.

महापालिकेकडून समान पाणी योजने अंतर्गत शहरातील सोसायट्या तसेच स्वतंत्र निवासी मिळाकतींना पाण्याचे मीटर बसविण्यात आले आहेत. पाणी वापर मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अशा सोसायट्या, घरांना पाण्याचा वापर कमी करण्याच्या नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. मात्र, त्यानंतरही या सोसायट्या पालिकेच्या नोटीसांना जुमानत नसल्याने आता नोटीस पाठविण्यापेक्षा थेट त्यांचा पाणीपुरवठाच बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, तातडीने टाक्यांची गळती तसेच पाणी नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

महापालिकेकडून शहरात समान पाणी योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत पालिकेकडून शहरातील पाणीपुरवठ्याचे १४१ झोन तयार करण्यात आले आहेत. त्यातील ४७ झोन तयार झाले आहेत. तर, ४१ झोनमध्ये मीटरद्वारे मुख्य टाकीतून सोडण्यात आलेले पाणी, सोसायटीच्या टाकीत पडलेले पाणी याची मोजणी केली जात आहे.



बहुतांशी सोसायट्यांचा आणि चाळींचा पाण्याचा वापर प्रमाणापेक्षाही कितीतरी अधिक पटींनी अधिक आहे; त्यांना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. तरीही त्यांचा हा वापर कमी न झाल्यास त्यांचा पाणीपुरवठा बंद करण्याची प्रक्रिया प्रशासनाच्या वतीने सुरु करण्यात येणार आहे, त्यामध्ये कोणाचीही गय केली जाणार नाही.

**-नंदकिशोर जगताप,** प्रमुख पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपा

### असा होतोय पाण्याचा गैरवापर...!

- प्रती व्यक्ती १३५ ली. प्रमाणे सोसायटीने पाणी घेणे आवश्यक आहे
- काही सोसायट्यांचा पाणी वापर ५०० ते ६०० ली. पेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे
- बहुतांशी सोसायट्यांच्या टाक्यांमध्येच पाणी गळती
- टाकी भरल्यानंतर पाणी बंद करणारी यंत्रणा नसणे
- टाकी भरल्यानंतरही पाणी बंद केले जात नसल्याचे प्रकार
- अशा सोसायट्यांना महापालिकेने जादा पाणी वापराच्या नोटीसा
- पाणी वापर कमी करावा तसेच पाण्याची गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना
- त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने संबंधितांचा पाणीपुरवठा बंद करण्याबाबत प्रशासनाकडून चर्चा सुरू

## राष्ट्रीय लोक अदालतीचे आज आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवारी (ता. २२) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये मिळकतकर थकबाकीदारांना दंडात ०.५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. यामध्ये वीजचोरी आणि कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित ग्राहकांची दाखलपूर्व व न्यायालयात प्रलंबित प्रकरणेही तडजोडीच्या माध्यमातून लोकअदालतीत निकाली काढता येणार आहेत.

लोकअदालतीत पुणे महापालिकेच्या मिळकतकराची थकीत प्रकरणे निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. त्यासाठी थकबाकीदारांनी शिवाजीनगर न्यायालयातील विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय वीजचोरीसंदर्भात न्यायालयात दाखल प्रकरणात लोकअदालतीत तडजोड केल्यास बिलामध्ये १० ते १५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वीजचोरीविषयी अद्याप आरोपपत्र दाखल झाले नसेल, अशा प्रकरणातही ग्राहकांना तडजोड करता येईल. वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित असलेल्या ग्राहकांसाठी महावितरणच्या अभय योजनेचाही लाभ घेता येणार आहे.



## 'रोजा इफ्तार' मधून सर्वधर्मीय स्नेहाचे दर्शन

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी,युवक क्रांती दल,जमाते इस्लामी हिंद,हाजी मक्केशा मस्जिद(डेक्कन) आणि जकीउल्ला जामा मस्जिद(कोथरूड) यांच्या वतीने आयोजित 'रोझा इफ्तार ' कार्यक्रमातून सर्वधर्मीय सामंजस्य आणि स्नेहाचे दर्शन घडले.ज्येष्ठ काँग्रेस नेते उल्हास पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ.कुमार सप्तर्षी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे विश्वस्त अन्वर राजन,विश्वस्त अभय छाजेड,डॉ. अभिजीत वैद्य,शेख करीमुद्दीन,लक्ष्मीकांत देशमुख,डॉ.विश्वम्भर चौधरी,मोहन जोशी,अ‍ॅड.. स्वप्नील तोंडे, इशाबभाई शेख, अप्पा अनारसे,तेजस भालेराव,युनुसभाई तांबटकर, अरुणा तिवारी,पैगंबर शेख, मिलिंद गायकवाड,प्रवीण वाळिंबे हे देखील उपस्थित होते.विश्वंभर चौधरी,जमात ए इस्लामी चे करीमुद्दीन शेख यांनी आपले विचार मांडले.लक्ष्मीकांत देशमुख यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. निहाल शेख यांनी आभार मानले.



## विद्यापीठ चौकात दुहेरी वाहतूक सुरू

**पुणे :** गणेशखिंड रस्त्यावर टाटा मेट्रोकडून पुलाचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि वाहन चालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मागील 26 नोव्हेंबर पासून वाहतूक वळवण्यात आली होती. मात्र ही वाहतूक एबिल कॉर्नर -सिम्पनी सर्कल ते न.ता.वाडी मार्गे सुरु होती.त्यामुळे वाहन चालकांना लांब वळसा घालून जावे लागत होते.
मात्र आता पुणे विद्यापीठ चौक ते सिमला ऑफिसचा चौकदरम्यान दुहेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे वाहन चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वाहतूक कोंडीसाठी चर्चेत असलेल्या पुणे विद्यापीठासमोरील आचार्य आनंद ऋषीजी महाराज चौकापासून ते सिमला ऑफिस चौका दरम्यान दुहेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे वाहन चालकांना वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा असून प्रवासातील वेळेची बचत ही होणार आहे.

## मिळकतकरचा अतिरिक्त पदभार पाटील यांच्याकडे




**पुणे :** आर्थिक वर्ष संपण्याच्या शेवटच्या पंधरवड्यात महापालिकेचे कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त माधव जगताप सुट्टीवर गेले, त्यानंतरही ऐन मोक्याच्या क्षणी संबंधित विभाग अक्षरश: वाऱ्यावर सोडण्यात आला होता. त्यावरून प्रचंड टीका झाल्यानंतर उशिरा जाग आलेल्या महापालिका प्रशासन जगताप कामावर रुजू होण्याच्या दिवशीच त्यांच्या विभागाचा अतिरिक्त पदभार उपायुक्त प्रतिभा पाटील यांच्यावर सोपविला आहे. त्याबाबतचा आदेश महापालिका आयुक्तांनी गुरुवारी काढला, मात्र या आदेशात 'पुढील आदेशापर्यंत' असा आवर्जून उल्लेख केल्याने जगताप यांचा पदभार काढण्यात आला असल्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

महापालिकेचे आर्थिक वर्ष संपण्यास शेवटचे काही दिवस शिल्लक आहेत, असे असताना या विभागाचे उपायुक्त माधव जगताप हे काही दिवसांपूर्वी चार दिवसांच्या सुट्टीवर गेले.

एकीकडे कर वसुलीचे उद्दिष्ट गाठण्यात अपयश आले असताना आणि संबंधित विभागाचे उपायुक्त मोक्याच्या क्षणी सुट्टीवर गेले असल्याने महापालिका प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीका सुरू होती. त्यावरून महापालिका आयुक्तांवर टीका सुरू होती.

# गुन्हे शाखेला अतिरिक्त 'बळ'

## पोलीसांची संख्या दोनशेंनी वाढणार; गुन्हेगारीत होणार घट

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहरातील गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे, त्यातूनच यापूर्वी शांत आणि पेन्शनरांचे शहर अशी ओळख असलेल्या पुण्याची ओळख आता हळूहळू गुन्हेगारांचे शहर म्हणून होउ लागली आहे. त्यातच सायबर आणि तांत्रिक गुन्ह्यांमुळे या शहराची गुन्हेगारी आता थेट जगाच्या नकाशावर जाऊन पोचली आहे, ही बाब निश्चितच पुण्यासारख्या शहरासाठी भूषणावह नाही. त्यातच गेल्या काही वर्षांच्या कालावधीत नागरीकरण वाढल्याने पोलीस ठाण्यांची संख्या तब्बल सातने वाढविण्यात आली आहे, त्यातूनच गुन्हेगारीत भर पडत आहे. त्यामुळे राज्य शासनाने गुन्हे शाखेला अतिरिक्त मनुष्यबळ देण्याचा निर्णय घेतला आहे.



शहरातील 'ईएसआर' (उन्नत पाण्याच्या टाक्या) आणि '00गुन्हे शाखेची पुनर्रचना करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. वाढलेला विस्तार, नव्याने तयार झालेली पोलीस ठाणी यांचा विचार करून ही पुनर्रचना केली जाईल. तर, अतिरीक्त मनुष्यबळासाठी देखील प्रयत्न केले जात आहेत.

**-शैलेश बलकवडे,** अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराच्या हद्दीमध्ये झालेली वाढ, नव्याने सुरू करण्यात आलेली सात पोलीस ठाणी ध्यानात घेऊन प्रभावी कामकाजासाठी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे मनुष्यबळ वाढविण्यात येणार असून सध्या कार्यरत ३६४ कर्मचाऱ्यांमध्ये आणखी २०० कर्मचाऱ्यांची भर पडणार आहे. त्यामुळे गुन्हे शाखेचे कामकाज सशक्त होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पुणे पोलिसांची गुन्हे शाखा ही महत्त्वाची शाखा असून गुन्हेगारांवर लक्ष ठेवून प्रतिबंधात्मक कारवाईत त्यांचा महत्वाचा वाटा आहे. शहरात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गुन्हे शाखेचा महत्वपुर्ण सहभाग असतो. सद्यस्थितीत शहरात ३९ पोलीस ठाणी आहेत. तर, गुन्हे शाखेचे प्रमुख सहा युनिट आणि खंडणी विरोधी पथक, अंमली पदार्थ विरोधी पथक, दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक यांची प्रत्येक दोन अशी सहा मिळून एकूण १२ पथके आहेत. शहरातील गुन्ह्यांचा समांतर तपास केला जातो. गेल्या काही महिन्यांपासून शहराची हद्द वाढली आहे. नव्याने सात पोलीस ठाणे कार्यान्वित झाले आहेत. वाढलेल्या पोलीस ठाण्यांमुळे कार्यकक्षेत वाढ झाली आहे. या सर्व बाबींचा विचार करता ही पुनर्रचना करण्यात येणार आहे.

बंदोबस्त नसलेली तीन पथके

शहरात सोनसाखळी चोरी, वाहनचोरी, घरफोड्यांचे प्रमाण मोठे आहे. त्यासाठी गुन्हे शाखेने तीन स्वतंत्र पथक तयार केले असून या पथकांच्या माध्यमातून अशा प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. एक अधिकारी आणि आठ ते दहा कर्मचाऱ्यांचा या पथकांत समावेश असेल. ही पथके संपूर्ण शहरभर गस्त घालतील. प्रभावीपणे काम करता यावे, यासाठी या पथकांना बंदोबस्ताचे काम देण्यात येणार नाही.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा २५ पासून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या नियमित, अनुशेष लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा २५ मार्चपासून सुरू होणार आहेत.

सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या 'www.unipune.ac.in' या संकेतस्थळावर टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

सर्व विद्याशाखांमधील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या पदविका परीक्षा, मान्यताप्राप्त पारंपारिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य आणि विज्ञान) पदवीस्तरावरील प्रथम वर्षांच्या परीक्षा, तसेच विधी अभ्यासक्रम पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या एलएलबी, बीए एलएलबी परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येईल.

पारंपारिक अभ्यासक्रमांतील पदवीस्तर प्रथम वर्ष आणि विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष वगळून या अभ्यासक्रमांच्या उर्वरित वर्षे, पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांची सर्व वर्षांची अनुरूप सत्र परीक्षांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर करण्यात येणार आहे.

परीक्षेच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयात काटेकोर नियोजन करण्यात यावे, बैठक व्यवस्था सुयोग्य असावी, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि वस्तू ठेवण्याची व्यवस्था करावी, अशी सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. संबंधित महाविद्यालयांनी याबाबत विद्यार्थ्यांना पूर्वसूचना द्यावी, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

- **विद्यापीठामार्फत महाविद्यालयस्तरावर होणाऱ्या परीक्षांचा कालावधी**

| अभ्यासक्रम | परीक्षांचा कालावधी |
|---|---|
| सर्व पदविका | २५ मार्च ते २५ एप्रिल |
| प्रथम वर्ष बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी, बी.कॉम (बीबीए,आयटी, सीए) : | २५ मार्च ते २५ एप्रिल |
| प्रथम वर्ष बीबीए : | १ ते २० जून |

## पी. एन. भगवती आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज(एरंडवणे,पुणे) यांच्या वतीने आयोजित तेराव्या न्यायमूर्ती पी. एन. भगवती आंतरराष्ट्रीय मानवाधिकार मूट कोर्ट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रमुख पाहुणे दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिनेश कुमार शर्मा आणि नेपाळ सर्वोच्च न्यायालयाचे न्या. टेक प्रसाद दुंगाना यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. विवेक सावजी आणि कुलसचिव जी.जयकुमार यांनी उपस्थित राहून मानवाधिकार अधिवक्त्यांच्या संवर्धनासाठी या उपक्रमाची आवश्यकता स्पष्ट केली.

स्पर्धा पुढील दोन दिवस चालणार असून अधिष्ठाता आणि प्राचार्या डॉ. उज्वला बेंडाळे, उपप्राचार्या डॉ. ज्योती धर्म, समन्वयक डॉ. विद्या ढेरे आणि प्राध्यापक समन्वयक डॉ. शिवांगी सिन्हा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे.राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विधी महाविद्यालयांचे ३२ संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेच्या पहिल्या दिवसअखेर आठ संघांनी उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्रता मिळवली .

न्यायमूर्ती पी.एन.भगवती आंतरराष्ट्रीय मानवाधिकार मूट कोर्ट स्पर्धा माजी भारताचे सरन्यायाधीश (स्व.) पी.एन.भगवती यांच्या दूरदृष्टीला वाहिलेली एक श्रद्धांजली आहे.



**पुणे** भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज(एरंडवणे,पुणे) यांच्या वतीने आयोजित तेराव्या न्यायमूर्ती पी. एन. भगवती आंतरराष्ट्रीय मानवाधिकार मूट कोर्ट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

# तंत्रज्ञानामुळे मानसिक तणाव वाढला : प्रा.डॉ.सुरेश मोनी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तंत्रज्ञानाने सध्या भारतासह जगाला भुरळ घातली आहे. सध्या जगात प्रत्येक महिन्यात नवीन बदल घडतो आहे. बदलाचा हा वेग प्रचंड असून त्याच्याशी जुळवून घेताना लोकांची दमछाक होताना दिसत आहे. एआय सारख्या बदलत्या तंत्रज्ञानामुळे सातत्याने माहितीचा भडीमार मानवी मेंदूवर होत आहे. त्यामुळे, त्यातून काय घ्यावं? आणि काय सोडावं? आणि समोर येणाऱ्या मजकूराची विश्वासार्हता आणि सत्यता याबाबत साशंकता असल्याने परिणामी मानसिक तणावात वाढ होत आहे, असे मत बंगळुरू येथील नार्से मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे माजी संचालक प्रा. डॉ.सुरेश मोनी यांनी मांडले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर महाराज विश्व शांती डोम येथे 'इनोव्हेटिव्ह ग्लोबल टेक्नॉलॉजी ट्रेंड्स' या विषयावर आयोजित सातव्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. याप्रसंगी, अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.एकनाथ खेडकर, 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे आदी उपस्थित होते.

डॉ.खेडकर यावेळी म्हणाले की, पूर्वी पेटंट सादर करण्यात व त्याची नोंदणी होण्यावर चीन, अमेरिका आणि जर्मनी सारख्या राष्ट्रांचे एकतर्फी प्रभुत्व होते. परंतु, बदलत्या काळानुसार भारतीय संशोधकांच्या मेहनतीमुळे पेटंट नोंदणीत आता भारताने आपला दबदबा निर्माण केला आहे. यासह, चॅट जिपीटी, डीपसेक सारख्या तंत्रज्ञानामुळे मानवाचे वाचन कमी व्हायला नको, याची काळजी घ्यावयास हवी, असेही त्यांनी म्हटले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सुनीता कराड यांनी तर आभार डॉ.मोहित दुबे यांनी मानले. तर डॉ.स्नेहा वाघटकर व डॉ.स्वप्निल शिरसाठ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

सध्या जगासमोर अनेक आव्हाने आहेत. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाने भौगोलिकदृष्टा अनेक गोष्टींमध्ये मोठा बदल घडविला आहे. त्यामुळे, विचारमंथन व्हावं यासाठी दरवर्षी ही परिषद भरवली जाते. दिवसेंदिवस बदलणाऱ्या एआय सारख्या तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग करत असताना त्यातील डिफेक सारख्या धोक्यांपासूनही आपण सावध रहायला हवे,

**— प्रा.डॉ.मंगेश कराड ,** कार्याध्यक्ष'एमआयटी एडीटी'

# जमिन मोजणीच्या वशीलेबाजीला 'लगाम'..!

## 'कारभार' होणार पारदर्शी; सद्यस्थितीची माहिती मिळणार एसएमएसद्वारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहरी आणि ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर नागरीकरण वाढले आहे, त्यातूनच जमीनींना 'सोन्याचा भाव' आला असून जमीन मोजणी हा कळीचा मुद्दा बनला आहे. विशेष म्हणजे त्यासाठी लाखो रुपयांचा व्यवहार होत असल्याचे आतापर्यंत निदर्शनास आले आहे, त्यातून अधिकारी आणि कर्मचारी मालामाल होत असून जमीन मालकांना त्याचा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. त्यावर आता कायमस्वरुपी तोडगा काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाने घेतला आहे, त्यानुसार या जमीन मोजणीतील वशिलेबाजी आता कायमची बंद करण्यात येणार आहे. जमीन मालकांसाठी हा अतिशय दिलासादायक निर्णय आहे, परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे.

पुणे: भूमि अभिलेख विभागाकडून जमिनीची हद्दकायम, पोटहिस्सा, बिनशेती, कोर्टवाटप, कोर्टकमिशन व विविध प्रकल्पांकरीता भूमि संपादन आदींसाठी मोजणीचे काम केले जाते. ई-मोजणी २.० या नवीन प्रणालीमध्ये जमिन मोजणीसाठी



अर्ज करावा लागतो. सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यात या प्रणालीचा वापर सुरु असून, त्यानुसारच मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येते. यामध्ये जमीनधारक स्वत:च मोजणीसाठी ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरतात. तसेच मोजणेची फी सुध्दा ऑॅनलाइन भरता येते. मोजणी अर्जाबाबतची सद्यस्थिती अर्जदाराला एसएमएसद्वारे कळते. जमीन मोजणीच्या नकाशाची प्रत सुध्दा ऑनलाइन मिळत आहे.

जमीन मोजणीसाठी अर्ज केल्यानंतर वशिलेबाजीने प्राधान्यक्रम डावलून काहींना लवकर मोजणीची तारीख दिली जाते, तर काहींची मोजणी महिनोनमहिने ताटकळून पडते. असे प्रकार टाळण्यासाठी जमिन मोजणीच्या प्रक्रियेमधील मानवी हस्तक्षेप दूर करण्यासाठी भूमि अभिलेख विभागाने ई मोजणी २.० ही नवीन प्रणाली आणली आहे. यामध्ये फिफो अर्थात (फस्ट इन फस्ट आऊट) म्हणजेच जमिन मोजणीचा अर्ज ज्या क्रमाने येणार त्याच क्रमाने मोजणीसुध्दा केली जाणार आहे. त्यामुळे जमिन मोजणीच्या प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून, वशिलेबाजीला लगाम बसणार आहे.

मोजणीसाठी बऱ्याच वेळा वशिलेबाजीने मोजणीची तारीख लवकर दिली जाते. त्यामुळे प्रामाणिकपणे मोजणीसाठी वाट पाहणाऱ्या नागरिकांवर अन्याय होतो. पहिल्या टप्प्यात प्रथम येणार्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात येत होती. मात्र शासकीय मोजणी, भूसंपादन या प्रकरणांमध्ये या मोजणीस विलंब होत होता. त्यामुळे मागील महिनाभरापासून यास तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. मात्र या प्रणालीमध्ये मोजणीची वर्गवारी करून शासकीय मोजणी व्यतिरिक्त इतर सर्व येणारे मोजणी अर्ज हे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार मोजणी करून निकाली काढण्यात येणार असल्याची माहिती भूमि अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

### मानवी चुका टळणार

- मोजणी अर्जानंतर जमीनीची मोजणी जीआयएस आधारीत रोव्हर्स होणार
- मोजणी नकाशामध्ये प्रत्येक हद्दीचे अक्षांश व रेखांश प्राप्त होणार
- हद्दीचे होणार अचूक मोजमाप
- वाद, तक्रारी कमी होण्यास मदत होणार



जमीन मालकांच्या दृष्टीने हा निर्णय अतिशय चांगला आणि लाभदायी असाच आहे. मात्र;शासन आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे आतापर्यंत सिध्द झाले आहे. त्याचा फटका प्रत्यक्षपणे जमीन मालकांनाच सहन करावा लागत आहे. त्यामुळे या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करायची असेल तर त्या त्या मोजणीची माहिती दिशादर्शक फलकावर लावण्याची गरज आहे.

**-ॲड. अशोकराव पलांडे,** ज्येष्ठ विधीज्ञ, उपाध्यक्ष डेक्कन एज्युकेशन सोसायटी



भूमी अभेलेख कार्यालयाच्या मनमानी कारभाराचा फटका जमीन मालकांना सहन करावा लागत होता, त्यामुळे हा निर्णय अतिशय चांगला असला तरी त्याची प्रभावी अंमलबजावनी होणे ही काळाची गरज आहे. त्यातूनच सर्वांना समान न्याय मिळण्यास मदत होणार आहे; त्यासाठी अधिकारी वर्गाने त्यामध्ये जातीने लक्ष घातले तर त्याचा निश्चितच लाभ होणार आहे.

**-ॲड. एस. व्ही. कोळसे पाटील,** ज्येष्ठ विधीज्ञ

## 'वैशाली' हॉटेलच्या दिवंगत मालकाच्या जावयाला अटक

**पुणे :** पुणे शहरातील सुप्रसिद्ध 'हॉटेल वैशाली' वाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. हॉटेलचे दिवंगत मालक जगन्नाथ शेट्टी यांच्या जावई विश्वजीत जाधव यांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्यावर पत्नी निकीता शेट्टी यांच्या नावाने बनावट सह्या करून 5 कोटींचं कर्ज काढल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणात कोटक महिंद्रा बँकेच्या येरवडा शाखेचे व्यवस्थापक राजेश चौधरी आणि आर. आर. फायनान्सचे रवी परदेशी यांच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी संगनमत करून हॉटेल वैशालीची मालकी बळकावण्याचा प्रयत्न केल्याचा दावा करण्यात आला आहे. निकीता शेट्टी यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्या पतीने 2018 पासून विविध प्रकारांनी छळ सुरू केला होता. बंदुकीचा धाक दाखवून पॉवर ऑफ अटॅर्नीवर जबरदस्तीने सही घेतल्याचा आणि त्यांच्यावर नशा करून मालमत्तेचे कागदपत्र हस्तांतरित करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच, त्यांनी आपल्या पती, दीर, सासू आणि सासरे यांच्याविरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या म्हणण्यानुसार, पती दोन महिन्यांपासून त्यांची 4 वर्षांची मुलगी घेऊन बेपत्ता आहे, पोलिस याप्रकरणात टाळाटाळ करत आहे.



## व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार प्रदान

**पुणे :** टरी क्लब ऑफ पूना डाउनटाउन तर्फे आज पुना क्लब येथे विविध क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल चार विशेष व्यक्तींना व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार २४-२५ ने सन्मानित करण्यात आले.

यावेळी देवश्री महाले, अशोक देशमाने, मितेश रसाळ, सचिन वाघमारे यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला माजी अध्यक्षा अरुणा राठी, सचिव ईशा मुखर्जी, बाळकृष्ण आणि ललिता करवा, रणवीर आणि नीलम राठोरे, दिप्ती आणि उल्हास भोसले आणि येझदी बाटलीवाला उपस्थित होते. यशाचा आनंद साजरा करण्यासाठी पुरस्कार विजेत्यांचे कुटुंबीय आणि मित्रमंडळीही उपस्थित होते. या पुरस्काराविषयी नव्या प्रसन्ना यांनी संपूर्ण माहिती दिली व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



## पुणे-नाशिक अंतर ग्रीन कॉरिडोअरमुळे होणार कमी

**पुणे :** पुण्यातून नाशिक येथे जाण्यासाठी सध्या पाच ते सहा तासांचे वेळ लागतो. तो पुणे-नाशिक ग्रीन कॉरिडोअर प्रकल्पामुळे दोन ते अडीच तासांवर येणार असल्याचा दावा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

पुणे-नाशिक औद्योगिक महामार्गासाठी भूसंपादन करण्याची अधिसूचना राज्य सरकारकडून काढण्यात आली आहे. पुणे-नाशिक ग्रीन कॉरिडोअरमुळे या दोन्ही शहरातील अंतर कमी होणार आहे. पुणे- नाशिक औद्योगिक महामार्गासाठी एमएसआरडीसीने निविदा प्रक्रिया राबवून सल्लागाराची नियुक्ती देखील केली होती. या सल्लागार कंपनीकडून सर्वंकष प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. गेल्या वर्षी पुन्हा या रस्त्याच्या भूसंपादनाबाबत राज्य सरकारने अधिसूचना काढली. तरी देखील कामास सुरूवात न झाल्यामुळे या अधिसूचनेची मुदत संपुष्टात आली. आता नव्याने या संदर्भातील अधिसूचना राज्य सरकारकडून नुकतीच काढण्यात आली आहे, अशी माहिती रस्ते विकास महामंडळाकडून देण्यात आली.

# निधीमध्ये सत्ताधारी पदाधिकाऱ्यांचे 'चांगभलं'..!

### महापालिकेत 'रात्र वैऱ्याची; निधीची 'पळवापळवी'

महापालिकेत गेल्या तीन वर्षांहूनही अधिक काळ 'प्रशासकराज' आहे; त्यामुळे महापालिकेच्या कारभारात सत्ताधारी अथवा विरोधकांची लुडबुड होणार नाही असा अंदाज व्यक्त होत होता. मात्र; या अंदाजांना दोन्ही बाजूंनी चांगलाच छेद दिला असून थेट स्थायी समितीच्या बैठकीत घुसण्यापर्यंत सत्ताधार्यांची मजल गेली असून विरोधकही त्यांच्या भूमिकेत शिरत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे गुरूवारी रात्री महापालिकेत अक्षरश: त्यांचा धिंगाणा सुरु होता, त्यामुळे ही ' रात्र वैर्याची'ठरली आहे. त्यातून निधी मिळविण्यात सत्ताधारी पदाधिकार्यांनी स्वत:चे 'चांगभलं'करुन घेतले असून निधीची 'पळवापळवी' करण्यात ते यशस्वी ठरले आहेत, त्यामुळे प्रशासन अक्षरश:हतबल झाले आहे.



प्रत्येक प्रभागात समान निधी देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे, त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून संबधितांनाही तशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यातूनच शहराच्या सर्वच भागाचा सर्वांगीण विकास करणे शक्य होणार आहे; आगामी काळातही हे सातत्य कायम ठेवण्यात येणार आहे.

**-डॉ. राजेंद्र भोसले,** आयुक्त, पुणे महापालिका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गुरुवारी महापालिकेत संपन्न झालेल्या शेवटच्या स्थायी समितीच्या बैठकीला कहरच झाला. सत्ताधारी भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट पक्षातील माजी नगरसेवकांसह सत्ताधारी पक्षातील पदाधिकारी पालिकेत ठाण मांडून होते. काही मोजके पदाधिकारी वगळता एरव्ही पालिकेत माननीय फिरकत नसतात. मात्र, गुरुवारी आर्थिक वर्षातील शेवटची स्थायी समितीची बैठक झाली. या बैठकीत बहुतांश विषय हे वर्गीकरणाचे असल्याचे सांगितले जात आहे. ज्या योजनांवर निधी खर्च झाला नाही. तो निधी आपल्या प्रभागात वळवणे, मर्जीतल्या ठेकेदारांची बिलांसाठी निधी, मंजुऱ्यासाठी मोठी धडपड सुरू होती. स्थायी समितीच्या बैठकीतच थेट भाजपचे पदाधिकारी घुसल्याने पालिकेत उलट सुलट चर्चा होती.

आर्थिक वर्षातील महापालिकेच्या गुरुवारी झालेली स्थायी समितीच्या बैठकीसाठी सत्ताधारी भाजपच्या माजी नगरसेवकांसह पदाधिकारी पालिकेत ठाण मांडून होते. आपल्या प्रभागात निधी वळवण्यासह ठेकेदारांच्या बिलांसाठी तरतुदीसाठी धडपड सुरू होती. स्थायी समितीची बैठक सुरू असताना, भाजपचे काही पदाधिकारी आणि भाजपच्या एका मोठ्या पदाधिकाऱ्याचे नातेवाईक आयुक्तांसमोर कागदे मांडत होती. त्यामुळे पालिकेत उलटसुलट चर्चा होती. रात्री उशिरापर्यंत ही बैठक सुरू होती.

महापालिकेत सध्या 'प्रशासक राज' असून पालिकेची सर्व धुरा महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांच्यावर आहे. महापालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षांत सत्ताधारी भाजपच्या ओझ्याखाली प्रशासकांकडून नवनवीन प्रथा सुरू झाल्या आहेत. पालिकेचे अंदाजपत्रक विभागीय आयुक्त कार्यालयाच्या व्हीआयपी कक्षात तयार होत असल्याचे समोर आल्यानंतर आता स्थायी समितीच्या बैठकीतच थेट भाजपचे पदाधिकारी घुसत असल्याचे गुरुवारी दिसून आले.

केंद्र आणि राज्यात भाजपची सत्ता आणि मागील तीन वर्षांपासून महापालिकेत 'प्रशासक राज' असल्याने त्यामुळे महापालिकेत सत्ताधाऱ्यांचं चांगभलं असून, विरोधकांना झुकते माप दिले जात असल्याचे वारंवार समोर आले आहे. त्यातही सत्ताधारी पक्षातील काही बडे धेंडेच आपल्या पदरात जास्त निधी पाडून घेत आहेत. आमदार, खासदार आणि माजी नगरसेवकांची पत्रे घेऊन त्यांच्या कामासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येत आहे. किंवा मागणीनुसार नगरसेवकांना वर्गीकरणातून त्यांच्या प्रभागातील कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जात आहे.

# प्रति गणवेश ३०० रुपये अनुदान देण्याचा निर्णय



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत गणवेश योजनेकरीता निर्धारित केलेल्या प्रति गणवेश ३०० रुपये याप्रमाणे राज्य शासनाने सुध्दा दोन गणवेशाकरीता ६०० रुपये प्रति विद्यार्थी एवढे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षांपासून या योजनेचा लाभ दारिद्र्यरेषेवरील पालकांच्या मुलांना देखील देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ पासून दरवर्षी एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे यांचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्यात येतो. याकरीता प्रति विद्यार्थी १७० रुपये इतकी रक्कम निश्चित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पूर्वी ८५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

योजनेच्या अंमलबजावणीकरीता १४४ कोटी रुपये इतका निधी आवश्यक असल्याचे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने या योजनेंतर्गत ५९ कोटी ४८ लाख रुपये इतका उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत करण्यात आली आहे. त्यालाही मान्यता देण्यात आली आहे. त्याबाबतचे आदेश शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव प्रमोद पाटील यांनी जारी केले आहेत.



## आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून

**पुणे :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या 'हिवाळी २०२४' सत्रातील टप्पा चारच्या लेखी परीक्षा येत्या शनिवारपासून (ता. २२) सुरू होत आहेत. परीक्षेत वैद्यकीय विद्याशाखेतील दुसऱ्या वर्षाच्या (२०१९), बीएएमएस/बीयूएमएस (२०२१) आणि बीएचएमएस (२०२२) या अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा २२ मार्च ते नऊ एप्रिल २०२५ दरम्यान होणार आहे.

राज्यातील एकूण १०४ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. जवळपास १६ हजार ४१४ विद्यार्थी या परीक्षा देणार आहेत. 'हिवाळी २०२४' सत्राच्या टप्पा तीनमधील तृतीय वर्ष एमबीबीएस आणि अंतिम वर्ष एमबीबीएस अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका प्रायोगिक तत्त्वावर ऑनलाइन संगणक प्रणालीद्वारे परीक्षा केंद्रावर पेपर सुरू होण्याआधी पाठविले आहेत. 'हिवाळी २०२४' टप्पा चारच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका ऑनलाइन संगणक प्रणालीद्वारे परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या दिवशी पाठवून, लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचेही संपूर्ण डिजिटलायझेशन करण्याचा मानस असल्याचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले.

## रोटरी क्लबतर्फे कविता स्पर्धा

**पुणे :** रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजतर्फे परदेशातील ५ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मराठी कविता सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, ही स्पर्धा विनामूल्य आहे, अशी माहिती रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजचे अध्यक्ष सूर्यकांत वझे यांनी दिली.

यंदा या स्पर्धेचे चौथे वर्ष असून, जगभरातील मराठी माणसांनी आपली भाषा जपण्याचा केलेला प्रयत्न लक्षात घेऊन त्यांच्या नवीन पिढीमध्ये मराठी भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

## मांग, गारूडी समाजाचा मेळावा

**पुणे :** मांग गारुडी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय मांग गारुडी क्रांतिसेना यांच्यातर्फे लोणी काळभोर येथील काळभोर लॉन्सवर रविवारी (ता. २३) सकाळी ११ वाजता कार्यक्रम होईल. समाजाला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवरसखोल चर्चा होईल आणि संघटनेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन संघटनेचे संस्थापक उत्तम मानकर यांच्या हस्ते होईल. संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब राखपसरे, उपाध्यक्ष सीताराम खलसे, कार्याध्यक्ष केशव राखपसरे, महासचिव अमोल लोंढे आदी उपस्थित असतील, अशी माहिती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय बोडके, जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब राखपसरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# 'या चिमण्यांनो परत फिरा रे घराकडे आपुल्या...!'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खराडी येथील सुंदरबाई मराठे माध्यमिक विद्यालय खराडी पुणे या शाळेत जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला.

सद्या निसर्गातील घटत जाणारी चिमण्यांची संख्या ,पर्यावरणातील व मानवी जीवनातील तिचे महत्त्व या बाबत मार्गदर्शन केले.एके काळी जिथे तिथे चिमण्या सहज दिसत असत होत्या.त्यांच्या किलबिलाटाने सकाळची आणि संध्याकाळ ची वेळ कशी सुखद व नयनरम्य वाटायची. सुंदरबाई मराठे विद्यालयातील हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी शाळेतच स्वतः सोबत आणलेल्या पिण्याच्या प्लास्टिक बॉटल फेकुन न देता बॉटल ला कडी लावून त्यात पाणी भरले व शाळेतील झाडावर व मैदानावर पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था केली. उन्हाच्या तीव्रतेमुळे, पाणी आणि निवारा न मिळाल्याने पक्षी स्थलांतर करीत आहे मुलांच्या मनामध्ये चिमणी बद्दल संवेदना निर्माण झाल्या .या चिमणी दिवसाचे आयोजन हरित सेनेचे विद्यार्थी व प्रमुख रोहित डामरे, जेम्स साखरे यांनी केले, या उपक्रमाचे सामाजिक वनीकरण विभागाने, तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामभाऊ. मोझे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, श्रीमती अलका पाटील, मुख्याध्यापक संजय सोमवंशी यांनी केले.




**पुणे** खराडी येथील सुंदरबाई मराठे माध्यमिक विद्यालय खराडी पुणे या शाळेत जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला. आम्ही आमच्या घराच्या टेरेसवर चिमण्यासाठी घरटे आणि खाण्यासाठी आणि पिण्यासाठी व्यवस्था करू अशी प्रतिज्ञा घेतली..

# आदिवासी पाड्यावरील कुटुंबांचा 'गुढीपाडवा' होणार गोड



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग, पुणे च्यावतीने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून खंडाळा येथील सावरगाव ठकारवाडी या दुर्गम भागातील आदिवासी वसाहतीमधील १०० कुटुंबांना किमान तीन महिने पुरेल इतका जीवनावश्यक शिधा वितरित करण्यात आला. यानिमित्ताने या कुटुंबांचा गुढीपाडवा सण गोड होणार आहे.

श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट, श्री महालक्ष्मी मंदिर, पुणे च्या पुढाकाराने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त हेमंत अर्नाळकर यांसह विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मंदिराच्या प्रमुख विश्वस्त अमिता राजकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेण्यात आला.

अमिता अग्रवाल म्हणाल्या, समाजातील प्रत्येक घटकाने सण -उत्सवांचा आनंद घ्यावा, याकरिता सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गहू, तांदूळ, साखर, डाळी, तेल, मीठ, मिरची, हळद, मसाले, चहा पाउडर, बिस्कीट, रवा, पोहे, गूळ अशा जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या.

मराठी नववर्षाची सुरुवात आनंदाने व उत्सवाने व्हावी, तसेच या दुर्गम भागातील कुटुंबांमध्ये सुख शांती नांदावी अशी प्रार्थना देखील देवीचरणी करण्यात आली. आदिवासी कुटुबांना हा शिदा दिल्याने त्यांना सणामध्ये निश्चितच आनंद मिळणार आहे..

**—अमिता आगरवाल,,** प्रमुख विश्वस्त, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट, श्री महालक्ष्मी मंदिर

# मेट्रो अन् स्थानकांवरील सुविधाही सुस्साट..!

## नव्या स्थानकावर प्रवाशांना मिळणार अत्याधुनिक सुविधा, निविदाही मागविल्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांना गती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू केली आहे. प्रकल्पातील खराडी ते खडकवासला आणि नळ स्टॉप ते माणिकबाग या मेट्रो मार्गावरील स्थानकांसाठी 'रचनाकार सल्लागार समिती'साठी खासगी कंपन्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) निविदा मागविण्यास सुरुवात केली आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील पहिल्या टप्प्यातील मार्गांचा विस्तार अंतिम टप्प्यात असताना दुसऱ्या टप्प्यातील पाच मार्ग नव्याने प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यापैकी खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी या २५.५१ किलोमीटर अंतराच्या मार्गावर २२ स्थानके आहेत, तर नळ स्टॉप ते वारजे-माणिकबाग ६.१२ किलोमीटर मार्गावर सहा स्थानके निश्चित करण्यात आली आहेत. या दोन्ही मार्गांवरील स्थानकांची रचना भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून आणि इतर दळणवळण यंत्रणा परिस्थितीनुरूप सुनिश्चित करण्यासाठी 'मेट्रो'ने खासगी रचनाकार सल्लागार समितीची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविल्या आहेत.

खडकवासला-खराडी मार्ग (२५.५१ किलोमीटर २२ स्थानके)

खडकवासला, दळवेवाडी, नांदेड सिटी, धायरी फाटा, माणिकबाग, हिंगणे चौक, राजाराम पूल, देशपांडे उद्यान, स्वारगेट (उत्तर), सेव्हन लव्हज चौक, पुणे कटक मंडळ, रेसकोर्स, फातिमानगर, रामटेकडी, हडपसर फाटा, मगरपट्टा (दक्षिण), मगरपट्टा मध्य, मगरपट्टा (उत्तर), हडपसर रेल्वे स्थानक, साईनाथनगर, खराडी चौक आणि खराडी बायपास अशी २२ स्थानके निश्चित करण्यात आली आहेत.



मेट्रो मार्गांच्या प्रभावक्षेत्र भागातील स्थानकांचे सुरळीत नियोजन सुनिश्चित करण्यासाठी पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याशी महामेट्रो समन्वय साधणार आहे. स्थानकांवरील सुविधांच्या अनुषंगाने कलात्मक आणि सुलभ रचनेसाठी लवकर निविदा प्रक्रिया राबवून आराखडा करण्याचे काम हाती घेण्यात येईल.

**-श्रावण हर्डीकर**, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो

### अशा मिळणार सुविधा...!

- परिसरानुसार स्थानकांची रचना
- प्रवाशांना सहज आणि सुलभ प्रवास करण्यासाठी सुविधा
- वातानुकूलित यंत्रणा
- स्थानकावरील विद्युत आणि सौर यंत्रणांची सुविधा
- अग्निसुरक्षेपासून हरित इमारतीच्या दृष्टीने नैसर्गिक स्रोतांचा पूरेपूर वापर
- स्वच्छतागृहे, उपाहारगृहे, वस्तू विक्री दुकाने, ध्वनियंत्रणा
- इतर मानकांनुसार देखभाल दुरुस्ती



## अशोक सोसायटीच्या चेअरमनपदी नामदेव गावडे

**वाघोली :** शिरसवडी ग्रामपंचायतीच्या सरपंच सीमा गावडे यांचे पती तर शिरसवडी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नामदेव ज्ञानोबा गावडे यांची अशोक विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड पार पडली. वाडेबोल्हाई विविध कार्यकारी सोसायटीचे काम जिल्हा बँकेचे माजी संचालक ज्येष्ठ नेते माणिकराव गोते यांच्या नेतृत्वाखाली आदर्शवत सुरू असून या सोसायटीच्या चेअरमन व व्हॉईस चेअरमन पदाच्या निवडी गेले अनेक वर्षापासून बिनविरोध होत आहेत. वाघेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा माजी उपसरपंच राजेंद्र सातव पाटील,जिल्हा बँकेचे माजी संचालक तथा ज्येष्ठ नेते माणिकराव गोते,वाघोलीच्या माजी सरपंच जयश्री राजेंद्र सातव पाटील यांच्या हस्ते बिनविरोध निवडीबद्दल नवनिर्वाचित चेअरमन नामदेव गावडे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बाळासाहेब शिंदे सरकार,दत्तात्रेय गावडे,सुनिल गावडे उपस्थित होते. नामदेव गावडे यांच्या निवडीबद्दल शिरूर हवेलीचे माजी आमदार अशोक पवार,राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) पक्षाचे हवेली तालुकाध्यक्ष तथा शिरसवडीचे माजी सरपंच संदीप गोते,राष्ट्रवादीचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष संतोष गावडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## कॉपी प्रकरणी एकावर गुन्हा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाज कल्याण निरीक्षक पदाच्या ऑनलाइन परीक्षेत कॉपी करताना व प्रवेशपत्राचा गैरवापर करून परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची फसवणूक करणाऱ्या तरुणावर वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्ता सदाशिव टेंगले (रा. खांडनाळ, जत) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणी संतोष प्रकाश जाधव (वय ४९, रा. मांजरी) यांनी फिर्याद दिली आहे. रामटेकडी परिसरात डिजिटल हब येथे मंगळवारी (ता. १८) दुपारी तीनच्या दरम्यान समाज कल्याण निरीक्षक पदाची ऑनलाइन परीक्षा आयोजित केली होती. त्यासाठी तक्रारदार संतोष जाधव यांना केंद्र निरीक्षक म्हणून नियुक्त केले होते. परीक्षेदरम्यान त्यांना आरोपी टेंगले हा कॉपी करताना तसेच प्रवेशपत्राचा गैरवापर करताना आढळून आला. त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली.

# सावधान..! पर्यावरणाचा समतोल बिघडतोय

## एनजीटी कडे पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाच्या तक्रारींचा ओघ वाढला

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत पर्यावरणाचा समतोल चांगलाच बिघडला आहे; त्यासाठी 'मानवी कारस्थाने' ही कारणीभूत आहेत. त्यावर वृक्ष लागवडीचा पर्याय असला तरी त्याकडे जाणुनबुजुन दुर्लक्ष होत आहे; त्यासाठी शासनाने 'एनजीटी'चा पर्याय शोधला आहे. मात्र; नागरिकांनी त्याकडेही चांगलेच दुर्लक्ष केले असून त्यातून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढत आहे. तरीही नागरिकांमध्ये त्यासंदर्भात जागरुकता वाढत असल्याने ही निश्चितच समाधानाची बाब आहे, विशेष म्हणजे या तक्रारींचे प्रमाण कमी होण्याच्या ऐवजी दिवसेंदिवस त्यामध्ये आणखीनच वाढ होत आहे; ही बाब निश्चितच चिंताजनक अशीच असून त्यावर आता कायमस्वरुपी तोडगा काढणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे.

पर्यावरणातील मानवी हस्तक्षेपांमुळे मागील काही वर्षांत मानवनिर्मित संकटे निर्माण होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्वसामान्य नागरिक, पर्यावरण रक्षणासाठी कार्यरत संस्था, संघटना, अभ्यासक व कार्यकर्ते अधिक सक्रिय झाले आहेत. त्यांच्याकडून याचिका दाखल करण्याचे प्रमाण वाढले असून, याचिका निकाली काढत तक्रारदारांना न्याय देत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना न्यायाधिकरणाकडून दंडही ठोठावण्यात येत आहे.

**-ॲड. प्रणीत नामदे**

,

मागील काही वर्षांत पर्यावरणाबाबत वाढलेली संवेदनशीलता आणि कायद्याबद्दलची जागरूकता यामुळे तक्रार दाखल करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे देशात सर्वाधिक दावे दाखल होण्यासह निकाली निघण्यात दिल्लीपाठोपाठ पुण्याचा नंबर लागतो. तक्रारी वाढल्याने प्रलंबित याचिकांची संख्याही जास्त दिसून येते. न्यायाधिकरणाचे कामकाज सुरळीत सुरू असून, दिवसाला दहा ते बारा याचिकांवर सुनावणी केली जाते.

**-ॲड. आकाश कामठे**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पर्यावरण नियमांचे उल्लंघन प्रकरणात पुणे न्यायपीठाकडे दरमहा ६० हून अधिक याचिका दाखल होत आहेत. याचिकेद्वारे बेकायदा उभे राहणारे बांधकाम प्रकल्प, वृक्षतोड, सार्वजनिक कचरा व्यवस्थापनातील अपयश यांसह वेगवेगळ्या पर्यावरणीय समस्यांविरोधात नागरिक न्यायाधिकरणाकडे दाद मागत आहेत. पर्यावरणाबाबत सर्वसामान्यांमध्ये वाढलेली संवेदनशीलता आणि जागरूकता वाढल्यामुळे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे (एनजीटी) पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाच्या तक्रारींचा ओघ वाढला आहे.60

बेकायदा सुरू असलेल्या प्रकल्पांविरोधात राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे सध्या तक्रारींचा ओघ वाढत आहे. यामध्ये वृक्षतोडीपासून ते शहरातील गंभीर पर्यावरणीय समस्यांवर आधारित अनेक तक्रारींचा समावेश आहे. देशभरात दिल्ली येथील मुख्य न्यायपीठासह पाच न्यायपीठ कार्यरत आहेत.

यामध्ये पुणे, चेन्नई, भोपाळ आणि कोलकाता या न्यायपीठांमध्ये पर्यावरणासंबंधित दाखल याचिकांवर सुनावणीचे काम चालते. यात प्रामुख्याने पर्यावरणीय कायद्यांचे उल्लंघन करून साकारण्यात येणारे विकास प्रकल्प, खासगी बांधकाम प्रकल्प, पर्यावरणावर परिणामांचे मूल्यांकन अहवालांशिवाय ठिकठिकाणी वृक्षतोड, डोंगरफोड, जलाशयांवरील अतिक्रमण, जल, वायू, ध्वनिप्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन या समस्यांचा समावेश आहे, अशी माहिती एनजीटी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सौरभ कुलकर्णी यांनी दिली.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा 2010 अंतर्गत 18 ऑक्टोबर 2010 रोजी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर 25 ऑगस्ट 2013 रोजी शहराला सर्वोच्च न्यायालयाच्या दर्जाचे स्वतंत्र न्यायपीठ मिळाले. यादरम्यान पुणे न्यायपीठाकडे क्षेत्राशी संबंधित सर्व दावे या न्यायपीठाकडे हस्तांतरित करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रासह गोवा, गुजरात तसेच केंद्रशासित असलेल्या दमण, दीव, दादरा आणि नगर हवेली आदी प्रदेशांतील दाव्यांचा समावेश आहे.

### अशी आहे पर्यावरणाची दुरावस्था

- पाच न्यायपीठांत ४,६३९ दावे दाखल
- जानेवारीअखेर ३,३०२दावे निकाली
- सर्वाधिक १, ८५५ दावे निकाली काढत दिल्ली अव्वल
- कोलकाता न्यायपीठामार्फत सर्वाधिक कमी २९० दावे निकाली



## गोळीबार प्रकरणी आणखी तिघे जेरबंद

**वाघोली :** वाडेगाव येथे हवेत गोळीबार करून मारहाण करणाऱ्या आणखी तिघांना लोणीकंद पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी घटना घडलेल्या ठिकाणी त्यांची धिंड काढली. बेकायदा अग्निशस्त्राचा वापर हवेत गोळीबार करण्यासाठी केल्याचेही स्पष्ट झाले आहे.

दत्तात्रेय भरत गाडे (वय २५, रा. बोरीभडक, ता दौंड), प्रताप अंकुश अडसूळ (वय २२, रा. उरुळी कांचन), महेंद्र दत्तात्रेय गाडे (वय २३, रा. उरुळी कांचन) अशी तिघांची नावे आहेत. यापूर्वी ओंकार अंकुश लांडगे व गणेश संजय चौधरी यांना अटक करण्यात आली होती. १३ मार्चच्या रात्री अजित जाधव व त्याच्या मित्राला गणेश चौधरी व त्याच्या साथीदारांनी हवेत गोळीबार करत मारहाण केली होती. पोलिसांनी या पाच जणांची ज्या ठिकाणी गुन्हा घडला त्या ठिकाणी धिंड काढली. लोणीकंदचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र गोडसे व पथकाने ही कामगिरी केली.

## ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरणास प्रतिबंध




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्रामीण जिल्ह्यात कोणतीही खासगी व्यक्ती, कार्यक्रम व्यवस्थापन (इव्हेंट मॅनेजमेंट) व छायाचित्रण करणारे व्यावसायिक यांनी ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यापूर्वी त्याची पूर्वमाहिती ७ दिवस आधी संबंधित पोलीस ठाण्यास कळवून, प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक राहील, असे आदेश अपर जिल्हा दंडाधिकारी ज्योती कदम यांनी जारी केले आहेत.

जिल्ह्यात महत्त्वाची धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था आहेत. त्यामुळे अशा ठिकाणांची ड्रोन कॅमेऱ्याद्वारे टेहळणी होऊन, त्या माहितीचा अतिरेकी कारवायांमध्ये वापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दौंड, बारामती, शिरूर या तालुक्यांच्या परिसरामध्ये रात्रीच्या वेळी ड्रोन उडत असल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत.

अशा घटनांमुळे नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाळू माफियादेखील टेहळणीसाठी ड्रोनचा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच चोऱ्यांसाठीही ड्रोनच्या माध्यमातून टेहळणी केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. हे आदेश पुढील दोन महिन्यांसाठी लागू राहतील. आदेशाचा भंग करून पोलिसांच्या परवानीशिवाय कोणतीही व्यक्ती ड्रोन कॅमेऱ्यादवारे चित्रीकरण करताना आढळून आल्यास अशी व्यक्ती भारतीय न्याय संहितेच्या कलम २३३ प्रमाणे दंडनीय कारवाईस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



## सराईत गुन्हेगार एक वर्षासाठी हद्दपार

**येरवडा :** चंदननगर पोलिस ठाण्याच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार प्रथमेश ऊर्फ मोन्या सुनील गायकवाड (वय २०, रा. वडगाव शेरी) याला एक वर्षासाठी पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

गायकवाड हा वडगाव शेरी, चंदननगर परिसरात दहशत निर्माण करून नागरिकांना वारंवार त्रास देत होता. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगाराच्या कृत्यामुळे लोकांच्या मनातून कायद्याविषयी संभ्रम निर्माण होऊ नये, तसेच गुन्हेगारांवर कायद्याचा वचक बसावा, या उद्देशाने

या गुन्हेगाराच्या हद्दपारीचा प्रस्ताव परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव यांच्याकडे चंदननगर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक सीमा ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पाठविला होता. तो प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यानंतर गायकवाड याला हद्दपारीची नोटीस बजाविण्यात आली.

## हिंदूविरोधी वाङ्मयाला प्रतिवाद करण्याबाबत निराशा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सनातन धर्माच्या किंवा भारतीय संस्कृतीच्या विरोधात ज्या संस्था निर्माण झाल्या त्यांनी वाङ्मय निर्मिती या सगळ्यात मोठ्या शस्त्राचा वापर केला. घराघरात, विद्यार्थ्यांपर्यंत ते वाङ्मय पोहोचवले. हिंदू धर्माबद्दल कितीही चांगले सांगितले, तरी त्यांच्या मनात श्रद्धा निर्माण होऊ नयेत अशी मानसिकता करण्यात आली. हिंदूविरोधी पसरविण्यात येणाऱ्या चुकीच्या गोष्टींना, वाङ्मयाला प्रतिवाद करण्याबाबत निराशा पहायला मिळते, असे मत राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी व्यक्त केले.

डॉ. आनंद बर्वे लिखित 'श्रीविष्णूंचे अंशावतार' पुस्तक प्रकाशन सोहळा एरंडवण्यातील सेवा भवन येथे पार पडला. राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ए.एस.पी. मेडिकल फाउंडेशनच्या संचालिका अनुराधा पाटणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र बलकवडे तसेच लेखक डॉ. आनंद बर्वे उपस्थित होते.

चारुदत्त आफळे म्हणाले, अनेक गोष्टी वैज्ञानिक दृष्टिकोनातून किती अचूक आहेत हे स्पष्टपणे सांगितल्यास नवीन पिढी त्यांना सहज स्वीकारते.



पुणे डॉ. आनंद बर्वे लिखित 'श्रीविष्णूंचे अंशावतार' पुस्तक प्रकाशन सोहळा एरंडवण्यातील सेवा भवन येथे पार पडला. राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले

# महापालिका प्रशासन करत आहे महात्म्यांच्या समाधी गाडण्याचा प्रताप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नदीपात्रावरची संपूर्ण जैवविविधता नाहिशी होत आहे. तेथून केवळ पक्षी, झाडे, वन्यजीवांना हटवले जात नाही, तर माणसांसह पुरातन माहात्म्यांच्या समाधीही गाडण्याचा प्रताप महापालिकेने केला आहे.

संगमवाडी नदीपात्राच्या पल्याड चारशे वर्षे दशनाम गोसावी समाजाने जतन केलेली पुरातन स्मशानभूमी आहे. या स्मशानभूमीवरच बुलडोझर फिरवला गेला. तेथील शेकडो झाडे राडारोड्याखाली गाडली गेली. यात सात समाधी कचऱ्याच्या ढिगाऱ्यात गाडल्या गेल्या. याबाबत येथील वारसदारांनी महापालिकेकडे तक्रार केली; मात्र कुणीही लक्ष दिले नाही.



आरटीओ कार्यालयामागे जो घाट आहे, तेथे ही चारशे वर्षांपूर्वीची स्मशानभूमी आहे. सामाजिक कार्यकर्ते रूपेश केसेकर आणि पर्यावरण अभ्यासक आणि पुणे संवादचे सदस्य चैतन्य केत यांनी ही दुरवस्था दाखवली. वारंवार फोटो, व्हिडीओ काढून महापालिकेला दाखवले; मात्र काहीही उपयोग झाला नाही. ही मंडळी जैवविविधता नष्ट होऊ नये, केवळ याच विषयावर महापालिकेशी भांडत आहेत; मात्र त्यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही.

या स्मशानभूमीत काळ्या पाषाणापासून हेमाडपंती धर्तीवर बांधलेल्या अनेक समाधी आहेत. या समाजाच्या वारसदार शकुंतलादेवी शंकर गिरी यांनी सांगितले की, इथे दररोज पक्ष्यांची शाळा भरते. पूर्वी सुमारे चारशे ते पाचशे कावळे येत असत. त्यांच्यासोबत शेकडो परजातींचे पक्षी येत; मात्र स्मशानभूमीतील झाडे तोडल्याने शाळेतील पक्ष्यांची संख्या निम्म्याने रोडावली आहे. पक्षी तडफडून मृत पावताहेत. आमच्या पूर्वजांच्या समाधींसह जिवंत झाडांवर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रात्रीतून बांधकामाचा राडारोडा आणून टाकला.

आम्ही महापालिका प्रशासनासोबत गेली चार वर्षे भांडत आहोत. त्याचा काही उपयोग झाला नाही. ते एकच कारण सांगतात, की आम्ही कोर्टात केस जिंकलो आहोत. त्यामुळे नदीपात्राचे विस्तारीकरण होणारच; मात्र जैवविविधता नष्ट होताना पाहून काळजाला घरे पडत आहेत. अनेक लोकांनी तक्रारी केल्या; पण त्याचा उपयोग झाला नाही.

**— रूपेश केसेकर,**
चैतन्य केत, पर्यावरणप्रेमी नागरिक

दशनाम गोसावी समाजाची ही स्मशानभूमी गे ३५० ते ४०० वर्षांपासून आहे. आमची सातवी पिढी आहे. माझे आजोबा राजा धनराज गिरी यांनी खूप लक्ष दिले. या ठिकाणी पूर्वजांच्या समाधी आहेत. त्यातील बहुतांश पुरातन आहेत. मात्र, त्यावर राडोरोडा टाकल्याने त्या गाडल्या गेल्या. येथील प्रत्येक झाडाचे मार्किंग केले आहे. आम्ही विरोध केल्याने ती झाडे रात्रीतून तोडली जात आहेत.

**— शकुंतलादेवी गिरी,**
वारस, दशनाम गोसावी समाज स्मशानभूमी

## लोहगडाच्या पायथ्याशी आढळला तरुणीचा मृतदेह



**सांगवी :** सांगवी येथील बेपत्ता तरुणीचा मावळ तालुक्यातील लोहगड येथे किल्ल्याच्या पायथ्याशी मृतदेह आढळला. गुरुवारी (दि.२०) शिवदुर्ग रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी तरुणीचा मृतदेह घेरेवाडीकडील बाजूला असलेल्या झाडाझुडपातून बाहेर काढला. मानसी प्रशांत गोविंदपुरकर (वय २१, रा. सांगवी) असे मृतदेह आढळलेल्या तरुणीचे नाव आहे.

मानसी मंगळवारपासून बेपत्ता होती. मंगळवारी सकाळी ती कॉलेजला जाण्यासाठी घरातून निघाली. त्यानंतर ती एका टॅक्सी मधून लोहगड येथे एकटी आली. टॅक्सीतून उतरून लोहगडावर जाताना तिकीट काउंटर वरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसून आली. मानसीचे नातेवाईक आणि शिवदुर्ग रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी गड परिसरात तिचा शोध सुरू केला. लोहगडाच्या पायथ्याशी असलेल्या घेरेवाडी कडील बाजूला नवग्रह मंदिराच्या जवळ झाडाझुडपात तिचा मृतदेह आढळला.



## अवैध वृक्षतोडबाबत आमदार शेळकेंची विधानसभेत सूचना

**मावळ :** मावळ तालुक्यातील मंगरूळ येथे मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड आणि गौण खनिजांचे उत्खनन झाल्याचे उघड झाले आहे. वनक्षेत्र म्हणून राखीव असलेल्या गट क्रमांक ४१ ते ४९ मध्ये सुमारे ८०० ते ९०० झाडे तोडली गेली असून, ४० ते ४५ हजार ब्रास माती, मुरूम आणि डबर यांचे उत्खनन करण्यात आले आहे. पर्यावरणाची झालेली हानी व अधिकाऱ्यांची दुर्लक्षीत भूमिका यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या प्रकरणी आमदार सुनिल शेळके यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडत, संबंधित अधिकारी आणि जमीनमालकांवर कारवाईची मागणी केली. पर्यावरण प्रेमी व ग्रामस्थांनी या वृक्षतोडीबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या. डिसेंबर २०२४ मध्ये या वृक्षतोडीचा आणि उत्खननाचा प्रकार उघडकीस आला. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. विशेष म्हणजे, गट क्रमांक ४२ आणि ४६ हे वनक्षेत्रात समाविष्ट असूनही, उपजिल्हाधिकाऱ्यांनी त्याठिकाणी परवानगी दिली. या परवानगीचा गैरफायदा घेत सुमारे ३ लाख ६१ हजार ब्रास उत्खनन केल्याचे दिसून आले.

या प्रकरणी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, गट क्रमांक ३५, ३६, ३७, ३८, ४१, ४२ आणि ४६ या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले आहे. त्यापैकी ३५, ३६, ३७ आणि ३८ हे खाजगी गट असून, त्यांना दहा वर्षांचा खाणपट्टा मंजूर करण्यात आला आहे. तथापि, ४१, ४२ आणि ४६ हे वनक्षेत्र राखीव असल्याने तिथे कोणत्याही प्रकारचे उत्खनन किंवा वृक्षतोड होऊ नये. या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाले आहे. मंत्री बावनकुळे यांनी याप्रकरणी विभागीय आयुक्त चौकशीचे आदेश दिले असून, एका महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

## थकबाकीदारांच्या १४ मालमत्ता केल्या जप्त

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ता कर वसुलीसाठी धडक मोहीम हाती घेतली आहे. महानगरपालिका प्रशासनाने आता थकबाकीदारांच्या पाच लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे. ही जप्ती मोहिमेमध्ये महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारीही सहभागी होत आहेत. गुरुवार (20 मार्च) रोजी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी थेट महानगरपालिका कार्यक्षेत्रात चिखली, तळवडे, आकुर्डी, वाकड झोनमधील मिश्र, बिगनिवासी, व्यावसायिक थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्या असून निवासी मालमत्ता कर थकबाकीदारांच्या मालमत्तांचे नळ कनेक्शन तोडणीची कारवाई करण्यात आली.

## चिंचवडमधील वाहन चालकांना मोठा दिलासा



**चिंचवड :** संत मदर तेरेसा हा ऑटो क्लस्टर ते काळेवाडी दरम्यान उभारला आहे. हा पूल चिंचवडमधून जातो. मात्र चिंचवडकर नागकरिकांना त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. अखेर या पुलावर जाण्यासाठी रॅम्प उभारण्यात आला आहे. त्यामुळे चिंचवडमधील वाहन चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. लवकरच हा रॅम्प वाहन चालकांसाठी खुला करण्यात येणार आहे. ऑटो क्लस्टर, चिंचवड ते काळेवाडी दरम्यान संत मदर तेरेसा पूल उभारण्यात आला आहे. हा पुल पिंपरी चिंचवड लिंक रस्त्यावरून जातो. मात्र चिंचवडकरांना त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. जर या पुलाला जोडण्यासाठी रॅम्प तयार केला तर चिंचवडमधील वाहन चालकांना याचा मोठा उपयोग होऊ शकतो, हे जाणून माजी नगरसेवक राजेंद्र गावडे यांनी रॅम्पबाबत २०१८ मध्ये महापालिकेकडे प्रस्ताव सादर केला.

## महामानवास अभिवादन



**पुणे** चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त शुक्रवारी ऐतिहासिक "भीमसृष्टी" स्मारक पिंपरी या ठिकाणी वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन पिंपरी चिंचवड शहर कार्यकारणीच्या वतीने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महाडचा सत्याग्रह हे पुस्तक वाटप करण्यात आले.

## गावे पिंपरी चिंचवडशी संलग्न करण्याचे बावनकुळे यांचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** शहरातील १९ गावांतील जमिनींचे रेकॉर्ड पिंपरी चिंचवड नगरभूमापन कार्यालय व येरवडा येथील हवेली भूमी अभिलेख कार्यालय अशा दोन कार्यालयांत विभागले आहे. त्यामुळे नागरिकांना नगर भूमापनासंर्भातील कामांसाठी पुण्यात चकरा माराव्या लागत आहेत. मात्र, या चकरा आता थांबणार असून ही गावे पिंपरी चिंचवड नगरभूमापन कार्यालयाशी संलग्न करण्याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जमाबंदी आयुक्तांना निर्देश दिले आहेत. याबाबत दैनिक प्रभात ने देखील सातत्याने बातम्या प्रकाशित करत या समस्येवर प्रकाश टाकला होता. आमदार महेश लांडगे यांनी महसूल मंत्र्यांकडे पाठपुरावा केला होता.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील बोपखेल, दिघी, वडमुखवाडी, चऱ्होली, चोवीसावाडी, डूडूळगाव, मोशी, चिखली, देहू, किन्हई, रावेत, मामुर्डी, किवळे आदी गावांतील काही भाग पिंपरी चिंचवड नगर भूमापन कार्यालय व हवेली भूमी अभिलेख कार्यालयात विभागलेला आहे.

# मिसिंग लिंकचे काम पूर्णत्वावर

### त्रिवेणीनगरमार्गे नाशिक व जुना मुंबई-पुणे महामार्ग जोडला जाणार



"त्रिवेणीनगर मार्गे नाशिक महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. नागरिकांच्या वाहतूक सोयीसाठी तात्पुरत्या स्वरूपात हा रस्ता खुला करण्यात आला आहे. उर्वरित अनुषंगिक कामे जलद गतीने सुरू असून, लवकरच हा रस्ता पूर्ण क्षमतेने वापरासाठी उपलब्ध होईल. मुख्य मार्गांवरील वाहतूक कोंडी कमी करून प्रवाशांचा वेळ आणि इंधन वाचवणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. तसेच, औद्योगिक आणि व्यावसायिक दळणवळणासाठी हा रस्ता एक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

**-प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** निगडी येथील त्रिवेणीनगरमार्गे नाशिक महामार्ग तसेच जुन्या पुणे-मुंबई महामार्गाला जोडणाऱ्या मिसिंग लिंकचे काम पुर्णत्वावर आले असून तात्पुरत्या स्वरूपात हा रस्ता नागरिकांच्या वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. पुणे जिल्हा अधिकारी कार्यालयाकडील विशेष भूसंपादन विभागाने १५ फेब्रुवारी रोजी संबंधित जागेचा ताबा हस्तांतरित केल्यानंतर उर्वरित रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात आले.

सध्या या प्रकल्पाचे ८० टक्के काम पुर्ण झाले असून एकूण ४५० मीटर लांबीचा रस्ता विकसित करण्यात आला आहे. दोन्ही बाजूंना प्रत्येकी तीन अशा एकूण सहा लेनचे काम पूर्ण झाले आहे. याशिवाय, उर्वरित अनुषंगिक कामे जलद गतीने सुरू असून लवकरच पूर्ण क्षमतेने रस्ता सुरू करण्यात येणार आहे.

### प्रकल्पाची माहिती

- मंजूर विकास आराखड्यानुसार हा रस्ता ७५ मीटर रुंद
- सध्या ३७ मीटर रुंद रस्ता विकसित करणेत आला आहे.
- दोन्ही बाजूस १२ मीटर रुंद (तीन लेन), मध्यभागी ९ मीटर रुंदीचा उच्च क्षमतेचा मास ट्रान्झिट रूट आणि दोन्ही बाजूंनी २ मीटर रुंदीचे पेव्ह शोल्डर आहेत.
- पहिल्या टप्प्यामध्ये दुहेरी मार्गाच्या २७० मीटर लांबीच्या भागाचे डांबरीकरणाचे काम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले होते.
- एकूण ५५० मीटर लांबी असलेल्या या रस्त्यातील मंजूर विकास आराखड्यातील ४५० मीटर रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे.

### प्रकल्पामुळे नागरिकांना होणारे फायदे..

- या प्रकल्पामुळे निगडी येथील भक्ती शक्ती चौकातून पुणे-नाशिक आणि जुन्या मुंबई-पुणे महामार्गाशी होणारे दळणवळण सुधारण्यास मदत होईल.
- मुख्य रस्त्यांवरील अवजड वाहनांची वाहतूक कमी होण्यामुळे पर्यावरणपूरक वातावरण टिकवण्यात आणि प्रवाशांच्या वेळ व इंधन बचतीस मदत होईल.
- हा रस्ता तळवडे संगणकीय औद्योगिक केंद्र मार्गे चाकण एमआयडीसीला जोडण्यात महत्वाचा दुवा म्हणून काम करणार आहे.
- अत्याधुनिक तांत्रिक पद्धतीने रस्ता विकसित केल्यामुळे जलनिसारण संबंधी समस्या कमी होतील आणि अपघाताच्या घटनांमध्ये देखील घट होणार आहे.

## इंटीग्रेटेड सॉफ्टवेअरचे काम मे २०२५ अखेर पूर्ण होणार

### राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची माहीती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था प्रत्येकी २५ टक्के आपला हिस्सा देतात. पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी प्रोजेकटला गतिमान करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगर पालिका आणि पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी यांच्यासाठी एकत्रित काम करणारे सॉफ्टवेअर आवश्यक होते. या इंटीग्रेटेड सॉफ्टवेअरचे काम मे २०२५ मध्ये पूर्ण होणार असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शुक्रवारी विधान परिषदेत दिली.

आमदार अमित गोरखे आणि आमदार सत्यजित तांबे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या. आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने जीआयएसईआरपीच्या दृष्टीने ११२ कोटी रुपयांची वेगळी निविदा का काढली ? काम संथ गतीने होत असल्याने ९२ लाख रुपयांचा दंड ठोठावला अशा परिस्थितीत कंपनीकडे असलेला डेटा किती सुरक्षित आहे? असा प्रश्न विचारला होता, त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की. २०१९ साली अटॉस इंडिया ला काम देण्यात आले आहे, स्मार्ट सिटी आणि महापालिकेचे सर्व विभाग यांना एकत्र आणण्याचे ट हे काम आहे, पूर्वी महापालिकेच्या सर्व विभागाचे काम स्वतंत्रपणे चालत असे आता ते सर्व विभाग एकत्रित येतील आणि स्मार्ट सिटी शी सुद्धा कनेक्ट असतील. पूर्वीच्या सॉफ्टवेअर मध्ये जीआय तंत्रज्ञान नव्हते नवीन मध्ये आहे आणि ते ३२० लेयर मध्ये काम करते यामुळे महापालिकेचा डेटा पूर्णपणे सुरक्षित असेल. प्रॉपर्टी टॅक्स साठी या सॉफ्टवेअर मार्फत सर्वे करण्यात आला, यात ई ऑफिस सुविधा आहे.

### घोटाळ्याचा आरोपाला उत्तर

- आमदार सत्यजित तांबे यांनी अटॅास इंडिया प्रा. लि. ला गुजराती कंपनी नसेंट टेक्नॉलॉजी सोबत का निविदा भरावी लागली? यात घोटाळा असल्याचा आरोप केला. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे या दोन कंपन्या एकत्र आलेल्या आहेत. तीन वर्षात काम पूर्ण होणे अपेक्षित होते मात्र झाले नाही यामुळे दंड आकाराला असून काम मे २०२५ पर्यंत काम पूर्ण होणार आहे.

## चिंतामण बुरसे यांची लेफ्टनंट पदी निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील देशसेवेत सहभागी होणा-या युवकांमुळे शहराच्या लौकिकात भर पडली असून अशा युवकांचा अभिमान वाटत असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केले. देशसेवेसाठी लहानपणापासून भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगत वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड झालेल्या पिंपळे गुरव येथील चिंतामण विष्णू बुरसे यांचा महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, चिंतामण बुरसे यांचे वडील विष्णू बुरसे,आई स्वाती बुरसे, विद्युत विभागातील प्रशांत जोशी हे उपस्थित होते.

चिंतामणला आठवीत असल्यापासून भारतीय सैन्याचे पोस्टर्स पाहून भारतीय सैन्यात भरती होण्याची आवड निर्माण झाली. तेच ध्येय मनाशी बांधून त्याने सैन्यात भारती होण्याचे सातत्याने प्रयत्न केले. एनडीए येथे निवड होण्यासाठी तीन वेळेस लेखी परीक्षा दिली परंतु मुलाखतीमध्ये निवड झाली नाही अशा परिस्थितीतून स्वतःचा आत्मविश्वास ढळू न देता चिंतामणने पुन्हा जोमाने अभ्यास करत एनसीसी कोट्यातून परीक्षा दिली. त्यामध्ये त्याची लेफ्टनंट पदी निवड झाली.



**पिंपळे गुरव** चिंतामण विष्णू बुरसे यांचा भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदी झालेल्या निवडीबद्दल महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# बहिणाबाई प्राणिसंग्रहालयासाठी आणखी २४ कोटी खर्च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** येथील बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय नूतनीकरण आणि सुशोभीकरणासाठी नऊ वर्षांपासून बंद असून, आतापर्यंत २० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. आता तिसऱ्या टप्प्यातील कामे हाती घेण्यात आल्याने आणखी सव्वा वर्ष हे संग्रहालय खुले होण्यासाठी पर्यटकांना प्रतीक्षा करावी लागणार आहे. या आधी महापालिकेने जुनी निविदा रद्द केली. संग्रहालयासाठी एक तज्ज्ञ अधिकारी नियुक्त करण्यात आला होता. त्यानंतर सल्लागार



बदलण्यात आला. आराखड्यात बदल आणि सुधारणा करून फेरनिविदा प्रक्रिया राबविण्यात आली पात्र ठेकेदाराला तिसऱ्या टप्प्यातील काम देण्यात आले आहे. यासाठी २४ कोटी दोन लाख १६ हजार ६८ रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना पशु-पक्ष्यांची माहिती व्हावी, या उद्देशाने महापालिकेने चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये 'एमआयडीसी'च्या सात एकर जागेत १९८९ मध्ये बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान आणि प्राणी संग्रहालय उभारले. या संग्रहालयाच्या नूतनीकरणासाठी मे २०१६ ला सुरुवात झाली. तेव्हापासून संग्रहालयाला टाळे आहे.



"महामंडळाने महापालिका प्रशासनाला पत्र पाठवून केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या नियमानुसार या प्राणिसंग्रहालयाचे काम लवकरात लवकर सुरू करून ते पूर्ण करावे, पर्यटन वाढण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, त्याप्रमाणे सेवा-सुविधा निर्माण करावी"

**— आयुक्त शेखर सिंह**

### कोट्यवधी चा खर्च पाण्यात

- प्राणी संग्रहालयासाठी केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सर्पोद्यान व प्राणी संग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. संग्रहालयावर आतापर्यंत दोन टप्प्यांत २० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. नऊ वर्षे होऊनही प्राणिसंग्रहालयाच्या सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले नसून संग्रहालयास टाळे आहे.

संपादकीय विशेष

# राज्याचा विकास वेगाने, पण...

2024-25 या आर्थिक वर्षात महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नामध्ये दोन लाख 78 हजार रुपयांवरून 3 लाख 9 हजार रुपयांपर्यंत वाढ झाली असली, तरी देशपातळीवर दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागतो. गुजरातने निर्यातीबरोबर दरडोई उत्पन्नातही महाराष्ट्राला मागे टाकून पुढचे स्थान पटकावले आहे. आधी तेलंगण, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात आणि नंतर मग महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. 2023-24 मध्ये राज्याचा विकासदर आठ टक्के होता. यंदा, म्हणजेच 2024-25 मध्ये घसरून तो 7.3 टक्क्यांवर येईल. याचा अर्थ 'महाराष्ट्र थांबणार नाही' असे म्हटले जात असले, तरी तो फक्त प्रचाराचाच भाग आहे. उद्योगक्षेत्रात देशात वर्षानुवर्षे आपण अग्रेसर राहिलो. परंतु या क्षेत्राचा विकासदर गेल्या वर्षाच्या 6.2 टक्क्यांवरून घटून 4.9 टक्के होईल, असा अंदाज आहे. त्यातही उत्पादन किंवा निर्मितीक्षेत्रात 2023-24 मध्ये विकासदर 6.8 टक्के होता. घसरण होऊन यंदा तो 4.2 टक्के होण्याची शक्यता आहे. वास्तविक, शेतीमधून जास्तीत जास्त लोकांना बाहेर आणून उद्योगात सुस्थापित करायचे असेल तर निर्मितीक्षेत्राचा विस्तार व्हायला हवा. शेती आतबट्ट्याची असल्यामुळे, उत्पादनक्षेत्राची भरभराट होणे आवश्यक आहे. परंतु त्याऐवजी त्याच्या प्रगतीचा वेग मंदावणे, ही चिंतेची बाब आहे. उद्योगांप्रमाणे सेवाक्षेत्रात रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात. पण सेवाक्षेत्रातही 8.3 टक्क्यांवरून 7.8 टक्के अशी पिछेहाट झाली आहे.

आज महाराष्ट्रात कोट्यवधींची गुंतवणूक येत आहे, ही चांगली बाब आहे. परंतु त्या प्रमाणात रोजगारामध्ये वाढ होत असल्याचे दिसत नाही. गेल्या तीन वर्षांमध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या 58 लाखांवरून 70 लाखांपर्यंत वाढली आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद करण्याचे बंधन शासनावर आहे. परंतु चालू आर्थिक वर्षात महायुती सरकारने या खर्चाला लक्षणीय प्रमाणात कात्री लावली आहे. तसेच डबल इंजिन सरकार असल्याचे सांगितले जात असले, तरी यंदा केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीमध्ये 19 टक्क्यांची घट होणार असल्याची माहिती आर्थिक पाहणी अहवालात देण्यात आली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला 993 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. मागील वर्षी सर्वत्र उत्तम पाऊस झाल्यामुळे शेती आणि संलग्न क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षात 3.3 टक्के असलेला विकासदर यंदा 8.7 टक्क्यांवर गेला. परंतु यात राज्य सरकारचा असा काहीच वाटा नाही. उलट, राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र नक्की किती वाढले, याची आकडेवारी गेली बारा वर्षे दिली जात नाही. आजही राज्याची अर्थव्यवस्था सिंचनावर अवलंबून असून अन्य अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र खूप कमी आहे. कृषि प्रक्रिया उद्योग वाढले पाहिजेत, असे केंद्र आणि राज्य सरकार सतत सांगत असते. परंतु त्यासाठी कृषि सिंचनात लक्षणीय वाढ होणे आवश्यक आहे. राजकोषीय तूट कमी असावी अशी तरतूद असली, तरी यंदा आपण तुटीच्या सीमारेषेच्या जवळ आलो आहोत, ही नक्कीच काळजी करण्यासारखी बाब आहे.

महाराष्ट्रातील किरकोळ व्यापारात घट झाली आहे. म्हणजे, लहान-लहान दुकाने, चहा, किराणा वगैरे. त्याउलट ठोक व्यापारात रोजगाराचा टक्का वाढला आहे. वाहतूक सेवेतील रोजगाराची टक्केवारी कमी झाली आहे. पर्यटक, टॅक्सी, ऑटो रिक्षा यात आता पूर्वीसारखी रोजगारक्षमता राहिलेली नाही. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या टक्केवारीत घट झाली आहे. दुसरीकडे, वस्त्रोद्योग म्हणजेच टेलरिंगचे लहान लहान व्यवसाय किंवा छोटे कारखाने यात रोजगाराचा टक्का वाढला आहे. यातील बहुसंख्य महिला आहेत आणि त्यांचे शिलाईचे अगदी लहान, घरगुती स्वरूपाचे व्यवसाय आहेत. इथे टक्केवारी वाढते आहे. आर्थिक निकड भागवण्यासाठी यातील बहुतेक व्यवसाय केले जातात. यातून कुटुंबांवर वाढलेला आर्थिक ताण दिसतो. टपऱ्यांवर अवलंबून असलेल्या रोजगाराचे प्रमाणही वाढले आहे. यातूनही वाढलेला आर्थिक ताण दिसून येतो. घरकामातून रोजगार मिळवणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढले आहे. वित्तीय सेवांमधील रोजगाराची टक्केवारी वाढली आहे. यात प्रामुख्याने पतपेढी वगैरे रोजगार आहे. शेतीबाहेर रोजगाराची टक्केवारी वाढत आहे, हे चांगले; पण त्यातील बराच रोजगार आर्थिक ताणातून काही तरी करण्याची गरज असल्यामुळे केलेला, कमी उत्पादक, कमी मोबदला असलेला, लहान धंदे बंद पडून होत असलेला अस्थायी स्वरूपाचा आहे हे चांगले नाही. हे निष्कर्ष भारत सरकारच्या 'पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे'वरून काढले आहेत.

आज ग्रामीण महाराष्ट्राइतकी आर्थिक विषमता इतर कुठल्याही राज्यात नाही. पंजाब, कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार वगैरे राज्यांमध्ये ग्रामीण दारिद्र्य आणि विषमता हे दोन्ही घटक राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहेत. पंतप्रधानाच्या आर्थिक सल्लागार समितीने देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील महाराष्ट्राचा टक्का कमी झाल्याचा निष्कर्ष काढला आहे. पण महाराष्ट्राची 'आर्थिक पिछेहाट' झाली आहे किंवा नाही याबाबत ठोस निष्कर्ष काढायचा असेल, तर एवढेच पुरेसे नाही. देशाच्या औद्योगीकरणातील महाराष्ट्राचा टक्का कमी होत आहे. ही प्रक्रिया 2014-15 पासून अधिक वेगाने होत आहे. महाराष्ट्रातील रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. स्वयंरोजगार, खास करून महिलांचा स्वयंरोजगार वाढतो आहे. हा रोजगार प्रामुख्याने अगदी लहान-लहान व्यवसायातून आहे. यातील काही भाग तरी कुटुंबावर आर्थिक ताण वाढला, हे आहे. ग्रामीण महाराष्ट्रात दारिद्र्य आणि विषमता यांचे प्रमाण देशातील सरासरीपेक्षा जास्त आहे. एकूणच यावरून राज्याची आर्थिक स्थिती इतर काही राज्यांच्या तुलनेत घसरली आहे आणि शेतीव्यवस्थेने सध्या हात दिला असला, तरी उत्पादन आणि सेवाक्षेत्राने मात्र निराशा केली, असा त्याचा अर्थ आहे.

महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे आणि देशात सर्वाधिक करमहसूल गोळा करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा अधिक आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रात राज्याने स्वतःचाच विक्रम मोडला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलिकडेच म्हटले. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने 15 लाख 70 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करार केले. या करारांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्याचे प्रमाण 80 ते 90 टक्के आहे. असे असले तरी भूखंडवाटप केले जात असताना होणारा भ्रष्टाचार, खंडणी याबद्दलच्या उद्योजकांच्या तक्रारी दूर होणे आवश्यक आहे.

# व्याजदर घटणार? कर वाढणार?

**सरत्या आठवड्यामध्ये काही दखलपात्र आर्थिक घडामोडी समोर आल्या. सर्वप्रथम कर्जाचा व्याजदर आणखी कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली. त्याच वेळी संयुक्त अरब अमिरातीमध्ये भारत अमेरिकेपेक्षा मोठा गुंतवणूकदार ठरला आहे. तिसरी बातमी म्हणजे युपीआय आणि रुपे डेबिट कार्डच्या व्यवहारावर कर आकारण्याच्या हालचाली सुरु आहेत. दरम्यान, देशात जमिनीच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याचेही समोर आले आहे.**

अर्थनगरीतून

महेश देशपांडे

आर्थिक घडामोडींचे जाणकार

सरत्या आठवड्यामध्ये समोर आलेल्या दखलपात्र आर्थिक बातम्या महत्वपूर्ण आर्थिक तरतुदी आणि कामगिरीवर भाष्य करणाऱ्या आहेत.

सर्वप्रथम कर्जाचा व्याजदर आणखी कमी होणार का, याची चर्चा सुरु झाली आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे संयुक्त अरब अमिरातीमध्ये भारत अमेरिकेपेक्षा मोठा गुंतवणूकदार ठरला आहे. तिसरी बातमी म्हणजे युपीआय आणि रुपे डेबिट कार्डच्या व्यवहारावर कर आकारण्याच्या हालचाली अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत गोटामध्ये सुरु आहेत. दरम्यान, देशात जमिनीच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याचेही समोर आले आहे.

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक होत आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. केंद्र सरकारने किरकोळ महागाईचा आलेख जाहीर केला आहे. त्यानुसार महागाई दर चार टक्क्यांपेक्षा खाली आला आहे. सांख्यिकी विभागाने ही आकडेवारी जाहीर केल्यानंतर आनंदाची लहर दिसत आहे. या सांगाव्यामुळे पतधोरण समिती पुन्हा रेपो दरात कपात करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सांख्यिकी विभागाने प्रसिद्ध केलेल्या किरकोळ महागाईच्या आकड्यांनी सर्वसामान्यांनाच नाही, तर सरकारलाही दिलासा दिला. फेब्रुवारी महिन्यात महागाई दर घसरून 3.61 टक्क्यांवर आला आहे. जानेवारी महिन्यात हा आकडा 4.3 टक्क्यांवर पोहोचला होता. सरकार मार्च महिन्यातही किरकोळ महागाईचा आकडा आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. 7 ते 9 एप्रिलदरम्यान रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली पतधोरण समितीची बैठक होत आहे. या बैठकीत पुन्हा एकदा व्याजदर कपातीचा दिलासा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. श्री. मल्होत्रा हे गव्हर्नर झाल्यानंतर पहिल्यांदाच रेपो दरात कपात पहायला मिळाली होती. 7 फेब्रुवारी रोजी रेपो दरात 25 अंकांची कपात झाली. रेपो रेट 6.50 टक्क्यांवरुन 6.25 टक्क्यांपर्यंत घसरला. एप्रिल महिन्यात नवीन आर्थिक वर्ष सुरू होत आहे. मार्च महिन्यात किरकोळ महागाई दर कमी राहिल्यास रेपो दरात कपातीचे संकेत मिळत आहेत.

फेब्रुवारी महिन्यात खाद्य महागाई दरात मोठी घसरण दिसली. फेब्रुवारी महिन्यात खाद्य महागाई दर घसरून 3.75 टक्क्यांपर्यंत खाली आला. जानेवारी महिन्यात हा आकडा 5.97 टक्के इतका होता. भाजीपाल्याच्या किंमती घसरल्याने रिझर्व्ह बँकेला पतधोरण राबवताना रेपो दरात कपातीचा विचार करावा लागणार आहे. या महिन्यात धान्याच्या किंमती उतरल्या आणि खाद्य तेलाच्या किंमती कमी झाल्या, तर मार्च महिन्यातील आकडेवारीलाही दिलासा मिळू शकतो. त्यामुळे रेपो दरात पडझड दिसू शकते. येत्या काही दिवसांमध्ये महागाईचे आकडे घसरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अनेक भागांमध्ये रब्बीचे जोरदार उत्पादन झाल्याने हा आलेख खाली आल्याचा दावा करण्यात येत आहे.

आज भारताचा प्रभाव जगभरात वाढत आहे. तसेच भारत विविध देशांमध्ये गुंतवणूक करत आहे. जगात पर्यटन आणि सर्वात उंच इमारतींसाठी संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई शहर प्रसिद्ध आहे. या शहरात भारत सर्वात मोठा गुंतवणूकदार बनला आहे. दुबई सरकारच्या एका अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. भारताने 2024 मध्ये दुबईमध्ये 3.018 अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. दुबईची अर्थव्यवस्था आणि पर्यटक विभागाच्या दुबई एफडीआय मॉनिटरनुसार, त्या देशामध्ये सर्वाधिक गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक पहिला आहे. भारताने दुबईमध्ये 21.5 टक्के गुंतवणूक केली आहे. दुसऱ्या क्रमांकावर अमेरिका आहे. अमेरिकेने 13.7 टक्के, फ्रान्सने 11 टक्के, ब्रिटनने दहा टक्के गुंतवणूक केली आहे. स्वित्झर्लंडची गुंतवणूक 6.9 टक्के आहे. 2023 मध्ये दुबईमध्ये भारताची गुंतवणूक 589 दशलक्ष डॉलर्स होती. ती 2024 मध्ये चांगलीच वाढली आहे. ती आता 3.018 अब्ज डॉलर्स झाली आहे. यामुळे भारत दुबईतील पहिल्या क्रमांकाचा गुंतवणूकदार देश बनला आहे. आधी म्हटल्यानुसार दुबईतील गुंतवणुकीच्या यादीत भारताचे नाव अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, चीनसह सर्व विकसित देशांच्या पुढे आहे. 2024 मध्ये 'ग्रीनफिल्ड एफडीआय' प्रकल्पांची कामगिरी 2023 च्या 73.5 टक्के इतकी होती. त्याच वेळी, पुनर्गुंतवणूक एफडीआय प्रकल्प 2023 मध्ये 1.2 टक्क्यांवरून 2024 मध्ये 3.3 टक्क्यांपर्यंत वाढले आहेत.

भारताने 2023 मध्ये 249 प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली. ती वाढून 2024 मध्ये 275 झाली आहे. प्रकल्पाच्या संख्येत भारत तिसऱ्या क्रमांकावर होता. आता दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. भारताच्या गुंतवणुकीत सेवा क्षेत्राचा वाटा सर्वाधिक आहे. या क्षेत्रात भारताने 26.9 टक्के गुंतवणूक केली आहे. त्यापाठोपाठ सॉफ्टवेअर आणि आयटी क्षेत्रात 23.6 टक्के, उत्पादन क्षेत्रात 9.8 टक्के, खानपान क्षेत्रात 8.4 टक्के तर रिअल इस्टेटमध्ये 6.9 टक्के गुंतवणूक केली आहे. दुबईचे क्राऊन प्रिन्स शेख हमदान बिन मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांनी सांगितले की दुबईने जगातील मोठ्या गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे. रँकींगमध्ये जगभरात दुबई पहिल्या क्रमांकावर आहे. संयुक्त अरब अमिरातीचा विकास वेगाने होत असल्याचा हा पुरावा आहे. दुबईची ताकद जगाने ओळखली आहे.

आता एक बातमी आतल्या गोटातली. केंद्र सरकार युपीआय आणि रूपे डेबिट कार्डच्या व्यवहारांवर लक्ष ठेऊन आहे. युपीआय आणि रुपे कार्डचा सर्वाधिक वापर करणाऱ्यांचे व्यवहार सध्या रडारवर आले आहेत. या सुविधांचा वापर करणाऱ्यांना आता शुल्क आकारण्याचा केंद्र सरकारचा विचार आहे. याविषयीचा प्रस्ताव लवकरच आणण्यात येणार आहे. सध्या हे व्यवहार निःशुल्क आहेत. पण बँकांनी या व्यवहारावर शुल्क आकारण्याची मागणी लावून धरली आहे. दिवसभरात होणाऱ्या मोठ्या व्यवहारांवर शुल्क आकारण्याची मागणी करण्यात आली आहे. अर्थात काही दिवसांमध्ये छोटे व्यापारी आणि सर्वसामान्यांकडूनही शुल्क आकारणी होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

बँकिंग क्षेत्राने सरकारला याविषयीचा प्रस्ताव पाठवला आहे. त्यानुसार वार्षिक 40 लाख रुपयांपेक्षा अधिकचे व्यवहार रडारवर आले आहेत. या व्यवहारांवर मर्चंट शुल्क आकारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. बँका आणि पेमेंट कंपन्यांच्या म्हणण्यानुसार बडे व्यापारी व्हिसा, मास्टरकार्ड आणि क्रेडिट कार्डवर अनेक वर्षांपासून मर्चंट शुल्क देत आहेत. मग त्यांना युपीआय आणि रुपे कार्डवर मर्चंट शुल्क देण्यास काय हरकत आहे? अर्थात अनेक तज्ज्ञांच्या मते बँका भविष्यात छोट्या व्यापाऱ्यांवरही असेच शुल्क आकारू शकतात. सध्या मोठ्या व्यवहारांवर शुल्क आकारणीची मागणी होत आहे; पण पुढे व्यवहाराची मर्यादा कमी होऊ शकते. एका अंदाजानुसार, सरकार शुल्क वसुलीसाठी तीन टियर व्यवस्था आणू शकते. यामध्ये मोठ्या व्यापाऱ्यांकडून सर्वाधिक शुल्क वसूल करण्यात येईल तर छोट्या आणि किरकोळ व्यापाऱ्यांना कमी शुल्क द्यावे लागेल. मोठे व्यापारी डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून रोज लाखोंचे व्यवहार करतात. त्यांना हे शुल्क द्यावे लागू शकते, तर काही तज्ज्ञ भविष्यात सर्वसामान्य नागरिकांनाही डिजिटल पेमेंटसाठी माफक शुल्क द्यावे लागू शकते, असा दावा करत आहेत. डिजिटल पेमेंटने ग्राहक व्यवहार करत राहिल्यास मोठे व्यापारी त्यासाठी ग्राहकांकडून मर्चंट शुल्क आकारण्याची शक्यता आहे. सध्या क्रेडिट कार्डने वस्तू खरेदी केल्यास अनेक व्यापारी ग्राहकांकडून दीड ते दोन टक्क्यांपर्यंत व्यवहार शुल्क आकारले जाते.

आता वळू या पुढील खास वृत्ताकडे. अलिकडच्या वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात तेजी आली आहे. सदनिकांच्याच नव्हे, तर जमिनीच्या किमतीही झपाट्याने वाढल्या आहेत. रियल्टी क्षेत्रातील सल्लागार कंपनी 'जेएलएल इंडिया'कडून एक अहवाल आला आहे. जमिनीच्या किमती वाढण्यामागील नेमके कारण त्यात आहे. 'जेएलएल इंडिया'च्या मते देशात रिअल इस्टेट डेव्हलपर्सकडून जमिनीची मागणी वाढली आहे. 2022 ते 2024 या काळात रिअल इस्टेट डेव्हलपर्सनी जमीन खरेदीसाठी एकूण 90,000 कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. विकासकांनी एकूण 5,885 एकर जमीन संपादित केली आहे. मोठी गोष्ट अशी आहे की या डेटामध्ये फक्त रिअल इस्टेट डेव्हलपरद्वारे थेट खरेदी समाविष्ट आहे. मात्र देशभरात अनेक ठिकाणी विकासक आणि जमीनमालक सहकार्याने काम करतात. या जमिनीचे व्यवहार या अभ्यासात समाविष्ट केलेले नाहीत. एकूण जमिनीपैकी बेंगळुरू, चेन्नई, दिल्ली-एनसीआर, हैदराबाद, कोलकाता, मुंबई महानगर प्रदेश आणि पुणे या शहरांचा वाटा 72 टक्के आहे. टियर 2 आणि 3 शहरांमध्ये एकूण 28 टक्के जमीन संपादित करण्यात आली आहे.

खेचाखेची

## म्हणून ओळखलं

**शिक्षक:** एका आंब्याच्या झाडाला १०५ सफरचंद लागले त्यापैकी ५७ पेरू खाल्ले तर एकूण किती संत्रे शिल्लक राहतील ?

**विद्यार्थी** : सर एकूण १७५ अननस शिल्लक राहतील...!

**शिक्षक** : अरे बरोबर की... कसे काय ओळखले तू?

**विद्यार्थी** : सर आज सकाळी मी मेथीची भाजी खाल्ली म्हणून!

वेगळं काही

सेल्फीच्या वेडापायी एका तरूणाने ५० फूट उंच मनोऱ्यावर सायकल चढवली. इतकंच नाही तर सायकल तिथेच टाकून तो निघून गेला. मनोऱ्यावर चढवण्यात आलेली सायकल बघून लोक आश्चर्यचकीत झाले. मध्य प्रदेशमधल्या निमचमध्ये ही घटना घडली. वन विभागाकडून याबाबत पोलिसांना सूचना देण्यात आली. पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. हे २० वर्षांच्या रोहित सगरवालचं काम असल्याचं तपासाअंती समोर आलं. रोहित मनोरूग्ण आहे. विशेष म्हणजे तो मनोऱ्यांवर अगदी आरामात चढतो. निमचमधल्या जवळपास सगळ्या मनोऱ्यांवर तो चढला आहे. त्यामुळे पोलिसांनी कुटुंबियांना त्याच्यावर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला आहे.


फॅशन पॅशन

## साड्यांमधील वैविध्य



काही विशिष्ट रंगांच्या साड्या महिलांच्या अंगावर नेहमीच दिसून येतात. विशेषत: लग्न समारंभात याची हमखास प्रचिती येते. बरेचदा त्याच त्या रंगाच्या साड्या नेसून कंटाळाही येतो. काहीतरी वेगळं ट्राय करावंसं वाटतं. पण साड्यांच्या रंगांमध्ये एक्सपरिमेंट करताना मनात थोडी धाकधूकही असते. तुम्ही प्रयोगशील असलात तर साड्यांचे हे रंग नक्कीच ट्राय करता येतील.

✻ ब्लॅक अँड व्हाईट रंगाच्या साड्या कधीही नेसता येतील. हे कॉम्बिनेशन खूप छान दिसतं. कोणत्याही वयाच्या महिला ब्लॅक अँड व्हाईट साड्या कॅरी करू शकतात. ✻ मंजेटा रंग प्रत्येक वर्णावर शोभून दिसतो. समारंभ सकाळी असो किंवा रात्री, तुम्ही हा रंग कॅरी करू शकता. ✻ बटरस्कॉच येलो रंगाची सध्या चलती आहे. पिवळ्या रंगातली ही शेड खूप सुंदर दिसते. या रंगाची फ्लोरल साडी निवडा. पिवळ्या रंगावर फ्लोरल प्रिंट उठून दिसतात. या साडीसोबत गडद रंगाचं ब्लाउज घाला.✻ हिरवा रंग आवडत असल्यास मिंट ग्रीन साडी निवडा. हा थोडा सौम्य रंग असल्याने त्यावर गडद रंगाचं ब्लाउज शोभून दिसेल.




राशीभविष्य

- **मेष** : आलेल्या प्रसंगास धैर्याने तोंड द्यावं लागेल. तडजोडीस प्राधान्य द्यावं. कुसंगतीपासून दूर रहा.
- **वृषभ** : दुरावलेले मित्र जवळ येतील. प्रेमजीवनात अनुकूल स्थिती राहील. प्रयत्नांना यश मिळेल.
- **मिथुन** : मानसिक ताणाचा प्रकृतीवर परिणाम होईल. गैरसमजापासून दूर रहा. विचाराने रहायला हवं.
- **कर्क** : सामाजिक क्षेत्रात छाप पाडाल. अपेक्षित ध्येय गाठू शकाल. दृष्टिकोन सकारात्मक राहणार आहे.
- **सिंह** : झटपट फायद्यासाठी गैरमार्ग स्वीकारू नका. तुमचा सल्ला इतरांना लाभदायक ठरेल. चिंता नसावी.
- **कन्या** : कौटुंबिक आनंदात भर पडेल. मित्रांचं योग्य सहकार्य राहील. वैयक्तिक उत्कर्षाचा दिवस आहे.
- **तूळ** : परिवारातील कलहापासून अलिप्त राहा. गर्विष्ट लोकांपासून सावध रहा. गर्दीत ऐवज जपायला हवा.
- **वृश्चिक** : मनासारखा खर्च कराल. नातेवाईकांकडून अपेक्षापूर्ती होईल. प्रतिस्पर्ध्यावर मात कराल.
- **धनु** : कोणाच्याही चुका काढू नका. धार्मिक कार्याचा आनंद मिळेल. प्रवासात धावपळ, दगदग होईल.
- **मकर** : पती-पत्नीत मतभेद संभवतात. कोणताही निर्णय घाईत घेऊ नका. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **कुंभ** : भाग्यकारक घटना घडतील. कामाचा उत्साह वाढणार आहे. अपेक्षित यश मिळवून देणारा दिवस.
- **मीन** : मनासारख्या गोष्टी घडतील. अचानक धनलाभाचे योग आहेत. नवीन हितसंबंध निर्माण होतील.

सल्ला मोलाचा

## काश्मिरी दही लौकी

**साहित्य**– एक किलो दुधी भोपळा, एक किलो दही, एक टीस्पून वेलची पूड, एक इंच दालचीनी, ५–६ लसणाच्या पाकळ्यांची पेस्ट, एक टेबलस्पून बेसन, एक अंडं, एक टेबलस्पून बडिशेप पूड, पाणी, ५–६ पुदिन्याची पानं, दोन टेबलस्पून तेल, कोथिंबीर (सजावटीसाठी) मीठ चवीनुसार

**कृती**– दुधी भोपळ्याची साल काढून एक ते अर्धा इंचाचे उभे काप करून घ्यावेत. दुधीच्या बियाही काढाव्यात. एका कढईत पाव टेबलस्पून तेल घेऊन त्यात ते खरपूस तळून घ्यावेत. एका बाऊलमध्ये दही, मीठ, वेलची पूड, दालचीनी, लसणाची पेस्ट, बेसन आणि अंडं टाकून मिसळून घ्यावं. एका भांडयात मंद आचेवर वीस मिनिटं शिजवावं. एका कढईत दुधीचे तळलेले काप, बडिशेप पावडर, थोडं पाणी टाकून शिजवून घ्यावं. यात दह्याचं तयार केलेलं मिश्रण कढईत टाकावं. आता यावर थोडसं तेल, पाणी आणि कोथिंबीर टाकून वाफवून घ्या. ही ग्रेव्ही घट्ट होईपर्यंत शिजवा. कोथिंबीरीने सजवून पोळीसोबत सर्व्ह करा.

## २२ मार्च

दिनविशेष

- **१९८४** : मराठी पत्रकार, लेखक प्रभाकर आत्माराम पाध्ये यांचा मृत्यू.
- **२०१३** : दोघा भारतीय खलाशांच्या हत्येप्रकरणी संशयित असणारे इटलीचे खलाशी भारतात परतले.
- **२०१६** : बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स बॉंबस्फोटांनी हादरली. ३४ ठार.
- **२०१७** : ज्येष्ठ पत्रकार, लेखक गोविंद तळवलकर यांचे निधन.
- **२०१८** : केंब्रिज ॲनालिटिका डेटा लीकप्रकरणी फेसबुकचे सीईओ मार्क झुकेरबर्ग यांनी माफीनामा देत चूक मान्य केली.

महत्त्वपूर्ण काही...

## मार्केट रिसर्चच्या क्षेत्रात

कोणतं उत्पादन कधी बाजारात आणायचं, त्याचा ग्राहकवर्ग कोणता, उत्पादन कोणत्या पद्धतीने सादर करायचं याचं संशोधन करावं लागतं. याला मार्केट रिसर्च असं म्हटलं जातं. या क्षेत्रात करीअरच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. मार्केट रिसर्चची विभागणी तीन प्रकारांमध्ये करण्यात आली आहे. संशोधन, फिल्ड वर्क आणि डाटा विश्लेषण असे हे तीन प्रकार होत. संशोधन या विभागात बाजारपेठेशी संबंधित समस्यांचा शोध घेऊन माहिती जमवावी लागते. संशोधनाचे अहवाल आणि प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारीही याच लोकांवर असते. फील्ड वर्क अंतर्गत फोन, सोशल मिडियाच्या माध्यमातून किंवा घरोघर जाऊन सर्वेक्षण केलं जातं तर जमवलेल्या माहितीचा अभ्यास आणि विश्लेषण करून निष्कर्ष काढला जातो. मार्केट रिसर्चच्या क्षेत्रात विविध संस्था काम करत असतात. अशा कंपन्यांमध्ये तुम्ही विविध पदांवर नोकरी करू शकता. सरकारी क्षेत्रामध्येही बऱ्याच संधी आहेत. मार्केटिंग हा विषय घेऊन एमबीए केल्यानंतर तुम्ही या क्षेत्रात काम करू शकता.

आरोग्यमंत्र

## त्वचेविषयी...

त्वचा हा सजीवप्राणी, वनस्पती आणि मानवी शरीराचा एक अवयव आहे. या अवयवास स्पर्शाची जाणीव होते. त्वचा अनेक पदरांनी बनलेली असते. त्वचेची हानी झाली असता खपली धरून त्वचा परत भरून येते. खपलीचा रंग त्वचेपेक्षा वेगळा असतो. मानवी त्वचेचा रंग भौगोलिकतेनुसार भिन्न असल्याचं आढळतं. मानवी त्वचेचे अनेक पदर असल्यानं त्वचेची हानी झाली असता भरून यायला मदत होते. त्वचेच्या अगदी वरील भागात असलेल्या रक्तवाहिन्या अधिकाधिक सूक्ष्म होत जातात. त्वचेमुळे आतील स्नायू, हाडे कूर्चा आदी अवयवांचं रक्षण होतं. मानवी त्वचा रक्षणाचं कार्य करतेच शिवाय तापमान नियंत्रणाचंही काम करते. त्वचा ड जीवनसत्त्व शोषून घेते आणि ब जीवनसत्त्व राखून ठेवायला मदत करते. त्वचेची स्वच्छता राखण्याचा शरीर प्रयत्न करत असतं. घामातून स्रवणारी द्रव्यं त्वचेला मारक असणाऱ्या अनेक विषाणूंचा नाश करतात. त्वचेचा वरचा पदर सतत गळून जात असतो. यामुळे आपोआपच स्वच्छता राखली जाते. वय वाढताना त्वचेची ताणली जाण्याची शक्ती कमी होते आणि सुरकुत्या पडू लागतात. त्वचेला अनेक प्रकारचे विकार होऊ शकतात. अतिनील किरणांमध्ये जास्त वेळ राहिल्यास त्वचेचा कर्करोग उद्‌भवू शकतो. भाजलं असता त्वचेवर फोड येतात. त्वचा विकारांचं मुख्य कारण आजची बदललेली जीवन शैली आणि विषयुक्त रसायनांचा अति वापर आहे.



पंचांग

**शनिवार, २२ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. ८, नक्षत्र : मूळ,
चंद्रराशी : धनु, योग : व्यतिपात,
सूर्योदय : ६.४३, सूर्यास्त : ६.४८

फॉरवर्डस

मानसिक स्वास्थ्य हरवलेल्या स्थितीबाबत कवी म्हणतो...

**सकूं कहाँ ढूँढे
इस जहान में,
क्यूंकि लोग दिल से भी
दिमाग का काम लेते हैं!**

वाचा तर खरं

**बारावीनंतर** - ✻ तुम्ही कला शाखेचं शिक्षण घेत असला तर मानसशास्त्राशी संबंधित एखादा महत्त्वाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात. ✻ पर्यटनक्षेत्रात टुरिस्ट गाईडपासून मॅनेजमेंटपर्यंत विविध संधी आहेत. साहजिक या संदर्भातील अभ्यासक्रम पूर्ण करणं महत्त्वाचं ठरणार आहे. ✻ गणित आणि वनस्पतीशास्त्र या दोन्हींशी संबंधित चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात. उदा. येत्या काळात नॅनो टेक्नॉलॉजीच्या क्षेत्राचा बराच विस्तार होणार असून या क्षेत्रात खूप नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे बारावीनंतर नॅनो टेक्नॉलॉजीत बी. एस्सी., बी. टेक करणं फायद्याचं ठरेल.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### ड्रग्ज तस्करांच्या अनेक मालमत्ता उद्ध्वस्त

**नवी दिल्ली :** पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांनी शुक्रवारी सांगितले की, राज्य सरकारने अंमली पदार्थांच्या समस्येविरोधात लढा तीव्र केला आहे आणि राज्यातून अमली पदार्थांच्या समस्येचे उच्चाटन करण्यासाठी दृढ निश्चयाचा संदेश देण्यासाठी कथित अंमली पदार्थ तस्करांच्या अनेक मालमत्ता पाडण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी कटारिया पंजाब विधानसभेला संबोधित करत होते. अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत संपूर्ण साखळीतील आर्थिक साखळी तोडण्यावर विशेष भर देण्यात आला आहे, असे राज्यपाल म्हणाले.

### एक देश एक निवडणूक समर्थनार्थ मोर्चा

**नवी दिल्ली :** एकाच वेळी निवडणुका घेण्याची मागणी करणाऱ्या युवा संघटनेचे सदस्य २७ मार्च रोजी संसदेवर शांतता मोर्चा काढणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या धोरणावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करणारे निवेदन सादर करणार आहेत. सुशासन, राष्ट्रीय विकास आणि सार्वजनिक निधीच्या कार्यक्षम वापराला प्राधान्य देणाऱ्या निवडणूक सुधारणांवर तरुणांच्या नेतृत्वातील संविधान समर्थन ही चळवळ जोर देत आहे. या मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात २७ मार्च रोजी संसदेवर शांतता मोर्चा निघणार असून, या दरम्यान पंतप्रधानांना एक राष्ट्र, एक निवडणुकीवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करणारे औपचारिक निवेदन देण्यात येणार आहे.

# समृद्धी महामार्गावरील प्रवास महागणार

## १ एप्रिलपासून : टोलच्या दरात होणार वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नागपूर समृद्धी महामार्गावरून प्रवास करणे १ एप्रिलपासून महागणार आहे. समृद्धी महामार्गावरील टोल दरात वाढ करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने समृद्धीवरील टोलमध्ये १९ टक्क्यांची वाढ केली आहे. येत्या १ एप्रिल पासून ३१ मार्च २०२८ पर्यंत ही टोल वाढ लागू असणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लिमिटेड या कंपनीने ही माहिती दिली आहे.

नागपूर ते मुंबई या ७०१ किलोमीटर अंतरापैकी नागपूर ते इगतपुरी हा ६२५ किलोमीटरचा मार्ग सुरू झाला आहे. येत्या महिनाभरात इगतपुरी ते उर्वरित ७६ किमीचा मार्ग देखील सेवेत दाखल होणार आहे.

संपूर्ण महामार्ग खुला होण्यापूर्वीच एमएसआरडीसीने त्यांच्या टोलमध्ये मोठी वाढ केली आहे. डिसेंबर २०२२ मध्ये समृद्धी महामार्गावरील टोल दर जाहीर करण्यात आले होते. त्यावेळी कार व हलक्या वाहनांसाठी प्रति किलो मीटर १.७३ रुपये टोल आकारला जात होता. मात्र या टोलमध्ये १ एप्रिलपासून यात दरवाढ होणार आहे.





### नागपूर ते इगतपुरी किती टोल द्यावा लागणार?

| वाहने | सध्याचे दर | नवीन दर |
|---|---|---|
| कार, हलकी वाहने - | सध्याचे दर १०८० रुपये, | नवीन दर १२९० रुपये |
| हलकी, व्यवसायिक, मिनीबस - | सध्याचे दर १७४५ रुपये, | नवीन दर २०७५ रुपये |
| बस अथवा दोन एक्सेल ट्रक- | सध्याचे दर ३६५५ रुपये, | नवीन दर ४३५५ रुपये |
| तीन एक्सेल व्यवसायिक - | सध्याचे दर ३९९० रुपये, | नवीन दर ४७५० रुपये |
| अवजड बांधकाम यंत्रसामुग्री - | सध्याचे ५७४० रुपये, | नवीन दर ६८३० रुपये |
| अति अवजड वाहने - | सध्याचे दर ६९८० रुपये, | नवीन दर ८३१५ रुपये |




राजगुरूनगर शहरातील खळबळजनक घटना

# एकतर्फी प्रेमातून तरुणीवर चाकूने हल्ला



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** वारंवार मागणी करून देखील लग्नास नकारच देते म्हणुन वीस वर्षीय तरुणीवर चाकूने हल्ला केल्याची घटना राजगुरुनगर शहरात शुक्रवारी ( दि २१)घडली. शहरातील पडाळवाडी परिसरात सकाळी साडेआठ वाजता एका सोसायटीत घडलेल्या या घटनेने एकच खळबळ उडाली. पीडित तरुणी या हल्ल्यात गंभीर जखमी झाली असून हल्ला करणाऱ्या तरुणानेही स्वतः वर चाकुने गंभीर वार करून घेत आत्महत्येचाप्रयत्न केलाआहे.त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे खेड पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रभाकर मोरे यांनी सांगितले. शुभम अनिल खांडगे , वय २८ रा. पिंपळगाव वाणी , ता. जुन्नर असे हल्लेखोर आरोपीचे नाव आहे. तो पीडित मुलगी व परिवाराचा दूरचा नातेवाईक आहे.

याबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राजगुरुनगर शहरालगत पडाळवाडी येथील गणेश रेसीडेन्सी येथे पिडित मुलगी आपल्या आई व बहिणी बरोबर वास्तव्याला आहे. दूरचा नातेवाईक असल्याने आरोपी शुभम खांडगे याचा या परिवारात नियमित सहवास होता. गुरुवारी रात्री तो या परिवाराकडे जेवण करून हॉलमध्ये झोपला. तत्पुर्वी त्याने लग्नाचा विषय काढला व त्यावरुन वादही झाला होता.शुक्रवारी सकाळी पिडित मुलगी फ्लॅटच्या बाथरुममध्ये अंघोळीला गेली. शुभम खांडगे बंद बाथरूमच्या दरवाज्यावर लाथा मारून आत घुसला. त्यापूर्वी त्याने लग्न करायला नकार देत असल्याने राग मनात धरुन स्वयंपाक घरातील लोखंडी चाकु हातात आणला होता. अंघोळ करणाऱ्या पीडित मुलीवर हल्ला चढवला त्यावेळी ' तु माझेशी लग्न करत नाही, मी तुला जिवंत सोडणार नाही ' असे म्हणुन चाकुने तीच्या पोटावर, मानेवर वार करुन गंभीर जखमी करीत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात पीडित मुलगी गंभीर जखमी झाली. मुलीला वाचवण्यासाठी आई मध्ये आली असता तिच्या हातावर शुभम खांडगे याने चाकुने वार करुन जखमी केले. यानंतर भेदरलेल्या खांडगे याने स्वतःच्या गळ्यावर त्यात धारदार चाकूने वार करून गंभीर जखमी करून घेतले. तो रात्री पर्यंत बेशुद्ध अवस्थेत होता. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल मांडवे, पोलिस निरीक्षक प्रभाकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप सिसोदे करीत आहे.

पान १ वरून

### कर्नाटकात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण; विधानसभेत गोंधळ

याशिवाय, मुस्लिम आरक्षण विधेयक व हनी ट्रॅपच्या मुद्यावरून विधानसभेत गोंधळ सुरू असतानाच सरकारने मुख्यमंत्री, मंत्री आणि आमदारांच्या पगारात १०० टक्के वाढ करण्याचे विधेयक देखील मंजूर केले.

दरम्यान, यावरून कर्नाटकमधील विरोधी पक्ष असलेल्या भाजपने जोरदार विरोध केला आहे. तसेच, याबाबत कायदेशीररित्या आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे.

कर्नाटकातील मुस्लिम आरक्षण विधेयकावरून भाजप खासदार संबित पात्रा यांनी काँग्रेस व राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे. संबित पात्रा यांनी राहुल गांधींचा उल्लेख 'आलमगीर राहुलजेब' असा करत त्यांच्यावर टीका केली आहे. तसेच, त्यांच्यावर तुष्टीकरणाचा आरोप केला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना संबित पात्रा म्हणाले की, कर्नाटकमधील विधानसभेत आज एक विधेयक पारित झाले आहे, ज्यानुसार मुस्लिमांना २ कोटी रुपयांपर्यंतच्या सरकारी कंत्राटामध्ये ४% आरक्षण मिळेल. हे आरक्षण ओबीसी कॅटेगरी २बी मध्ये दिले गेले आहे, म्हणजेच ओबीसी आणि मागासवर्गींचे अधिकार हिरावून घेतले जात आहेत. तसेच, त्यांनी राहुल गांधींच्या सांगण्यावरून सिद्धरामैया सरकारने हे विधेयक आणले असल्याचा आरोप केला.

### नवनिर्वाचित आमदारांनी घेतली शपथ

आमदारांच्या सह्या नसल्याने हा अर्ज छाननीत बाद झाला. त्यामुळे पोटनिवडणूक बिनविरोध होणार हे स्पष्ट झाले. यानंतर पोटनिवणूक न घेता आज संदीप जोशी (नागपूर), संजय केनेकर (छत्रपती संभाजीनगर), दादाराव केचे (वर्धा), चंद्रकांत रघुवंशी (नंदुरबार) आणि संजय खोडके (अमरावती) यांना विधान परिषद सभागृहात शपथ देण्यात आली.

### शिवराज पाटील-मोदींची सदिच्छा भेट



या भेटीत कौटुंबिक, सामाजिक, राजकीय आणि आंतरराष्ट्रीय विषयावर चर्चा झाली. याप्रसंगी उपस्थित माझी मुलगी रुषिका, रुद्राली आणि जावई कुशाग्र सिंह यांच्यासोबत डिजिटल इंडिया आणि कायदा क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यासंदर्भात चर्चा केल्याचेही त्या म्हणाल्या.

### लाडकी बहिण योजना बंद होणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महायुती सरकारच्या काळात सुरू झालेल्या राज्यातील कुठल्याही योजना बंद करण्यात आल्या नाहीत. मी मुख्यमंत्री असतानाच्या कार्यकाळात सुरू झालेल्या योजना आजही सुरू आहेत.

शिवभोजन थाळी असेल, आनंदाचा शिधा असेल किंवा लाडकी बहीण योजना असेल ह्या योजना आजही सुरू आहेत, यापुढे देखील सुरूच राहतील, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना शब्द दिला आहे. राज्यातील एकही पात्र बहीण लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, असा शब्दच एकनाथ शिंदेंनी दिला.

# साहित्यिक सरस्वती मोरे यांना राज्यस्तरीय महिला गुणगौरव पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिघंची :** दिघंची (ता. आटपाडी, जि. सांगली) येथील इंद्रभाग्य शैक्षणिक संकुलात इंद्रभाग्य आदर्श प्राथमिक विद्यालयामध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत असणाऱ्या सरस्वती दयानंद मोरे यांना पुणे येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे महिला दिनाचे औचित्य साधून स्वप्नल फाउंडेशन पुणे तर्फे मान कर्तुत्वाचा सन्मान नेतृत्वाचा, असा राज्यस्तरीय महिला गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सरस्वती मोरे अनेक दिवसापासून सामाजिक क्षेत्रात कार्य करत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये त्या कार्यरत आहेत. तसेच त्या शिक्षिका असून दिघंची येथील इंद्रभाग्य शैक्षणिक संकुलात अध्यापनाचे कार्य करत आहेत. विशेष बाब म्हणजे त्या कवी लेखिका असून कमी कालावधीत त्यांनी साहित्यिक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना शाल श्रीफळ सन्मानचिन्ह व मेडल देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संदीप राक्षे सर, आयजी मंडलिक (सीआयडी), अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, होम मिनिस्टर खेळाचा बादशहा बाळकृष्ण नेहरकर, शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक लक्ष्मीकांत खाबिया, चला हवा येऊ द्याच्या सिने अभिनेत्री शिवकांता पवार, स्वप्नल फाउंडेशनच्या अध्यक्षा शोभा बल्लाळ , पैगंबर शेख डॉ. मनोज पाटील आधी मान्यवर उपस्थित होते.



### छत्रपती शिवरायांचे आग्रा येथे भव्य स्मारक...

यापैकीच मिर्झाराजे जयसिंग यांच्यासोबतचा सन १६६५ मध्ये केलेला "पुरंदर तह" असाच ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला गेला. या करारानुसार महाराजांनी अनेक किल्ले मुघलांना परत केले, तसेच या तहानुसार महाराज बाळराजे शंभुराजे आणि काही निवडक मावळ्यांसह मुघल दरबारात उपस्थित राहीले.

'आग्र्याहून सुटका' ही शिवाजी महाराजांच्या देदिप्यमान जीवनातील व स्वराज्याच्या इतिहासातील महत्वाची घटना, महाराजांनी रयतेसाठी स्वराज्य निर्माण केले. ते टिकवून ठेवण्यासाठी त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. यामध्ये मुघलांचे सरदार मिर्झा राजे जयसिंग यांच्याबरोबरच्या तहात अनेक गडकिल्ले मुघलांना द्यावे लागले. तसेच या तहातील अटीनुसार महाराजांना मुघल दरबारात उपस्थित रहावे लागले. त्याठिकाणी त्यांचा अपमान करण्यात आला. स्वाभिमानी महाराजांनी तत्काळ दरबार सोडला. पण मुघलांनी आग्रा येथे त्यांना नजर कैदेत ठेवले. पण अत्यंत चातुर्याने महाराज आग्रा येथून महाराष्ट्रात सुखरुप परतले. या इतिहासातील घटनेचा साक्षिदार असलेली व शिवाजी महाराज ज्याठिकाणी मुक्कामास होते ती जागा अधिग्रहीत करुन त्याठिकाणी स्मारक उभारणार आहे.

### एसएससी बोर्ड पुर्णत: बंद पाडण्याचा..

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनात शिक्षणमंत्र्यांनी राज्यात सीबीएसई पॅटर्न लागू करण्याची घोषणा केली आहे. राज्याला अतिशय उज्वल शिक्षण परंपरा आहे. पण तिच्याकडे दुर्लक्ष करून इतर बोर्डाचे अनुकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला ही अतिशय खेदजनक बाब आहे. या माध्यमातून राज्याचा एसएससी बोर्ड पूर्णत: बंद करण्याचा डाव या सरकारने आखला आहे असे दिसते, असा आरोप त्यांनी केला आहे. संत, सुधारक आणि शिक्षणाची उज्वल परंपरा असणा-या आपल्या महाराष्ट्राची ओळख या निर्णयामुळे पुसणार तर नाही ना अशी शंका वाटते. हा निर्णय अभिजात भाषा मराठी, संस्कृती आणि परंपरेला मारक ठरणार आहे. माझी राज्य सरकारला नम्र विनंती आहे की कृपया आपण या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणीही सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

# औरंग्याची कबर हटवण्यासाठी याचिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यात वादंग उसळले असतानाच, मुंबई उच्च न्यायालयात ती हटवण्याची मागणी करणारी याचिका दाखल झाली आहे. आरटीआय कार्यकर्ता केतन तिरोडकर यांनी ही याचिका दाखल केली असून, औरंगजेबाची कबर राष्ट्रीय स्मारकांच्या व्याख्येत बसत नाही आणि ती पुढच्या पिढीला काहीही शिकवत नाही, असा दावा त्यांनी केला आहे. केंद्र पुरातत्व विभागाने ती ऐतिहासिक वास्तूंच्या यादीतून वगळावी आणि राज्य सरकारने कायमची हटवावी, अशी मागणी याचिकेत आहे. यावर लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.

#### एनआयएचा तपास

● या प्रकरणाच्या गंभीरतेमुळे राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) चे दिल्लीचे पथक छत्रपती संभाजीनगरात दाखल झाले आहे. परभणी, जालना आणि नांदेडमध्येही संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पथके पाठवली आहेत. एटीएसची मदत घेत तपासाला गती देण्यात येत आहे. औरंगजेबाच्या कबरीभोवतीचा वाद आता कायदेशीर आणि सामाजिक स्तरावर नवे वळण घेण्याची शक्यता आहे.

तिरोडकर म्हणाले, कबर पुरातत्व यादीतून वगळली तर राज्य सरकारने ती कायमस्वरूपी हटवावी, जेणेकरून भविष्यात जातीय तणाव टाळता येईल. याचिकेत 'छावा' चित्रपटाच्या प्रदर्शनावर तात्पुरती बंदी घालण्याचीही विनंती आहे, कारण त्यामुळे वाद वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नागपूर दंगलीनंतर हे प्रकरण आणखी चिघळले असून, सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

औरंगजेबाच्या खुलताबाद (छत्रपती संभाजीनगर) येथील कबरीवरून गेल्या काही दिवसांपासून वातावरण तापले आहे. हिंदुत्ववादी संघटनांनी कबर हटवण्यासाठी आंदोलने तीव्र केली आहेत. १७ मार्च रोजी नागपूरमध्ये या मुद्द्यावरून दंगल उसळली, ज्यामुळे मराठवाड्यातही तणावाची चिन्हे दिसू लागली आहेत. कबर सध्या झाकून ठेवण्यात आली असून, परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त आहे.

### गोरेंवर आरोप करणाऱ्या महिलेस अटक

घेतली. पण अटक पूर्व जामीन फेटाळला गेला त्यानंतर त्यांना दहा दिवस जेलमध्ये राहावं लागलं. त्यानंतर महिलेला एक निनावी धमकीचे पत्र आल्यावर तिने पुन्हा एकदा गोरेंवर आरोप केले आहेत. मला सहा वर्षांमध्ये मंत्र्यांच्या कार्यकर्त्यांनी त्रास दिला. मी कलेक्टर आणि पोलीस अधीक्षकांना सर्व माहिती सांगून देखील त्यांनी दखल घेतली नाही. मात्र जयकुमार गोरे यांनी त्यांच्यावर केलेले हे सर्व आरोप फेटाळून लावले. दरम्यान संबंधित महिलेने हे प्रकरण दाबण्यासाठी तीन कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. त्यामधील एक कोटी घेत असताना पोलिसांनी अटक केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिसांनी महिलेला अटक का केली, याबाबतची माहिती सांगितली. ते म्हणाले, अश्लील फोटोचे प्रकरण मिटवण्यासाठी आरोप करणाऱ्या महिलेने वाई येथील काँग्रेसचे कार्यकर्ते विराज शिंदे यांच्याकडे तीन कोटी रुपये जयकुमार गोरे यांनी द्यावे अशी मागणी केली होती.त्यानुसार त्यांच्यात बोलणी होऊन सुरुवातीला एक कोटी रुपये द्यायचे ठरले होते. अखेर हे पैसे घेत असताना पोलिसांनी या महिलेला अटक केली आहे. त्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

### दिशा प्रकरणी...

केली आहे. आपल्या मुलीच्या मृत्यूप्रकरणाची नव्याने चौकशी करण्याची मागणी करत सतीश सालियान यांनी दिशाच्या शरीरावर उंच इमारतीवरून पडल्यानंतर जखमेच्या खुणा नाहीत किंवा जमिनीवर किंवा कपड्यांवर रक्ताचे डाग असायला हवे तसे नाहीत, याकडे लक्ष वेधले होते.

### उद्धव ठाकरेंसोबत युती नाहीच:..

पण राज ठाकरेंसोबत संपर्क आहे, असे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याबाबतही फडणवीसांनी स्पष्ट मत मांडले. दोघांमध्ये नाराजी नाट्य नाही. काही प्रश्न असतील तर आम्ही एकत्र बसून सोडवतो. शिंदे शिवसैनिक असल्याने भावनिक आहेत, तर अजित दादा प्रॅक्टिकल आहेत, असे त्यांनी नमूद केले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडच्या अटकेनंतर धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला होता. यावर फडणवीस म्हणाले, वाल्मीक कराड हा मुंडे यांचा जवळचा सहकारी होता. जनभावनेचा विचार करूनच हा राजीनामा घेतला. मुंडे यांचे या प्रकरणात नाव नाही. जर कोणी पुरावे आणले तर चौकशी आणि कारवाईला तयार आहोत, पण उगाच हवेत तीर मारण्यात अर्थ नाही, असेही त्यांनी सांगितले.

### अतिमुसळधारचे राज्यावर सावट

बोलायचं झाल्यास हवामान विभागाकडून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना पुढील दोन दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार विदर्भात आज वादळी वा-यासह पावसाची शक्यता आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांना आज येलो तर काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**पुढील ४८ तास जोरदार पाऊस**

आयएमडीने दिलेल्या इशार्यानुसार पुढील दोन दिवस पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रामध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील ४८ तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. अमरावती, वाशिम, नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना येलो अलर्ट, तर यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाकडून ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. सध्या नागपूरसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण आहे.

**जाहिर नोटीस**

[illegible]

**Public notice**

Notice is hereby given that one Vikas Baban Kumbhar and Shobha Vikas Kumbhar (herein after referred to as the said mortgagor) have agreed to create mortgage in respect of the G.P. property more particularly described in the schedule hereunder in favor of my/our client [illegible] capital and housing [illegible] ltd [illegible] Dist Solapur in respect of the property described herein. That the said property originally owned and in possession of Baban Nivrutti Kumbhar after his death said property came in to the name of Vikas Baban Kumbhar as heir of Baban Nivrutti Kumbhar and As per the G.R. name of Shobha Vikas Kumbhar also shown in owners column of property extract. So I have given this notice to all persons having any claim against or in respect the said G.T.S property more particularly described in the schedule hereunder or any part thereof by way of sale, exchange, mortgage (Equitable or registered or otherwise) Gift, trust, inheritance family arrangement, maintains, bequest, partnership, possession lease sublease tenancy license, lien charge, pledge, easement or otherwise howsoever are hereby requested to notify the same in writing to me / us with supporting documentary evidence at the address mentioned herein below within 14 days from the date hereof, failing which the claim or claims if any of such person or persons will be considered to have been waived and or abandoned and my client shall proceed with disbursement of loan and creation of mortgage in respect of thereof.

DESCRIPTION OF THE PROPERTY

[illegible] within the limit of village [illegible]wadi Tal. [illegible] Dist. Pune

East:- Maruti [illegible]

South:- House Sanjay Shivaji Aw[illegible]

West:- House of Parvati Vijaykumar Kate

North:- House of Santosh Mahadev Mane

Place-[illegible]

Dt [illegible] 2025

Adv. R.S Shinde

# न्यायाधीशांच्या घरात नोटांचा ढीग

## वकिलांच्या संघटनेने केली चौकशीची मागणी, अलाहाबाद येथे केली बदली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** न्यायाधीशांच्या निवासस्थानाला लागलेली आग विझवण्यास गेलेल्या अग्मिशामक दलाच्या जवानांच्या हाती कोट्यवधींचे घबाड लागले आहे. हे प्रकरण आता सुप्रीम कोर्टापर्यंत गेले आहे. न्यायाधीशांच्या घरी बेहिशेबी कोट्यवधींची रोकड आढळल्याने न्याय व्यवस्था हादरली आहे. सुप्रीम कोर्टाने या घटनेवर कठोर पावले उचलण्यास सुरवात केली आहे.

न्यायाधीशांच्या घरी बक्कळ कॅश आढळल्याने सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करण्यात आली आहे. संबधीत न्यायाधीशांची दुसरीकडे उचलबांगडी करण्यात आली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी घरी नोटांचे ढीग आढळले आहेत. त्यांची बदली आता अलाहाबाद येथे करण्यात आल्याची माहिती आहे. यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी आग लागली तेव्हा ते बाहेर गावी होते.

आगीची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी पोलिस आणि अग्निशमक दलाला दिली. पोलिस त्यांच्या घरी आग आटोक्यात आणण्यासाठी आले तेव्हा त्यांना एका खोलीमध्ये कोट्यवधींची रक्कम दिसली, ही रक्कम बेकायदा असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेची चौकशी केंद्रीय गुन्हे शाखा (सीबीआय) आणि ईडी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या घटनेनंतर ही माहिती देशाचे मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांच्या कानावर घालण्यात आल्याची माहिती आहे. त्यानंतर संजीव खन्ना यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत बैठक बोलावली.

यशवंत वर्मा यांची लगेचच बदली करण्यात आली. त्यांना अलाहाबाद येथे पाठवण्यात आले आहे. न्यायाधीश वर्मा हे यांची येथून तीन वर्षापूर्वी दिल्ली उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. या गंभीर प्रकरणानंतर वर्मा यांची नुसती बदली करुन चालणार नाही, तर त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी वकीलांनी केली आहे. त्यांना राजीनामा देण्यास सांगितले असल्याचे समजते. त्यांनी राजीनामा दिला नाही तर त्यांची विभागीय चौकशी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकरणानंतर अनेक ज्येष्ठ वकिलांनी न्यायाधीशांच्या चौकशीची मागणी केली होती. सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष आदिश अग्रवाल यांनीही कॉलेजियमने न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरील आरोपांची सखोल चौकशी करावी आणि अंतर्गत चौकशी करावी, अशी मागणी केली.


सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील कॉलेजियमने तातडीने कारवाई करत न्यायमूर्ती वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी तातडीची बैठक घेतली. प्राथमिक चौकशी सुरू करणे हे केवळ एक पाऊल असून कॉलेजियम यासंदर्भात पुढील कारवाई करू शकते, असे सांगण्यात आले आहे. कॉलेजियमची शिफारस केंद्राने स्वीकारल्यानंतर न्यायमूर्ती वर्मा यांची प्रस्तावित बदली अंमलात येण्याची शक्यता आहे.

# तिरुपती मंदिरात हिंदूंनाच नोकरी

## देवस्थान पुन्हा एकदा आले चर्चेत

आंध्र प्रदेशमधील तिरुमला-तिरुपती देवस्थानम म्हणजेच प्रसिद्ध तिरुपती मंदिर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. तिरुपती मंदिरात केवळ हिंदूंनाच नोकरी दिली पाहिजे, असे वक्तव्य आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी व्यक्त केले आहे. चंद्राबाबू नायडू हे देवदर्शनासाठी आले होते. ते त्यांचा मुलगा नारा लोकेश आणि कुटुंबीयांसह तिरुमला येथील भगवान वेंकटेश्वर स्वामी मंदिरात पूजा-अर्चना करण्यासाठी पोहोचले होते. यावेळी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले.





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती :** यावेळी बोलताना चंद्राबाबू नायडू म्हणाले की, तिरुपती मंदिरात केवळ हिंदूंनाच नोकरी दिली पाहिजे. सध्या इतर समुदायांचे लोक येथे काम करत असतील, तर त्यांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घेत त्यांना अन्य ठिकाणी काम दिले जाईल.

मंदिरात इतर समाजाची नागरिक काम करत असल्यास त्यांना इतर ठिकाणी नोकरी दिली जाईल, असे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी बोलताना त्यांनी देशभरातील सर्व राज्यांच्या राजधानी शहरांमध्ये वेंकटेश्वर स्वामींचे मंदिर उभारण्याच्या योजनेबाबत देखील माहिती दिली. अनेक भक्त विदेशातही अशी मंदिरे स्थापन करण्याची इच्छा व्यक्त करत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच, तिरुमलाच्या डोंगरांवर कोणत्याही प्रकारच्या व्यावसायिक गोष्टींना परवानगी नसल्याची माहिती चंद्राबाबू नायडू यांनी दिली. त्यांनी सांगितले की, मागील सरकारने मंदिराच्या जवळच ३५.३२ एकर जमिनीवर मुमताज हॉटेल उभारण्यास परवानगी दिली होती, पण त्यांच्या सरकारने ती मंजुरी रद्द केली आहे. या क्षेत्रात कोणत्याही खासगी संस्थेला व्यवसाय करण्याची परवानगी दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# कर्नाटकात होतोय हनी ट्रॅपचा वापर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** कर्नाटकामध्ये हनीट्रॅपचे प्रकरण समोर आले आहे. यामध्ये एक-दोन नव्हे तर तब्बल ४८ मंत्री, आमदार अडकल्याची माहिती समोर आली आहे. कर्नाटकची राजधानी बंगळुरूतील दोन मंत्री आणि कर्नाटकातील बड्या मंत्र्यांना हॅनीट्रॅपमध्ये अडकवण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये जे नेतेमंडळी अडकले आहेत, त्यांना राजकारणातून संपवण्याच्या हेतूने हॅनीट्रॅपचा प्रयत्न केला आहे, अशी चर्चा सुरु आहे.

या आरोपांबाबत गुरुवारी विधानसभेत चांगलाच विषय गाजला. सत्तारुढ आणि विरोधी पक्षातील सुमारे ४८ नेत्यांना यामध्ये गोवण्यात येत असल्याबाबत दीर्घ चर्चा करण्यात आली. सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष पोलिस दल (एसआयटी) स्थापनेची घोषणा केली आहे. भाजप आमदार बसनगौडा पाटील यत्नाळ यांनी काही प्रभावी नेत्यांना हनीट्रॅपमध्ये अडकवण्यात येत असल्याचा विषय विधानसभेत मांडला. त्यावर सत्तारुढ आणि विरोधी पक्षातील आमदारांनी पक्षभेद विसरुन चर्चा केली. गृहमंत्री डॉ. जी. परमेश्वर यांनी हा विषय गंभीर असून यामागील सूत्रधार उघडकीस आला पाहिजे असे सांगितले. एसआयटीकडे हे प्रकरण सोपवण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

सहकारमंत्री के. एन. राजण्णा यांनी याविषयी संबंधितांनी गृहमंत्र्यांना लेखी तक्रार दिल्यास बरे होईल, असा सल्ला दिला. काही दिवसांपासून कर्नाटक हा सीडी आणि पेन ड्राईव्हचा कारखाना बनला आहे. यामागील दिग्दर्शक, निर्माता समोर येणे गरजेचे आहे. यामधील अभिनेते आणि अभिनेत्रींबाबतही कुतूहल आहे.

### हनी ट्रॅप म्हणजे नेमकं काय?

● हनी ट्रॅप हा एखादी गोपनीय माहिती बाहेर काढण्याचा मार्ग समजला जातो. यामध्ये सुंदर महिलांचा समावेश होतो. शत्रू देशाची गुप्त माहिती बाहेर काढण्यासाठी संबधित देशाच्या मोठ्या पदावरील व्यक्तीला यात टार्गेट केले जाते. या शिवाय मोठ्या व्यक्तीच्या जवळच्या माणसाला ही या ट्रॅपमध्ये अडकवले जाऊ शकते. काही चालकही यात फसले असल्याची उदाहरणे आहे. या प्रकारात एखाद्या व्यक्तीशी प्रेम किंवा लैंगिक संबंध निर्माण केले जातात. त्यातून संबंधित व्यक्तीकडून गोपनीय माहिती काढून घेतली जाते. असा प्रकार या हनीट्रॅपमधून केला जातो. त्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

# आम आदमी पार्टीत मोठे फेरबदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी मोठे निर्णय घेतले आहे. त्यांनी आज (२१ मार्च) माजी आमदार सौरभ भारद्वाज यांची दिल्ली प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्यांनी माजी मंत्री गोपाळ राय यांची जागा घेतली आहे. गोपाल राय यांना आता अरविंद केजरीवाल यांनी गुजरातला पाठवले आहे, त्यांना तिथे प्रभारी म्हणून नियुक्त केले आहे. तसेच उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्याकडे सर्वात महत्त्वाच्या पंजाब राज्याची जबाबदारी सोपवली आहे. त्यांना प्रभारी बनवण्यात आले आहे.

राज्यसभा खासदार संदीप पाठक यांना छत्तीसगडचे प्रभारी, तर पंकज गुप्ता यांना गोव्याचे प्रभारी बनवण्यात आले आहे. आपने जम्मू आणि काश्मीरमध्ये मेहराज मलिक यांना प्रदेशाध्यक्ष बनवले आहे. ते राज्यातील आपचे एकमेव आणि पहिले आमदार आहेत. दरम्यान, आम आदमी पक्षाला (आप) अलीकडेच दिल्लीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यानंतर पक्षाने हा बदल केला आहे. पक्षासमोर पंजाब वाचवण्याचे आव्हान आहे. अशा परिस्थितीत सिसोदिया यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे.



हैती हैतीमधील पोर्ट-औ-प्रिन्स येथे आंदोलनादरम्यान हिंसाचार उफाळून आला. अशा परिस्थितीतही कामावर जाणाऱ्या युवकाचे टिपलेले हे छायाचित्र.

# १ एप्रिलपासून निष्क्रिय नंबर होणार बंद




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सध्या मार्केटमध्ये बहुतांशी व्यवहार हे चलनाद्वारे न होता, युपीआयद्वारे होत आहेत. यासाठी गुगल पे, फोन पे आणि अन्य ॲप वापरले जातात. दरम्यान, युपीआय युजरसाठी मोठी बातमी आहे. युपीआयला जोडलेले फोन नंबर वापरात नसतील, ते निष्क्रिय असतील, तर ते १ एप्रिलपासून बंद करण्यात येणार आहेत, असे वृत्त आहे.

१ एप्रिल २०२५ पासून नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया निष्क्रिय मोबाइल नंबरशी लिंक केलेले यूपीआय आयडी डिलिंक करण्यास सुरुवात करेल. यामुळे प्रभावित युजर्सच्या डिजिटल पेमेंटमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. ही समस्या टाळण्यासाठी, तुमच्या बँक रेकॉर्ड तुमच्या सध्याच्या मोबाइल नंबरसह अपडेट केल्या आहेत याची खात्री करावी, असेदेखील कंपनीने म्हटले आहे.

एनपीसीआयने म्हटले आहे की, १ एप्रिल पासून, ते निष्क्रिय मोबाइल नंबरशी लिंक केलेले यूपीआय आयडी डिलिंक करण्यास सुरुवात करेल. जर नोंदणीकृत मोबाइल नंबर निष्क्रिय असतील तर व्यवहारांसाठी गुगल पे, फोनपे, पेटीएम आणि इतर यूपीआय ॲप्स वापरणाऱ्या युजर्सवर याचा परिणाम होऊ शकतो.


जर तुमचा फोन नंबर बराच काळ निष्क्रिय असेल, तर बँका त्यांच्या रेकॉर्डमधून तो काढतील आणि खात्यासाठी यूपीआय सेवा निलंबित केल्या जातील. बँकिंग सिस्टममधील तांत्रिक त्रुटी टाळण्यासाठी आणि फसवणुकीचा धोका कमी करण्यासाठी बँका हे करत आहेत, विशेषतः जेव्हा पुन्हा नियुक्त केलेले नंबर जुन्या बँक खात्यांशी जोडलेले राहतात. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव कंपनीकडून पावले उचलण्यात येत आहेत.

बँकिंग क्षेत्र आणि युपीआय सिस्टीममध्ये निष्क्रिय नंबरमुळे निर्माण होणाऱ्या सायबर फसवणुकीच्या वाढत्या धोक्याला आणि तांत्रिक समस्यांना प्रतिसाद म्हणून हा बदल केला आहे. जेव्हा टेलिकॉम कंपन्या नवीन ग्राहकांना जुने नंबर पुन्हा वाटप करतात, तेव्हा ते सुरक्षिततेला धोका निर्माण करते, ज्यामुळे बँकिंग सुविधांमध्ये अनधिकृत प्रवेश होऊ शकतो. याला प्रतिसाद म्हणून, एनपीसीआयने बँका आणि यूपीआय प्लॅटफॉर्मना त्यांचे रेकॉर्ड साप्ताहिक आधारावर अपडेट करण्याचे निर्देश दिले आहेत.



## केरळमध्ये पोलिसांवर हल्ला करणाऱ्या सहा जणांना अटक

**कोट्टायम (केरळ) :** मध्य केरळमधील मरंगट्टुपल्ली या छोट्याशा शहरात अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान कर्तव्यावर असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. या घटनेत मरांगट्टुपिल्ली पोलिस ठाण्याचे महेश, शरत आणि श्यामकुमार हे तीन वरिष्ठ पोलिस अधिकारी (हेड कॉन्स्टेबल) जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वायाला वेल्लक्कल येथील बंडरोड परिसरात अंमली पदार्थांची तस्करी करणारी टोळी कार्यरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुरुवारी सायंकाळी सातच्या सुमारास एक पथक तेथे दाखल झाले.



## त्रिपुरा सरकारने सादर केला करमुक्त अर्थसंकल्प

**नवी दिल्ली :** त्रिपुराचे अर्थमंत्री प्रणजित सिंह रॉय यांनी शुक्रवारी २०२५-२६ साठी ३२,४२३.४४ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला, ज्यात नोकरी शोधणारे, मतिमंद व्यक्ती, राज्याच्या राजधानीत येणारे पर्यटक आणि इतरांच्या मदतीसाठी एकूण १३ नवीन कल्याणकारी योजनांचा प्रस्ताव आहे. ४२९.५६ कोटी रुपयांची तूट असलेल्या अर्थसंकल्पात कोणताही नवीन कर प्रस्तावित करण्यात आलेला नाही. अर्थसंकल्पात अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी ७ हजार ९०३ कोटी रुपयांची तरतूद करून भांडवली खर्चावर भर देण्यात आला होता.

## तामिळनाडूत हिंदी लादण्याचा आरोप

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय शिक्षण धोरणातील त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीवरून राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूतील राज्यसभेच्या खासदारांनी केंद्र सरकार राज्यावर हिंदी भाषा लादत असल्याचा आरोप केला आहे. नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि त्याअंतर्गत प्रस्तावित त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीवरून तामिळनाडू सरकार आणि केंद्र सरकारमध्ये मतभेद आहेत. गृह मंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चेत भाग घेताना एमडीएमकेचे प्रमुख वायको यांनी आपत्ती निवारण निधी देणाऱ्या गृह मंत्रालयाकडून राज्याला त्रास दिला जात असल्याचा आरोप केला.



## सुकमा येथे तिघांचे आत्मसमर्पण

**सुकमा :** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात दोन लाखरुपयांचे बक्षीस असलेल्या महिलेसह चार नक्षलवाद्यांनी शुक्रवारी सुरक्षा दलांसमोर शरणागती पत्करली. महिला नक्षलवादी कलमू आयते (३५) आणि त्यांचे पुरुष सहकारी नुप्पो रघू (२७), मडकम कोना (२२) आणि सोढी लच्छा (२७) यांनी 'अमानुष आणि पोकळ' माओवादी विचारसरणीबद्दल नाराजी व्यक्त केली. बस्तर भागात दोन वेगवेगळ्या चकमकीत सुरक्षा दलांनी ३० नक्षलवाद्यांना कंठस्नान घातल्यानंतर दुसऱ्याच दिवशी हे आत्मसमर्पण करण्यात आले.

## सिलिगुडीतील बंगाली भाषा बंधनकारक

**सिलिगुडी :** उत्तर बंगालमधील सिलिगुडी शहरात सर्व फलक, होर्डिंग्ज आणि फलकांवर इतर भाषांबरोबरच बंगाली भाषेचाही समावेश असणे बंधनकारक करण्यात आले आहे, अशी माहिती पालिकेचे अध्यक्ष गौतम देब यांनी शुक्रवारी दिली. सिलीगुडी महानगरपालिकेने (एसएमसी) एक निर्देश जारी केला आहे की दुकाने, कंपन्या, शॉपिंग मॉल्स, कार्यालये, रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, रुग्णालये आणि निदान केंद्रांमधील फलकांवर इतर भाषांव्यतिरिक्त बंगाली भाषेचा समावेश करणे आवश्यक आहे. देब यांनी स्पष्ट केले की या निर्णयाचा उद्देश बंगालच्या भाषिक वारशाचा प्रचार आणि संवर्धन करणे आणि सर्व रहिवाशांसाठी सर्वसमावेशकता सुनिश्चित करणे आहे.

## दौंड तालुका खरेदी विक्री संघ अध्यक्षपदी शिवाजी ढमाले

**दौंड :** दौंड तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी शिवाजी ढमाले यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यापूर्वीचे संघाचे अध्यक्ष विजय नागवडे यांचा कार्यकाल पूर्ण झाल्याने त्यांनी राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त होते. या रिक्त पदासाठी ढमाले यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी स्वाती कोळपे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यापूर्वीचे माजी उपाध्यक्ष जयवंत गिरीमकर यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांनी राजीनामा दिल्याने उपाध्यक्ष पद रिक्त झाले होते.यावेळी स्वाती कोळपे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे कोळपे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी ए.आर. मिसाळ यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. निवड होताच माजी आमदार रमेश थोरात यांनी दोन्ही अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचा सत्कार केला.यावेळी माजी आमदार रमेश थोरात, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष उत्तम आटोळे, बाजार समितीचे माजी सभापती दिलीप हंडाळ,संचालक पोपटराव ताकवणे,सत्वशील शितोळे, राहुल आव्हाड,मोहन टुले,संजय धायगुडे,आदीसह संचालक मंडळ उपस्थित होते.

## कानिफनाथ गडावर रंगपंचमी उत्साहात

**सासवड :** बोपगाव (ता. पुरंदर) येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र कानिफनाथ गडावर बुधवारी रंगपंचमी (आनंदोत्सव यात्रा) पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरी झाली. गडावर आणि मंदिराच्या शिखरावर भाविकांनी रंगांची उधळण केली. फाल्गुन कृष्ण पंचमी रंगपंचमीनिमित्त बुधवारी पहाटे मंदिरात श्री नवनाथ देवस्थान पंच कमिटी ट्रस्टच्या वतीने दही, दूध आणि पंचामृताचा अभिषेक व पूजा करण्यात आली. दुपारी १२ वाजता नाथांची आरती झाली. त्यानंतर १२.३० वाजता पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रथम देवांच्या अंगावर रंग शिंपण्यात आला. मंदिराच्या शिखरावरून भाविकांच्या अंगावर रंगांची शिंपण करण्यात आली. या वेळी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होती. सर्व परिसर रंगांनी रंगून गेला होता. ही यात्रा उत्साहात पार पडली. सकाळी ९ वाजता बोपगाव येथून नामदेव कुंभार यांच्या घरातून पालखी व काठीचे पूजन होऊन पालखी तसेच काठी भैरोबा मंदिरात आली. तेथून पालखी आणि मानाची शिखर काठी वाजतगाजत कानिफनाथ मंदिरावर गेली. त्यानंतर सासवड, भिवरी, गराडे, चांबळी, औताडवाडी, होळकरवाडी, वडकी, उरुळी देवाची येथील मानाच्या शिखर काठ्यांनी रंगपंचमी आनंदोत्सव यात्रेत सहभाग घेतला. रंगपंचमीनिमित्त अन्नदान सेवा ह.भ.प. बाजीरावनाना औताडे आणि मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांनी गजगोपाळ जेऊ घातले.

## पुण्याला मिळणार दोन अतिरिक्त जिल्हाधिकारी




**पुणे :** पुणे जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या आणि महसूल विषयक कामाचा वाढता व्याप लक्षात घेता पुणे जिल्ह्याच्या प्रशासकीय क्षमतेत लवकरच मोठी वाढ होणार आहे. या जिल्ह्यांच्या प्रशासकीय कामाचे विभाजन करण्याच्या सरकारच्या धोरणानुसार पुणे जिल्ह्यात दोन नवे अतिरिक्त जिल्हाधिकारी लवकरच रुजू होणार आहेत. या संदर्भातील प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी राज्य सरकारकडे सादर केला असून त्याला लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या पुणे जिल्ह्यातील अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यरत आहेत. नव्या प्रस्तावानुसार बारामती आणि आंबेगाव येथे प्रत्येकी एक नवे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव लवकरच मंजूर होणार असल्याने पुण्याची प्रशासकीय ताकद वाढणार आहे. बारामती येथील अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे बारामती, दौंड आणि इंदापूर या तीन तालुक्यांची जबाबदारी असणार आहे, तर आंबेगाव येथील अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे खेड,आंबेगाव आणि जुन्नर या तीन तालुक्यांची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन जिल्ह्यांचा प्रस्ताव जरी फेटाळला असला, तरी मोठ्या जिल्ह्यांच्या प्रशासकीय कामांचे विभाजन करण्याच्या सरकारच्या धोरणानुसार जिल्ह्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी लवकरच रुजू होणार आहेत. यामुळे प्रशासकीय कामांना गती मिळणार असून नागरिकांना अधिक चांगली सेवा मिळणार आहे, अशी माहिती मिळाली आहे.

## सूर्यकिरणांचा अभिषेक



**सासवड** सासवड-नारायणपूर रस्त्यावर असलेल्या श्री चांगावटेश्वर अतिप्राचीन शिवमंदिर मंदिरांतील श्री गणेशावर शुक्रवारी सकाळी सूर्य नारायणाने अभिषेक केला.

## श्रीचांगावटेश्वर मंदिरातील गणरायाला सुर्यकिरणांचा अभिषेक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सासवड नारायणपूर रोडलगतच असलेल्या अतिप्राचीन शिवमंदिरातील श्रीगणेश मुर्तीवर शुक्रवारी सकाळी सूर्य किरणांचा अभिषेक झाला. शुक्रवार सकाळी सूर्योदय झाल्यानंतर काही कालावधीत सूर्यनारायणाची किरणे श्रीगणेश मुर्तीवर पडली. सुरुवातीला पायावर किरण पडले, त्यानंतर हळुहळू ती संपूर्ण मूर्तीवर पडली.

सुमारे अर्धा तास हा सूर्य किरणांचा अभिषेक सुरू होता. त्यानंतर देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून श्रींना महाअभिषेक करण्यात आला. विधीवत पूजन झाल्यानंतर आरती करण्यात आली. सूर्याचे किरण संपूर्ण मुर्तीवर पडली असल्याने, श्रींची विशेष पुजा करण्यात आली असल्याची माहिती ट्रस्टचे सदस्य परशुराम देशमुख यांनी दिली.

हे शिवमंदिर अत्यंत पुरातन असून अनेकांच्या नवसाला पावणारा गणपती म्हणून ते प्रसिद्ध आहे.

## २०४ कोटी वसुलीचे महावितरणचे 'टार्गेट'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** आर्थिक वर्ष संपण्यास अवघे १३ दिवस उरले असून, या तेरा दिवसांत २०४ कोटी रुपये वसुलीचे टार्गेट महावितरणने ठेवले आहे. प्रत्येक अभियंता, लाईनमन यांना हे उद्दिष्ट (टार्गेट) विभागून देण्यात आले असून, वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश सर्व कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. गैरसोय टाळण्यासाठी ग्राहकांनी थकबाकीसह चालू वीजबिल तातडीने भरुन महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे.

अखंडित वीज पुरविणे जशी महावितरणची जबाबदारी आहे. तसे वापरलेल्या विजेचे बिल वेळत भरणे ही ग्राहकांची देखील जबाबदारी आहे. परंतु, काही ग्राहक त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महावितरणला वीजबिल वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई करावी लागते.

बारामती परिमंडलात लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर ग्राहकांकडे सुमारे ११२ कोटींची थकबाकी आहे. तर चालू महिन्याची मागणी २५७.५३ कोटी असे मिळून मार्च महिन्यात बारामती परिमंडलास ३६९.४६ कोटी वसुलीचे उद्दिष्ट सांघिक कार्यालयाकडून देण्यात आले आहे. १८ दिवसांत केवळ १६६ कोटी रुपये वसूल झाले असून हे प्रमाण एकूण उद्दिष्टाच्या ४४.९३ टक्के इतकेच आहे. त्यामुळे उरलेल्या १३ दिवसांत वसुलीचा वेग वाढवावा लागणार असून, कोणत्याही परिस्थितीत २०४ कोटी रुपये वसुलीचे लक्ष गाठणार असल्याचे पेठकर यांनी सांगितले. त्यासाठी दैनंदिन वसुलीवर लक्ष ठेवण्यासाठी विभागनिहाय पथके सुद्धा तयार केली आहेत.

### रोहित्राची थकबाकी शून्य करावी- पेठकर

● रोहित्रांची जबाबदारी वीज कर्मचाऱ्यांना नेमून दिलेली असते. परिमंडलातील सर्व वीज कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारित रोहित्रावरील सर्व ग्राहकांचे वीजबिल वसूल करुन थकबाकी शून्य करावी असे निर्देश सर्वांना दिले असल्याचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी सांगितले.

### वीजबिल भरण्यासाठी ...

● ग्राहकांना वीजबिल भरता यावे याकरिता सुट्टींच्या दिवशी अधिकृत वीजबिल भरणा केंद्रे सुरु ठेवण्यात आली आहेत. याशिवाय रांगा टाळून महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर व महावितरण मोबाईल ॲपद्वारेही सहज व घरबसल्या कोठूनही वीजबिल भरता येते. ऑनलाइन वीजबिल भरल्यास वीजबिलामध्ये ०.२५ टक्के आणि पहिल्या सात दिवसांत (Prompt Payment) बिल भरल्यास १ टक्का असे एकूण १.२५ टक्के सूट मिळते. क्रेडिट कार्ड वगळता इतर पर्यायाद्वारे ऑनलाइनद्वारे होणारा वीजबिल भरणा नि:शुल्क आहे.

## श्री कानिफनाथ मंदिर येथे आनंदोत्सव यात्रा



**न्हावरे फाटा, ता. शिरुर येथे फुलांची करण्यात आलेली आकर्षक सजावट. छायाचित्र - पोपट पाचंगे, कारेगाव.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** न्हावरे फाटा, ता. शिरुर येथील श्री कानिफनाथ मंदिर येथे रंगपंचमी आनंदोत्सव यात्रा हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरी झाली. यानिमित्त मंदिर परिसरामध्ये विविध रंगी बेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

येथील मंदिरामध्ये सकाळी ७ वाजता विधिवत पुजा व होमहवन करुन दही - दुधाने अभिषेक उद्योजक रोहित घावटे यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आला. त्यानंतर श्रींना पुष्पहार अर्पण करुन नैवेद्य दाखविण्यात आला. सायंकाळी भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसर फुलून गेला होता. यंदा ५ हजारांहुन अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतल्याचे कानिफनाथ देवस्थान मंडळाच्या वतीने सांगण्यात आले. 'नाथ साहेबांचं चांगभलं, कानिफनाथ महाराज कि जय' च्या जयघोषात मानाच्या काठीची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली.

सरदवाडी येथील मंदिरास प्रदक्षिणा करुन मानाची काठी वाजत गाजत पुन्हा कानिफनाथ मंदिरात आणण्यात आली. मंदिर व परिसर विद्युत रोषणाईने आकर्षक दिसत होते. दरम्यान, मंदिर परिसरात शिरुर पोलिसांच्या वतीने चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## विघ्नहर अध्यक्षपदाची २४ तारखेला निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड २४ मार्च रोजी होणार आहे. कारखान्याच्या अध्यक्षपदी पुन्हा सत्यशील शेरकर यांची निवड होणार हे निश्चित आहे.उपाध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार या बाबतची उत्सुकता वाढली आहे. शेरकर ठरवतील त्याच व्यक्तीच्या गळ्यात उपाध्यक्ष पदाची माळ पडणार हे निश्चित. उपाध्यक्षपद तालुक्याच्या बाहेर जाणार की तालुक्यात राहणार या बाबतचे वेगवेगळे आडाखे बांधले जात आहेत.

विघ्नहर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडसाठीची निवडणूक नुकतीच पार पडली. यामध्ये १७ जागा सत्यशील शेरकर यांच्या शिवनेर पॅनेलच्या बिनविरोध झाल्या होत्या तर चार जागांवर मतदान झाले. या ठिकाणी सुद्धा सत्यशील शेरकर यांनीच बाजी मारली. शेरकर यांचा विघ्नहर कारखान्यामध्ये कारभार चांगला असल्यामुळे ऊस उत्पादक सभासदांचा त्यांच्या नेतृत्वावर विश्वास राहिलेला आहे.

नुकत्याच निवडून आलेल्या संचालक मंडळांमधून कारखान्याच्या अध्यक्षपदाची निवड सोमवारी (दि. २४) करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली.

## रांजणगाव गणपतीत पाणीटंचाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** रांजणगाव गणपती आणि परिसरातील गावांना पाणी पुरवठा होत असलेल्या कोंढापुरी तलावातील पाण्याने तळ गाठला असून, पाण्याअभावी पाणीपुरवठा योजनेचे जॅकवेल उघडे पडले आहेत. या तलावातील पाण्यावर अवलंबून असणाऱ्या रांजणगाव गणपती, कोंढापुरी, खंडाळे, गणेगाव पिंपरी दुमाला, वाघाळेसह इतर गावांच्या नळपाणी पुरवठा योजना बंद पडण्याच्या मार्गावर असून, पाण्याअभावी नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. तरी चासकमानच्या डाव्या कालव्यातून चासकमान धरणाचे पाणी कोंढापुरी तलावात सोडून कमीत कमी दोन ते अडीच महिने पुरेल अशा क्षमतेने तलाव पाण्याने भरावा, अशी मागणी रांजणगाव गणपतीच्या लोकनियुक्त सरपंच सुवर्णा वायदंडे, उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर यांनी ग्रामस्थांच्या वतीने शाखा अभियंता चासकमान प्रकल्प शिक्रापूर यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

अष्टविनायकांपैकी एक असलेले अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री महागणपतीच्या दर्शनासाठी हजारो भाविक येतात. रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील विविध कंपनी कामगारांचे वास्तव्य भरपूर आहे. त्यामुळे रांजणगाव गणपतीची सध्याची स्थायी व अस्थायी लोकसंख्या मिळून सुमारे ५० ते ६० हजारांच्या आसपास आहे. मात्र, हा तलावही कोरडाठाक पडल्याने नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा करण्यात अडचणी निर्माण होत असल्याने पाणी लवकरात लवकर सोडण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीला पाणीपुरवठा होणाऱ्या कोंढापुरी तलावातील पाण्याची पातळी संपुष्टात आली. कारण मागच्या आवर्तनात कोंढापुरी तलावात पाणी सोडले नव्हते. त्यामुळे पिकाचे पाण्याअभावी मोठे नुकसान होऊन नागरिकांना तीव्र पाणी टंचाईस सामोरे जाण्याची वेळ आली आहे. चासकमानचे पाणी कोंढापुरी व कुंभारखाणी तलावात सोडून होणारी गैरसोय टाळावी, अशी मागणी आंबेगाव शिरूर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, स्वप्निल गायकवाड यांनी केली.

कोंढापुरी तलावातील पाण्याने तळ गाठला असून, पाण्याअभावी पाणीपुरवठा योजनेचे जॅकवेल उघडे पडले आहेत. या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या रांजणगाव गणपती, कोंढापुरी, खंडाळे, गणेगाव खालसा, वाघाळे, पिंपरी दुमाला सह इतर गावांच्या नळपाणी पुरवठा योजना बंद पडण्याच्या मार्गावर असून, पाण्याअभावी नागरिकांची गैरसोय होत आहे.




## आळंदी शहरात नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येथील आळंदी नगरपरिषद शहरास पिण्याचे पाणी पुरवठा करीत असून भामा आसखेड कुरुळी टँपिंग मधून आळंदीस मंजूर १० एमएलडी कोट्यातून सध्या ७ एमएलडी पाणी उचलत आहे. वास्तविक आळंदीचा मंजूर कोठा १० एमएलडी असताना तसेच पाण्याची प्रचंड मागणी असताना पाणी कमी उचलले जाते यातून आळंदीकरांत नाराजी आहे. आळंदीला नियमित पाणी पुरवठ्यास दोन स्वतंत्र पाईप लाईनसह पम्पिंग आणि साठवण टाक्यां उपाय योजने अंतर्गत तातडीने विकसित करण्याची मागणी माजी नगरसेवक दिनेश घुले यांनी केली आहे.

या संदर्भात माजी नगरसेवक घुले यांनी आळंदी नगरपरिषदेस निवेदन देवून लक्ष वेधले आहे. आळंदी शहरास पिण्याचे पाणी गोपाळपुरातील पाणी पुरवठा केंद्रातून शुद्धीकरण केले जाते. येथून ते आळंदी हवेली येथील डोंगरा वरून पुन्हा आळंदी हवेली आणि आळंदी खेड येथील जलकुंभ भरत आळंदी शहरास देत असताना पाणी पुरवठा विलंबाने होतो. नागरिकांना नियमित पुरेशा प्रमाणात आणि उच्च दाबाने नियमित, रोज पाणी पुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासाठी आळंदीत पाणी साठवण क्षमता वाढीसाठी दोन पाणी साठवण टाक्या, दोन जलकुंभ तात्काळ विकसित करण्याची आत्यानी व्यक्त केली आहे. पाणी शुद्धीकरणा नंतर ते आळंदी हवेली आणि आळंदी खेड यांना एकाच वेळी वितरित करण्यासाठी दोन स्वतंत्र तसेच पम्पिंग आणि स्वतंत्र जलनलिका पाईप लाईन चे काम हाती घेऊन प्राधान्याने जुनी जलशुद्धीकरण यंत्रणा, पम्पिंग व्यवस्था देखभाल दुरुस्ती करून वापर योग्य झाल्यास शहरास पाणी पुरवठा सुरळीत होईल असे त्यांनी सांगितले. यामुळे आळंदी खेड आणि आळंदी हवेली या भागात एकाच वेळी पाणी पुरवठा होऊन झोन देखील कमी होऊन नागरिकांना रात्री अपरात्री, उशीरा होणारा पाणी पुरवठा वेळेत तसेच विनाविलंब होण्यासाठी मागणी प्रमाणे तात्काळ उपाय योजना व्हाव्यात असे साकडे आळंदीकरांचे वतीने माजी नगरसेवक घुले यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन घातले आहे.

येथील प्रभाग क्रमांक ८ मधील नागरी सुविधा अभावी गैरसोय होत असल्याने हिंदवी कॉलनी क्रमांक १ मध्ये पिण्याचे पाण्याची पाईप लाईन मागणी करण्यात आली आहे. नियमित पुरेशा दाबाने पाणी पुरवठा व्हावा यासाठी नवीन ३ इंची पिण्याचे पाण्याची लाईन नागरिकांचे सोयी साठी विकसित करून डोंगरा वरील नागरिकांना दिलासा देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. याच प्रभागात साखरे महाराज पेट्रोल पंप ते देहू फाटा गजानन महाराज मंदिर समोरून लहान ड्रेनेज असल्याने पाणी सतत रस्त्यावर येऊन नागरिकांना गैरसोय होत आहे. घाण पाण्यातुन चालावे लागते. या मुळे नागरिकांत नाराजी वाढली आहे.

यासाठी २ फूट व्यास रुंदीची ड्रेनेज लाईन टाकल्यास ड्रेनेज तुंबून घाणीचे साम्राज्य दूर होण्यासाठी प्राधान्याने विकास कामे हाती घ्यावीत. अशी मागणी करीत प्रशासनांस खणखणत इशारा देत कामे न झाल्यास याच मागण्यांसाठी तीव्र आंदोलन छेडले जाईल असे घुले यांनी सांगितले.

## नितीन महाजन सार्वजनिक सेवा पुरस्काराने सन्मानित



**शिक्रापूर :** शिक्रापूर, ता. शिरूर येथील विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन यांना नुकतेच डेक्कन चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चर पुणे यांच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट सार्वजनिक सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. शिक्रापूर येथे विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असणारे नितीन महाजन यांनी शिराळा (कोल्हापूर विभाग), शिरूर (बारामती विभाग) व सध्या शिक्रापूर येथे कर्तव्य बजावत असताना समर्पण, दूरदृष्टी आणि उत्कृष्टतेच्या अथक प्रयत्नांनी वीज वितरण विभागात सेवा बजावत असताना शासनाच्या विविध योजनांचा शेतकरी व व्यावसायिकांना लाभ मिळवून देत परिवर्तन घडवून आणले आहे. कर्तव्य बजावत असताना सामाजिक सलोखा राखून सामाजिक कामे त्यांनी केली असून, त्यांच्या या कार्याची दखल घेत, नुकतेच डेक्कन चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चर पुणे यांच्या वतीने दिला जाणारा २०२४ या वर्षीचा उत्कृष्ट सार्वजनिक सेवा पुरस्कार देण्यात आला. एनएसईचे मुख्य व्यवस्थापक आशिषकुमार चव्हाण, डेक्कन चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चरचे चेअरमन रथिन सिन्हा, व्हाईस चेअरमन एच पि. श्रीवास्तव, चिटणीस व्हि. एल. मलू, खजिनदार प्रकाश धोका यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## कांताबाई गव्हाणे यांचे निधन



**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी, ता. शिरुर येथील कांताबाई सूर्यभान गव्हाणे (७४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. निमगाव म्हाळुंगीचे माजी उपसरपंच व शिरुर तालुका कुस्तीगीर संघाचे माजी अध्यक्ष कानिफ गव्हाणे व उद्योजक गोरख गव्हाणे यांच्या त्या आई होत.

## राजेंद्र भिसे यांचे निधन



**इंदापूर :** सरस्वतीनगर येथील रहिवासी निवृत्त सहाय्य विस्तार अधिकारी (आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पुणे) राजेंद्र सोमनाथ भिसे (५८) यांचे हृदयविकाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे आई-वडील,एक भाऊ ,बहीण, पत्नी, दोन मुले व एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते विकास भिसे यांचे ते वडील होत.

## उन्हाचा तडाख्याने रस्ते निर्मनुष्य

**जुन्नर :** गेल्या चार पाच दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढला असून जुन्नर तालुक्यातील बाजारपेठेतील वर्दळ कमी झाली असून रस्ते निर्मनुष्य झाले आहेत. या वाढत्या तापमानामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खोल जात असल्याने पाणीटंचाई वाढण्याची शक्यता आहे. मार्चच्या पहिल्या दिवसापासूनच सूर्याचा पारा चढू लागला असून दुपारी अकरा वाजल्यानंतर संपूर्ण बेल्हे गावातील रस्त्यावर शुकशुकाट जाणवत आहे. त्यातच व्यापारी बांधवांचे मार्च महिन्याचे आर्थिक वर्ष असल्याने सर्वत्र शांतता जाणवत आहे. आठवडाभरापासूनच सूर्य आग ओकत असून जवळपास ३७ ते ३८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत आहे. दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांनाही ती आता असह्य होऊ लागली असून, अजून दोन ते अडीच महिने उन्हाळा कसा जाणार याची चिंता नागरिकांना आतापासूनच लागली आहे. मागील उन्हाळ्यात पारा ४१ अंश पार गेल्याने यंदाच्या उन्हाळ्यात काय हाल होतील याची चिंता लागली आहे. उन्हाचा कडाका सारखा वाढत असल्याने नागरिक आवश्यक कामासाठीच घराबाहेर पडताना दिसत आहेत. त्यामुळे दुपारी गावातील सर्वच मुख्य रस्त्यावरील वाहनांची वाहतूक व नागरिकांची वर्दळ कमी होऊ लागली आहे. उष्णतामान वाढीमुळे पाण्याची पातळी झपाट्याने खाली जात असून नदीनाले, तलाव, कूपनलिका, विहिरी यांनी तळ गाठला असून ग्रामीण भागात मोठ्या पाणी टंचाईला सामोरे जावे लागेल अशी चिन्हे दिसत आहेत.

## इंदापूर बसस्थानक होणार चकाचक

**इंदापूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इंदापूर आगार तसेच बावडा, भिगवण व निमगाव केतकी बसस्थानकांतील विविध समस्या व सेवा-सुविधांबाबत विधानभवन, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक होते तसेच परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते अशी माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी दिली. बैठकी दरम्यान मंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रवासी तसेच चालक-वाहक यांच्यासाठी आवश्यक सेवा-सुविधांच्या मागण्यांवर भर दिला. यामध्ये बसस्थानकांचे नूतनीकरण,अंतर्गत कॉंक्रीटीकरण,रंगरंगोटी, स्वच्छतागृह, तसेच प्रवाशांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लांट उभारण्याच्या सुविधांचा समावेश होता. यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली असून,प्रवाशांना आवश्यक सेवा-सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याचे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. या बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी आणि एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती असे मंत्री दत्तात्रय भरणे माहिती दिली.

# पुरंदर विमानतळासाठी 'समृद्धी' भूसंपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुरंदर येथे उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनाने मास्टर प्लान तयार केला आहे. प्रत्येक गावात एका उपजिल्हाधिकाऱ्याकडे भूसंपादनाची जबाबदारी देण्यात येणार आहे. समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर तत्काळ (सहा महिन्यांत) भूसंपादन करण्यात येणार आहे. पुरंदर विमानतळाकरिता भूसंपादन करण्याची तयारी जिल्हा प्रशासनाने सुरू केलेली आहे. या संदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डुडी यांनी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे पाठविला आहे. युध्दपातळीवर भूसंपादन करण्याच्या दृष्टिकोनातून यामध्ये काही बाबी सूचविण्यात आल्या आहेत.

राज्याच्या अर्थसंकल्पात पुरंदर विमानतळासाठी कोणतीही तरतूद न केल्याने नाराजी पसरली असतानाच, उद्योग विभागाने विमानतळासाठी यापूर्वीच निश्चित केलेल्या ७ गावांमधील २ हजार ८३२ हेक्टर जागा औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करण्याची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. पुरंदर तालुक्यातील वनपुरी, पारगाव मेमाणे, कुंभारवळण, एखतपूर, उदाचीवाडी, मुंजवडी, खानवडी या गावांतील जमिनीचे सर्व्हे क्रमांक व त्याच्या क्षेत्रफळासह संपूर्ण तपशील औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार (एमआयडीसी) हे क्षेत्र निश्चित केले गेले आहे. पुरंदर विमानतळासाठी एकूण २ हजार ८३२ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे.

विमानतळासाठी ऑक्टोबर २०१६ मध्ये घोषणा झाली होती. पुरंदर तालुक्यातील याच सात गावांमधून भूसंपादन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु, सुरुवातीपासून त्याला विरोध झाला. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात विमानतळाची जागा बदलण्यात आली. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर पूर्वीच्या जागी विमानतळ होईल, हे निश्चित करून पुढील पाच वर्षांत विमानतळ पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे सर्वांनाच पुरंदरमधील विमानतळासाठी भूसंपादन केव्हा सुरू होणार, याची प्रतीक्षा होती. आता मात्र विमानतळाच्या प्रकियेला गती प्राप्त झाली आहे.



> जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आमच्याकडे या संदर्भातील प्रस्ताव आलेला आहे. त्यावर तत्काळ निर्णय घेण्यात येणार आहे. प्रत्येक गावाकरिता एक भूसंपादन अधिकारी देण्यात यावा, अशी मागणी त्यामध्ये करण्यात आली आहे. निश्चितपणे त्यांच्या मागणीचा विचार करून पुरंदर विमानतळाचे भूसंपादन अवघ्या सहा महिन्यांच्या आत समृद्धीच्या धर्तीवर करण्यात येईल.
>
> — **डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार,** विभागीय आयुक्त, पुणे विभाग

# जमिनीच्या ताब्यासाठी महिलांचा राडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** वढू बुद्रुक, ता. शिरुर येथे जमिनीच्या वादातून जमिनीच्या ताब्यासाठी दोन गटात हाणामारी होऊन दोन्ही गटाच्या बावीस जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असताना, पुन्हा सदर ठिकाणी काही जमिनीशी निगडीत नसलेल्या काही महिलांनी राडा घालत जमिनीचा ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत इसमाला दमदाटी केल्याची घटना घडली आहे. शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे यशोदा बबुशा वाढाणे (रा. वढू बुद्रुक ता. शिरुर), सुनिता संजय लोंढे, अश्विनी सुरेश गायकवाड, लक्ष्मी आनंद संदनशिव, पूजा संतोष मुंजा, सरस्वती पांडुरंग खिलारे, मनीषा बालाजी महालिंगे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, वढू बुद्रुक येथे प्रकाश वाढाणे यांची वडीलोपार्जीत जमीन असून प्रकाश यांच्या सावत्र आई यशोदा वाढाणे यांनी फसवणूक करत जमिनीत नाव लावून घेतल्याचे सदर जमिनीचा वाद सुरु असून त्याबाबत न्यायालयात दावा दाखल आहे.

यशोदा वाढाणे यांनी काही संघटनांच्या महिलांना बोलावून घेत जमिनीचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला असताना दोन्ही गटात हाणामारी झाल्याने, शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे १६ मार्च रोजी दोन्ही गटाच्या बावीस जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते.

त्यानंतर १९ मार्च रोजी पुन्हा काही महिला सदर जागेवर आल्या. त्या तेथे सिमेंटचे पोल व फलक लावत असताना प्रकाश यांनी विचारणा केली असता, सदर महिलांनी दोन दिवस झाले आम्ही यशोदा या म्हातारीला ताबा देण्यासाठी आलोय. तू खूप त्रास दिला. येथून जा नाहीतर महिला मिळून लई मारू अशी धमकी देत जमिनीचा ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला.

याबाबत प्रकाश बबुशा वाढाणे (५७, रा. वढू बुद्रुक ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी यशोदा बबुशा वाढाणे, सुनिता संजय लोंढे, अश्विनी सुरेश गायकवाड, लक्ष्मी आनंद संदनशिव, पूजा संतोष मुंजा, सरस्वती पांडुरंग खिलारे, मनीषा बालाजी महालिंगे सर्व रा. हडपसर पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### दादागिरी खपवून घेतली जाणार नाही ........

● शिक्रापूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एखाद्या जमिनीशी संबंधित नसलेले कोणतेही व्यक्ती अथवा त्यांच्या संघटना जमिनीचे बेकायदेशीर ताबे मिळवण्यासाठी दादागिरी, दमदाटी करत असतील तर कोणाचीही गय केली जाणार नसून जमिनीच्या ताब्यासाठी दादागिरी खपवून घेतली जाणार नसल्याचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी सांगितले.

# वनविभागाच्या तत्परतेला केला सलाम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** धामणी (ता. आंबेगाव ) येथील वनविभागाच्या हद्दीतील वरचा खंडोबा मंदिर परिसरातील डोंगराला गुरुवारी (दि. २०) दुपारी एक ते दोन वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. अनेक वृक्ष, प्राणी आगीच्या भक्ष्यस्थानी पडून निसर्गाची मोठी हानी झाली असती. तथापि, याची माहिती मिळताच माजी सरपंच सागर जाधव, उपसरपंच अक्षयराजे विधाटे व प्रविण जाधव यांनी धामणी वनविभागाच्या वनपरिमंडळ अधिकारी सोनल भालेराव यांना संपर्क साधला. त्यांनी तत्परतेने वनरक्षक दिलीप वाघ यांना घटनेची कल्पना दिली व वाघ यांनी त्वरीत रेस्क्यू टीम मधील कल्पेश बढेकर, योगेश निघोट, सोनू लंके व तरूण ग्रामस्थ यांना सोबत घेऊन वरचा खंडोबा गाठला व हवा फवारणी यंत्र, झाडाचा पाला, ओले बाडदान यांच्या सहाय्याने जीव धोक्यात घालून आगीवर नियंत्रण मिळवले.

वनविभागाने केलेल्या कामाचे परिसरातून कौतुक होत आहे. वणव्यामुळे सरपटणारे प्राणी, कीटक यांचा नाश होतो. प्राणी पक्षांच्या नैसर्गिक वस्तीस्थानांना इजा पोहोचते, विविध प्रकारचे वृक्षवेली, औषधी वनस्पती, गवत प्रजाती नष्ट होतात, जंगलातील चारा, आश्रयस्थान संपल्याने वन्य प्राणी मानवी वस्तीकडे येतात. पर्यायाने वन्य प्राणी मानव संघर्ष वाढतो.

वणव्यामुळे आजूबाजूच्या नदी, नाले, विहिरी यांचे पाणी कमी होते, जंगले वाचली तरच आपल्याला स्वच्छ हवा, पाणी, पर्यावरण मिळणार आहे. त्यासाठी " वणवा थांबवा जंगल वाचवा, पर्यावरणाचे रक्षण करा " असे आव्हान वनपरिमंडळ अधिकारी सोनल भालेराव यांनी केले आहे.

# सामाजिक एकतेचा संदेश देणारी शिवजयंती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**उरुळी :** महात्मा गांधी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि पद्मश्री मणिभाई देसाई यांच्या मुळे धवल क्रांतीत अग्रगण्य असणाऱ्या उरुळी कांचन शहरात सामाजिक एकतेचा संदेश देणारी आगळीवेगळी शिवजयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

शिवराय म्हणजे केवळ इतिहास नव्हे तर ती आपली ओळख आहे, आपला अभिमान, स्वाभिमान, अस्मिता आहे असे म्हणत उरुळी कांचनचा हरहुन्नरी अवलिया, व्यवसायाने ट्रॅक्टर मॅकेनिक, पंचक्रोशीत सर्पमित्र म्हणुन प्रसिद्ध असणारा जन्माने मुस्लिम असलेला खलिल शेख हा शिव-चरित्राचा गाढा अभ्यासक आहे. शाळेत आठवीत असल्यापासुन छत्रपति शिवाजी महाराज आणि शिवशाहीतील गडकिल्यांचा अभ्यास करुन त्यावर प्रबोधन करण्याचे काम खलिल शेख करीत आहे. गेल्या ११ वर्षापासून तिथीप्रमाणे शिवजयंती समाजातील सर्व थरातील बांधवांना एकत्र घेऊन उत्साहात कोणाकडुन एक रुपयाही न घेता स्वखर्चाने मोठ्या तन्मयतेने शिवजयंती साजरी साजरी करत आहे. यावेळी सरपंच अमित कांचन, माजी सरपंच संतोष ह.कांचन, राष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने, ग्रामपंचायत सदस्य शंकर बडेकर, ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपचे संतोष चौधरी, श्री काळ भैरवनाथ सेवा समितीचे सुरेश कांचन, माजी उपसरपंच सुनील कांचन आदी मान्यवरांना मोगऱ्याचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले.

# विद्यार्थ्यांकडून चिमण्यांसाठी सव्वाशे कृत्रिम घरटी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** विठ्ठलवाडी, ता. शिरूर येथील श्री पांडुरंग विद्यामंदिर विद्यालयातील विद्यार्थी अनेक दिवसांपासून जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने चिमणी संवर्धसाठी वेगवेगळे उपक्रम राबवत असून जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांकडून चिमणी संवर्धनाचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

विठ्ठलवाडी येथील श्री पांडुरंग विद्यामंदिर विद्यालयात मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ व प्रवीणकुमार जगताप यांच्या पुढाकाराने दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून चिमणी संवर्धन उपक्रम राबवला जात असून, विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर पर्यावरणाचे धडे देण्याचे काम केले जाते. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्त विद्यालयातील शेकडो विद्यार्थी चिमण्यांसाठी घरटी बनवणे व एक घास चिऊचा या उपक्रमात सहभाग घेत, शालेय परिसरात चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी तसेच दाणा पाण्याची व्यवस्था केली जाते.

येथे विद्यार्थ्यांच्या बरोबर चिमण्यांची शाळा भरते. जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने विद्यालयातील पाचवी ते सातवीच्या एकशे वीस विद्यार्थ्यांनी कृत्रिम घरटी तसेच एक घास चिऊचा उपक्रमात सहभाग घेतला.

मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ, संगीता लंघे, योगिता हरगुडे, शुभांगी जाधव आदी यावेळी उपस्थित होते. प्रविणकुमार जगताप यांनी सर्वांचे आभार मानले.




# जिल्ह्यातील मतदार याद्या परिपूर्ण करणार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पुणे जिल्ह्यातील सर्व मतदारसंघातील मतदार यादी मध्ये असलेली दुबार नावे, मयत व्यक्तींची नावे, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या मतदारांची नावे या संदर्भात माहिती घेऊन मतदार याद्यांमध्ये सुधारणा करून त्या परिपूर्ण करण्याच्या दृष्टीने आगामी काळात प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात, मतदार याद्या तयार करण्याच्या अनुषंगाने मान्यता प्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या जिल्हा प्रमुखांच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रीमती मीनल कळसकर यांसह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची माहिती

डुडी म्हणाले की, मतदार यादीत दोन ठिकाणी नाव असलेल्या मतदारांची नावे वगळण्यात येऊन एकाच मतदार यादीत नाव असेल, याची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या मार्फत खात्री केली जाणार आहे. मतदार याद्यांमधील मृत मतदारांची नावे वगळण्यात येतील. यासाठी ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका या कार्यालयाकडून मयत व्यक्तींच्या अभिलेख नोंदीच्या याद्या घेऊन, त्याप्रमाणे अशा व्यक्तींची नावे कमी करण्यात येतील. कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या मतदारांच्या बाबत सुद्धा सर्वेक्षण करुन याद्यांमध्ये सुधारणा करण्यात येईल.

या कामांसाठी प्रशासनातर्फे बीएलओंना प्रशिक्षण देण्यात येईल मतदार यादीमध्ये चुकीच्या पद्धतीने नाव समावेश केले असेल तर प्रशासनातर्फे त्यात सुधारणा करण्यात येईल. या सर्व कामामध्ये पारदर्शकता ठेवली जाणार असल्याची ग्वाही देखील जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी देत मतदार याद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी राजकीय पक्षांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन देखील जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

## मुगडाळीचे चटपटीत स्टिक्स

रसगंधा



चहाबरोबर काही चटपटीत खावंसं वाटतं. एरवीही मुलांना डब्यात देण्यासाठी काही ना काही करुन ठेवावचं लागतं. पण नेहमीचे प्रकार करुन कंटाळला असाल तर मूग डाळ स्टिक करुन पहा. या स्टिक पौष्टिक आहेतच शिवाय चटपटीत असल्यामुळे झटपट फस्त होणाऱ्याही आहेत.


सामग्री: दोन वाटी मुगाची डाळ (दळलेली), दोन चमचे कॉर्नफ्लावर, एक चमचा लाल तिखट, एक चमचा आलं-लसुण पेस्ट, एक चमचा हिरव्या मिरचीचा ठेचा, दोन चमचे बारीक रवा, एक चमचा ओवा, एक चमचा चाट मसाला, स्टिक्स तळण्यासाठी तेल, चवीनुसार मीठ इत्यादी.

कृती: वरील साहित्यातील चाट मसाला आणि तेल वगळून सर्ग सामग्री एका बाऊलमध्ये एकत्र करुन चांगली मिसळून घ्या. आता थोडं पाणी घालून मिश्रण कणकेसारखं मळून घ्या. या मिश्रणाच्या जाडसर पोळ्या लाटायच्या आहेत. पोळ्या लाटल्यावर सुरीने लांबट स्टिक्स कापून गरम तेलात तळून घ्या. स्टिक्स गरम असतानाच त्यावर थोडं मीठ, तिखट आणि चाट मसाला भुरभुरा. सॉसबरोबर खायला द्या.

## मधुमेहाचा धोका ओळखा

टेक केअर

मधुमेह जडणं हा जीवनशैलीतील बदलांचा परिपाक असतो. सध्या अनेकांना मधुमेहाच्या समस्येने ग्रासलेलं आढळतं. व्यक्तीला कोणत्याही वयामध्ये गाठू शकणारा हा आजार सध्या चिंतेचं कारण बनत आहे. विशेष म्हणजे स्त्रियांमध्ये मधुमेहाचं निदान होण्यास वेळ लागतो. याचं मुख्य कारण म्हणजे स्त्रियांचं आरोग्याकडे होणारं दुर्लक्ष... महिला नेहमीच आरोग्याच्या तक्रारींकडे कानाडोळा करत राहतात. वेळच्या वेळी तपासण्या करुन घेण्याकडे त्यांचं लक्ष नसतं. त्यामुळे आजाराचं स्वरूप गंभीर होण्यास वेळ लागत नाही. आजार पुढच्या अवस्थेत पोहोचतो. म्हणूनच मधुमेहाचा त्रास असणाऱ्या स्त्रियांनी या आजारापासून स्वतःचा बचाव कसा करावा याविषयीच्या




काही टिप्स लक्षात घ्यायला हव्या.

✻ **संसर्ग :** रक्तातल्या शर्करेचं प्रमाण वाढत असल्यास मायक्रोबायल संसर्गाची शक्यता वाढ्ते. या संसर्गामुळे जखम लवकर बरी होण्यास अडथळा निर्माण होतो. त्या जखमांमुळे संसर्ग होण्याचा धोका मोठा असतो. या आजारात युरिनरी ट्रॅक इन्फेक्शन (युटीआय) किंवा श्वसनमार्गातील संसर्गही होऊ शकतो. म्हणूनच अशा लक्षणांवर वेळीच उपाय करायला हवा.

✻ **पॉलिसिस्टीक ओव्हरी सिंड्रोम :** मधुमेहामध्ये पॉलिसिस्टीक ओव्हरी सिंड्रोमची (पीसीओएस) शक्यता अनेक पटींनी वाढते. मधुमेहामुळे हार्मोन्सचा समतोल बिघडतो. परिणामी शरीरावर त्याचे परिणाम दिसू लागतात. म्हणूनच मधुमेह जडलेल्या महिलांनी संप्रेरकांमधील बदलांकडे लक्ष द्यावं.

✻ **मासिक पाळीपूर्वीचा त्रास :** रक्तशर्करेच्या असंतुलनामुळे मासिक पाळीपूर्वीच्या त्रासामध्ये वाढ होऊ शकते. पाळी येण्यापूर्वी पोटदुखी, भावनिक चढ-उतार, थकवा आदी त्रासाला सामोरं जावं लागू शकतं.


✻ **नैराश्य :** मधुमेही पुरुषांच्या तुलनेत मधुमेह असणाऱ्या महिलांना नैराश्याचा त्रास दुपटीने जाणवतो. त्यामुळेच महिलांनी सतर्क रहावं.

## शिखरांची सम्राज्ञी

मानिनी

**गिर्यारोहण हा भर तारुण्यात आनंद घ्यावा असा क्रीडाप्रकार असल्याचं अनेकांचं मत असतं. मात्र संगीता सिंधी बहल यांनी वयाच्या ४६ व्या वर्षी गिर्यारोहणाला सुरुवात केली आणि मोठ्या आत्मविश्वासाने आफ्रिकेतलं सर्वात उंच 'माउंट किलीमांजारो' शिखर**

गिर्यारोहण हा मानसिक ताकत आणि धारिष्ट्याबरोबरच शारीरिक कसोटी पाहणारा धाडसी क्रीडाप्रकार आहे. यासाठी तंदुरूस्तीही नितांत आवश्यकता असते. त्यामुळेच तारुण्याचा बहर असताना याकडे बघावं असा सर्वसाधारण समज असतो. पण गिर्यारोहणाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना ५१ वर्षांची, एका मुलाची आई असणारी स्त्री जगातली सर्वोच्च म्हणवली जाणारी शिखरं सर करण्याचा निश्चय करते तेव्हा हा समज खोटा ठरतो. प्रौढ वयात गिर्यारोहण ही कठीण वाटणारी बाब संगीता सिंधी बहल प्रत्यक्षात आणतात. एका सकाळी न्याहारी करत असताना त्यांच्या पतीने, अंकुर यांनी 'माझ्यासोबत गिर्यारोहणाला येणार का' असं सहज विचारलं आणि संगीताच्या आयुष्याला नवी कलाटणी मिळाली. इमेज कन्सल्टींगच्या व्यवसायात असणाऱ्या संगीता यांनी हे नवं क्षेत्र पादक्रांत करायचं ठरवलं. कोणतंही शिखर चढण्यासाठी पूर्वतयारी करणं गरजेचं असतं. बहल दांपत्यानेही तयारी सुरू केली. तब्बल चार महिने ते जीममध्ये गेले. खूप घाम गाळला. वजन कमी केलं आणि तंदुरूस्तीची ठराविक पातळी गाठली. त्यानंतर ३१ डिसेंबर २०११ रोजी त्यांनी १९,३४१ फूट उंचीचं 'माउंट किलीमांजारो' हे आफ्रिकेतलं सर्वोच्च शिखर सर केलं. ही चढाई सोपी नव्हतीच. पण योग्य प्रशिक्षण घेतल्यानं दोघांनीही आव्हान पेललं आणि १९,३४१ फूट उंचीचं हे शिखर जोडीनं सर केलं.




त्यानंतर संगीता यांचा आत्मविश्वास अनेकपटींनी वाढला. मग जुलै २०१३ मध्ये त्यांनी १८,५०० फूट उंचीचं युरोपमधलं सर्वोच्च 'माउंट इब्रस' हे शिखर सर केलं. २०१४ च्या जानेवारीत त्या अंटार्टिकाला पोहोचल्या आणि १६,००० फूट उंचीचं 'माउंट विंसन' हे शिखर सर केलं. उत्तर अमेरिकेतलं २०,३१० फूट उंचीचं 'माउंट मॅकिन्ले' हे शिखर चढताना त्यांच्या गुडघ्याला दुखापत झाली. त्यामुळे गुडघ्यावर शस्त्रक्रिया करावी लागली.

दुखापत झाली तेव्हा त्या १५ हजार फूट उंचीवर होत्या. आता पुन्हा गिर्यारोहण करता येणार नाही, असं प्रशिक्षकानं त्यांना सांगितलं. पण संगीताजींनी हार मानली नाही. सहा महिन्यातच त्यांनी 'माउंट ॲकॉन्कागुआ' शिखरावर चढाई करून तो फोटो मार्गदर्शकाला पाठवला. आता 'माउंट मॅकेन्ले' पुन्हा सर करण्यासाठी त्या प्रशिक्षण घेत आहेत. अपूर्ण राहिलेली चढाई त्यांना पूर्ण करायची आहे. हेच नव्हे तर प्रत्येक खंडातलं सर्वोच्च शिखर त्यांना पादाक्रांत करायचंय. जगात सर्वात उंच अशी सात शिखरं आहेत. त्यापैकी काही सर केली आहेत. उर्वरित शिखरंही सर करायची आहेत. यासाठी त्या प्रचंड मेहनत घेत आहेत. आठवड्यातले सहा दिवस दररोज दोन तास त्या प्रशिक्षण घेतात. सातही शिखरं सर करून त्यांना सर्वात वयस्कर भारतीय महिला गिर्यारोहक हा मान पटकवायचा आहे.

## स्कीन केअर

### मॉईश्चरायजरचं प्रमाण किती असावं ?




आपण विविध सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतो. त्यातही चेहऱ्यावर वेगवेगळे प्रयोग केले जातात. ही सौंदर्य प्रसाधनं विशिष्ट प्रमाणात वापरणं गरजेचं असतं. चेहऱ्याचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मॉईश्चरायजर लावलं जातं. मात्र ते जास्त प्रमाणात लावलं तर त्वचा तेलकट होऊ शकते. दररोज एका बदामाच्या आकाराएवढं मॉईश्चरायजर घेऊन चेहरा आणि मानेला लावा. क्रीम त्वचेच्या आता शोषलं जाईपर्यंत हलक्या हाताने मसाज करत राहा. यामुळे तुमचा चेहरा तजेलदार दिसेल.

## हेअर केअर

### लावा अंड्याचं तेल

केसांच्या वाढीसाठी आपण विविध प्रकारच्या तेलांचा वापर करतो. मात्र अंड्याच्या तेलाबद्दल तुम्ही कधी ऐकलं आहे का? अंड्याच्या पिवळ्या भागापासून हे तेल तयार केलं जातं. तुम्ही घरच्या घरी तेल बनवू शकता. यासाठी अंडी




उकडून घ्या. सोलून पिवळा भाग काढून कुस्करून घ्या. आता एका कढईत हा पिवळा भाग काळा पडेपर्यंत परतून घ्या. काळा झालेला पिवळा भागाचा गोळा करून तो पिळून घ्या. त्यातून तेल निघेल. हे तेल बाटलीत भरून ठेवा. आठवड्यातून दोन वेळा लावा. यामुळे केस चमकदार होतील शिवाय त्यांची वाढही चांगली होईल.

## हेल्दी लाईफ

### आहारात असू द्या फॉस्फरस

अन्नातून मिळणारा फॉस्फरस हा घटक वजन कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. पोटाचा घेर कमी करायचा असेल तर फॉस्फरसयुक्त अन्न खायला हवं. प्रौढ व्यक्तीला दररोज ७०० एमजी फॉस्फरसची गरज असते. गहू, चिकन, दुधीच्या बिया, सोयाबिन, जवस, राई, डाळी, अंडी, ओट्स, दाणे अशा पदार्थांमधून आपल्याला



मुबलक प्रमाणात फॉस्फरस मिळतं. या घटकामुळे किडनीचं आरोग्यही उत्तम राहतं. त्यामुळे आपल्या आहारात फॉस्फरसयुक्त पदार्थांचा नक्की समावेश करा.

## रंगते पार्टी अशीही...

सौंदर्यसाधना

लग्नसमारंभानिमित्त रंगणाऱ्या पार्ट्यांमध्ये उत्सवमूर्तींइतकीच पाहुणेमंडळीही सजून धजून येतात आणि वातावरणात आगळा रंग भरतो. साधारणपणे संध्याकाळच्या आल्हाददायक वातावरणात रंगणाऱ्या या पार्टीसाठी मेकअपही साजेसा हवा. दिवसाचा मेकअप आणि रात्रीचा मेकअप करण्याची पद्धत वेगवेगळी आहे.



शिवाय सध्याचे थंडीचे दिवस लक्षात घेता मेकअप करताना याचेही भान ठेवणे गरजेचे आहे. मेकअपप्रमाणे वेषभूषा आणि अलंकार कसे असावेत याचीही परिमाणे दिवस-रात्रीसाठी वेगवेगळी असतात. रात्रीचा मेकअप करताना सर्व प्रसाधने डार्क शेडची असावीत. यामुळे आकर्षक लूक मिळण्यास मदत होते. मेकअप करण्यापूर्वी चेहऱ्यावर दहा मिनिटे बर्फ फिरवून घ्यावा. अर्थातच थंडीच्या दिवसात हे शक्य नाही मात्र उन्हाळ्यात हा उपाय करता येईल. यामुळे चेहऱ्यावर घाम येत नसल्यामुळे चेहरा तेलकट दिसण्याचा धोका कमी होऊन मेकअप जास्त काळ टिकतो. फाऊंडेशन लावताना त्यात थोडे बर्फाचे पाणी घातल्यासही तो चेहऱ्यावर एकसारख्या पद्धतीने बसतो. चेहरा, कान, मान, गळा आदी ठिकाणी फाऊंडेशन पसरल्यानंतर त्वचेशी मिळत्याजुळत्या छटेचे कॉम्पॅक्ट लावावे. त्यानंतर मॅच होईल असा रुज लावावा. डोळ्याच्या मेकअपमध्ये लायनर, कपड्याच्या रंगाशी सुसंगती साधणारी आयशेड, डार्क कलरचा मस्कारा लावावा. रात्रीसाठी लिपस्टिकच्या कॉपर, गडद तांबडा, जांभळा अथवा डार्क मरुन अथवा कॉफी कलरच्या शेड्स चांगल्या दिसतात. कुठल्याही पार्टीसाठी जाताना बरोबर टिश्यूपेपर ठेवावा. यामुळे मेकअप खराब झाला तर तिथल्या तिथे नीटनेटका करता येतो.

## संयम ठेव, प्रश्न सुटेल

समुपदेशन

मी पस्तीस वर्षांची विवाहिता असून एका मुलीची आई आहे. माझी मुलगी सहा वर्षांची आहे. माझ्या पतीला आणखी एक अपत्य हवं आहे. मलाही त्याचा हा विचार मान्य आहे. पण आणखी एका मुलाला जन्म देण्यापेक्षा एखाद्या निराधार मुलाला दत्तक घ्यावं असं मला वाटतं. त्यानिमित्ताने आमचं कुटुंबही चौकोनी होईल आणि एका जीवाला हक्काचं घर मिळेल. पण पतीला हे विचार मान्य नाहीत. त्याला कसं समजावू हेच समजत नाहीये.

– सखी, तुझा विचार



अत्यंत स्तुत्य आहे. देशात निराधार बालकांची संख्या प्रचंड असताना प्रत्येक दांपत्याने हा विचार केला तर समस्येचं गांभीर्य कमी होण्यास मदतच होणार आहे. पण पारंपरिक विचारांचा पगडा असणारे लोक हा विचार झटक्यात स्वीकारु शकत नाहीत. त्यामुळे दुराग्रह न धरता त्याला समजावून सांगितलं, काही उदाहरणं दाखवली, त्याला अनाथांच्या आश्रमात नेऊन वस्तुस्थिती दाखवली आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या माणसांची ओळख करुन दिलीस तर कदाचित त्याचे विचार बदलू शकतील. त्यामुळे आधी हा प्रयत्न करुन बघ.

## जरा विसावू या वळणावर...

माय स्पेस

पती-पत्नीच्या नात्याची वीण विश्वासाच्या धाग्यांची असते. दोन अनोळखी माणसांमध्ये हे नाजूक नातं निर्माण होतं तेव्हा एकमेकांना समजून घेणं अभिप्रेत असतं. पण कधीकधी या नात्यात तणाव वाढतो आणि नाईलाजाने वीण उसवावी लागते. हा काळ दोघांच्याही दृष्टीने परीक्षा पाहणारा असतो. पण या कसोटीच्या काळातून स्वतःला बाहेर काढून जगासमोर नव्याने सादर करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील अशा काही टिप्स...



✻ स्वतःसाठी जगणं सुरुवात करा: एका नात्यामधून बाहेर पडणं म्हणजे संपूर्ण आयुष्याला पूर्णविराम नसतो. योग्य त्या वळणावर एक नवी सुरुवात करण्याचा प्रयत्न करावा लागतो. आतापर्यंत नातं सांभाळताना स्वतःची तत्वं, आवडी-निवडी यांना फाटा देऊन जगला असाल तर ते विसरून जा. स्वतःच्या तत्वांवर जगण्याची मनाची तयारी करा.



✻ काही तरी शिका: आयुष्यातील प्रत्येक नातं काही ना काही शिकवत असतं. मागील नात्याकडूनही तुम्हाला काही चांगलं शिकायला मिळालं असेल तर जरूर शिका. पण चुका परत होणार नाहीत याची काळजी घ्या.

✻ एकटेपणाचं दु:ख नको: नात्यातून वेगळं झाल्यानंतर एकटं वाटणं स्वाभाविक आहे. पण त्याचं दु:ख नको. हे एकटेपण स्वतःला ओळखण्याची नवी संधी आहे असं समजा. स्वतःवर प्रेम करायला शिका. यामुळे एकटेपणा जाणवणार नाही.

## बाल साहित्यिक व्हायचं तर...

स्कील डेव्हलपमेंट

तुम्ही चांगलं लिहू शकता. त्यातही लहान मुलांसाठी लेखन करायला तुम्हाला आवडतं. मुलांसाठी एखादं पुस्तक लिहायचा विचार तुमच्या मनात घोळतोय. मात्र छोट्यांची पुस्तकं लिहिणं खूप सोपं असतं असा तुमचा समज असेल तर तो चुकीचा आहे. खरं तर प्रौढांपेक्षा लहान मुलांना खिळवून ठेवणं हे खूप मोठं आव्हान असतं. त्यांच्याकडे मनोरंजनाचे अनेक पर्याय असतात. त्यातच सध्याचा काळ तंत्रज्ञानाचा असल्याने मुलांसाठी खूप विचारपूर्वक लिहायला हवं. छोट्यांसाठी लिहिण्याची सुरुवात करण्याआधी नेमकं काय करायला हवं याविषयी...



✻ तुम्हाला मुलांसाठी का लिहावंसं वाटतं हे आधी ठरवून घ्या. लहान मुलांसाठी लिहिताना जबाबदारीचं भान असायला हवं. आपलं लेखन त्यांचं व्यक्तिमत्त्व घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतं, हे कायम लक्षात ठेवा. तुमचा प्रत्येक शब्द त्यांच्यावर प्रभाव पाडणारा असतो. त्यामुळे लेखनाचं कारण स्पष्ट झालं की त्या दृष्टीने प्रयत्न करणं सोपं होईल.

✻ लहान मुलांशी संवाद साधा. त्यांचं भावविश्व समजून घ्या. कुटुंबातल्या तसंच आजूबाजूच्या मुलांमध्ये मिसळा. तुमच्या भावी वाचकांकडूनच तुम्हाला लेखनविषयक मार्गदर्शन मिळेल.

✻ तुम्ही कोणत्या वयोगटातल्या मुलांसाठी लेखन करणार आहात हे ठरवून घ्या. प्रत्येक वयोगटाची आवड निवड वेगळी असते. गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे लेखनाची दिशा ठरवणं सोपं जाईल.

✻ भाषेकडे लक्ष द्या. उगाचच अवघड शब्दांचा वापर करू नका. मुलांना छोटी, साधी, सोपी वाक्य आवडतात. त्यामुळे उगाचच लांबलचक लिहिण्याचा प्रयत्न करू नका.

✻ पुस्तक लिहून पूर्ण झाल्यानंतर ते प्रकाशित करण्याचं आव्हान खूप मोठं असतं. आपली हस्तलिखितं घेऊन प्रकाशकांना भेटा. लहान मुलांची पुस्तकं प्रकाशित करणाऱ्या प्रकाशन संस्था असतात. त्यांच्याशी संपर्क साधा.

✻ आपलं पुस्तक स्वतःच प्रकाशित करण्याचा एक पर्याय तुमच्याकडे आहे. मात्र यासाठी बरंच संशोधन आणि मेहनत घ्यावी लागेल. भांडवल गुंतवावं लागेल. सगळ्याचा सारासार विचार करून मगच प्रकाशनाबाबत निर्णय घ्या.

## रफल साड्यांनी खुलवा लूक

स्टाईल स्टेटमेंट

पैठणी, कांजीवरम, बनारसी अशा पारंपरिक साड्यांमध्ये महिलांचं सौंदर्य खुलत असलं तरी सध्या मॉडर्न, इंडो-वेस्टर्न लूक देणाऱ्या साड्यांची बरीच चलती आहे. मूळ संकल्पना कायम ठेवत साडीला ट्विस्ट देण्याचे बरेच प्रयत्न झाले. मधल्या काळात लेहंगा साडीची बरीच चलती होती. धोती स्टाईल,पँट स्टाईल साडीही चर्चेत होती. आता रफल साड्यांचा ट्रेंड आहे. बॉलिवूडमधल्या बऱ्याच अभिनेत्री ही साडी कॅरी करताना दिसतात. रफल साडी खूप स्टायलिश दिसते. नव्या जमान्याच्या नवरीसाठीही 'इंडो-वेस्टर्न' स्टाईलची ही साडी बेस्ट ठरते. ही साडी स्टाईल करण्याच्या या काही टिप्स...

✻ रफल साडी प्लेन,डिझायनर, प्रिंटेड अशा विविध प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. रफल साडीवर बेल्ट लावल्याने तिचा लूक अधिकच खुलतो. कोणत्याही प्रकारच्या साडीवर बेल्ट लावता येईल.

✻ लग्नाआधीच्या समारंभांसाठी फ्रीलवाली रफल साडी चांगला पर्याय ठरेल. साडीचा हा प्रकार कोणत्याही ऑकेजनला चालून जाईल.

✻ इव्हिनिंग गाउन स्टाईल रफल साडीही खूप छान दिसते. रिसेप्शनला ही साडी नेसता येईल. काहीतरी वेगळं कॅरी करायचं समाधान यामुळे मिळू शकेल. अशा साडीवर पारदर्शक ब्लाउज घाला.

✻ कमी वजनाच्या रफल साड्याही खूप आरामदायी असतात. त्या तुम्हाला हटके लूकही मिळवून देतात.

✻ लेहंगा स्टाईल रफल साडी हा प्रकार मेहंदी, संगीत सोहळ्याची शान ठरेल.

✻ यासोबतच स्ट्राईप्ड प्रिंट, रफल पदराची , फ्लोरल प्रिंटेड रफल साड्यांचे पर्यायही आहेत.



## चहल-धनश्रीचा घटस्फोट झाला!

क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांचा घटस्फोट झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कौटुंबिक न्यायालयाने गुरुवारी निकाल दिला. युजवेंद्र आणि धनश्री मुंबईच्या कुटुंब न्यायालयात उपस्थित होते. युजवेंद्रचे वकील नितीन गुप्ता यांनी याची पुष्टी केली आहे. बुधवारी, मुंबई उच्च न्यायालयाने चहलच्या याचिकेवर २० मार्च रोजी निकाल देण्याचे आदेश कुटुंब न्यायालयाला दिले होते. न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकल खंडपीठाने सांगितले की, चहल 21 मार्चपासून उपलब्ध राहणार नाही कारण त्याला आयपीएलमध्ये भाग घ्यायचा आहे. अलिकडेच असे वृत्त आले होते की दोघेही गेल्या अडीच वर्षांपासून वेगळे राहत होते. चहल आणि त्याची पत्नी धनश्री यांच्या घटस्फोटाच्या अफवा बऱ्याच काळापासून सोशल मीडियावर फिरत होत्या. तथापि, चहल आणि धनश्री यांचे अधिकृत विधान अद्याप समोर आलेले नाही. युजवेंद्र चहल यांनी कुटुंब न्यायालयात याचिका दाखल केली होती की त्यांनी धनश्रीला अर्धी रक्कम दिली आहे. म्हणून, त्याचा ६ महिन्यांचा कूलिंग ऑफ कालावधी माफ करावा.

# आजपासून आयपीएलचा थरार!

## कोलकात्यात ऑरेंज अलर्ट, केकेआर विरुद्ध आरसीबीचं काय होणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोलकाता :** आयपीएल २०२५ च्या १८ व्या हंगामाचा शानदार शुभारंभ आजपासून होणार आहे. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स स्टेडियममध्ये कोलकाता नाइट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यात हा उद्घाटन सामना रंगणार आहे. मात्र, भारतीय हवामान खात्याने २० ते २२ मार्चदरम्यान कोलकाता आणि पश्चिम बंगालच्या काही भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, या कालावधीत विजांच्या कडकडाटासह गडगडाटी वारे आणि मध्यम ते हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. IMD च्या अहवालानुसार, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या काही भागांत २० व २१ मार्च रोजी तुरळक पाऊस आणि वादळी वारे होण्याची शक्यता आहे.

कोलकात्यातील ईडन गार्डन्समध्ये आयपीएल २०२५ च्या उद्घाटन सोहळ्यासाठी भव्य तयारी करण्यात आली आहे. या सोहळ्यात श्रेया घोषाल, करण औजला, आणि दिशा पटानी यांचे दमदार परफॉर्मन्स पाहायला मिळणार आहेत. हा सोहळा संध्याकाळी ६:०० वाजता सुरू होणार असून त्यानंतर रात्री ७:३० वाजता पहिला सामना रंगणार आहे.

परंतु पावसाच्या शक्यतेमुळे स्टेडियमच्या मैदानावर ताडपत्री टाकण्यात आली आहे. आयोजकांनी हवामान विभागाच्या अंदाजानुसार पर्यायी योजना तयार केल्या असून, पावसाचा सामना सुरक्षितरित्या पार पाडण्यासाठी सर्व खबरदारी घेतली जात आहे.

आयपीएल २०२४ मध्ये तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावणाऱ्या कोलकाता नाइट रायडर्स संघाची कमान यंदा नवा कर्णधार अजिंक्य रहाणे सांभाळणार आहे. मागील हंगामात संघाचे नेतृत्व करणारा श्रेयस अय्यर आता पंजाब किंग्समध्ये दाखल झाला आहे.

दुसरीकडे, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघ देखील नव्या कर्णधार रजत पाटीदार यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या आयपीएल विजेतेपदासाठी प्रयत्न करणार आहे. दोन्ही संघांसाठी हा पहिला सामना महत्त्वाचा असणार आहे, मात्र पावसाचा फटका बसल्यास चाहत्यांचा हिरमोड होण्याची शक्यता आहे.

### हवामानाचा अंदाज काय सांगतो?

● IMD च्या ताज्या अंदाजानुसार, कोलकात्यात 22 मार्च रोजी संध्याकाळी पावसाची शक्यता 70% आहे. तापमान 24°C ते 29°C आहे. तर वारा ताशी 30-40 किमी वेगाने वाहण्याची शक्यता आहे. IMD च्या माहितीनुसार, पश्चिम बंगालच्या काही भागांत वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. तसेच, गडगडाटी वारे आणि पाऊस सामना सुरू होण्याच्या वेळी होऊ शकतो.

### काय पर्याय?

● पावसामुळे सामना पूर्ण रद्द झाला तर दोन्ही संघांना समान गुण दिले जातील. मात्र, DLS नियम लागू करून सामना छोट्या स्वरूपात खेळवला जाऊ शकतो. प्रेक्षक आणि चाहत्यांनी हवामान अंदाज लक्षात घेऊन Eden Gardens स्टेडियममध्ये येताना रेनकोट आणि छत्री सोबत ठेवावी. तसेच, सामना ऑनलाईन पाहणाऱ्या चाहत्यांनी Hotstar आणि JioCinema वर लाईव्ह अपडेट्स मिळवू शकतात.

## शार्दुल ठाकुर लखनऊमध्ये सामील

**लखनौ :** लिलावात न विकलेला मुंबईचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर लखनऊ सुपर जायंट्स (LSG) मध्ये सामील होईल. तो जखमी खेळाडू मोहसीन खानची जागा घेईल. तथापि, एलएसजीने अद्याप अधिकृतपणे याची घोषणा केलेली नाही.

वृत्तसंस्था पीटीआयनुसार, शार्दुल ठाकूरला या निर्णयाची माहिती देण्यात आली आहे आणि तो २४ मार्च रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या हंगामातील पहिल्या सामन्यासाठी संघासह विशाखापट्टणमला जाईल. शार्दुल गेल्या १० दिवसांपासून संघासोबत शिबिरात सहभागी होत आहे.

गुडघ्याच्या लिगामेंटच्या दुखापतीमुळे मोहसीन खान गेल्या तीन महिन्यांपासून कोणत्याही क्रिकेट सामन्यात सहभागी होऊ शकलेला नाही. जेव्हा त्याने लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) च्या नेटवर गोलंदाजी करायला सुरुवात केली तेव्हा त्याला पायाच्या स्नायूंना दुखापत झाली, ज्यामुळे त्याचे पुनरागमन अधिक कठीण झाले.

## स्पोर्ट्स मॅनियाने मुंबई सिटी एफसीला बरोबरीत रोखले



**पुणे :** एआयएफएफ सब ज्युनियर 2024-25 लीगमध्ये मुंबईतील कूपरेज येथे झालेल्या सामन्यात गुरुवारी स्पोर्ट्स मॅनियाने मुंबई सिटी एफसीला 1-1 असे रोखून महत्त्वपूर्ण गुण मिळवला. या बरोबरीसह स्पोर्ट्स मॅनियाचे लीगमधील सहा सामन्यांपैकी 11 गुण झालेत. पुण्यातील स्पोर्ट्स मॅनिया टीमची तिसऱ्या 'अवे' सामन्यातील दुसरी बरोबरी आहे. तीन सामन्यांत एका विजयाचा (5 गुण; 3 सामने) समावेश आहे. दरम्यान, स्पोर्ट्स मॅनियाने 'होम' ग्राउंडवर एक पराभव आणि दोन विजय (6 गुण; 3 सामने) मिळवले आहेत. गुरुवारी दुपारी झालेल्या सामन्यात, मुंबई सिटीएफसीने लवकर खाते उघडले. निहार कृष्णाने (15 वा) हा गोल केला. मध्यंतरापर्यंत मुंबई सिटी एफसीने आघाडी राखली. मध्यंतरानंतर, स्पोर्ट्स मॅनियाने बरोबरी साधण्याच्या उद्देशाने खेळ केला. त्यानंतर, कासिरेड्डी वेंकट श्री साई वर्षितने (36 व्या मिनिटाला) गोल करून स्पोर्ट्स मॅनियाला बरोबरी साधली. निर्धारित वेळेत 1-1 अशी बरोबरी राहिल्याने दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण विभागून देता आला. या बरोबरीने स्पोर्ट्स मॅनियाला घरच्या मैदानावर मुंबई सिटी एफसीविरुद्धच्या 0-5 अशा मोठ्या पराभवाचा बदला घेतला.

## 'बीसीसीआय'च्या निर्णयाने 'रिव्हर्स स्विंग'चा थरार

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) आगामी हंगामात चेंडूला लकाकी आणण्यासाठी लाळेचा वापर करण्यास भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) परवानगी दिली आहे. त्यामुळे करोनाच्या पार्श्वभूमीवर, लाळेच्या वापरावर घालण्यात आलेले निर्बंध उठविणारी 'आयपीएल' ही क्रिकेटविश्वातील पहिलीच स्पर्धा ठरणार आहे. 'आयपीएल'च्या आगामी हंगामाला शनिवारपासून (२२ मार्च) सुरुवात होणार असून त्याआधी दहाही संघांच्या कर्णधारांची गुरुवारी मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीत कर्णधारांनी 'बीसीसीआय'च्या प्रस्तावास मान्यता दिली. "चेंडूवर लाळेचा वापर करण्यास घालण्यात आलेली बंदी आता उठविण्यात आली आहे. 'आयपीएल'मधील काही कर्णधार या निर्णयाच्या पक्षात नव्हते, तर काही साशंक होते. मात्र, बहुतांश कर्णधारांनी या प्रस्तावास पाठिंबा दर्शविल्याने आता चेंडूला लकाकी आणण्यासाठी लाळेचा वापर करता येणार आहे," असे 'बीसीसीआय'च्या अधिकाऱ्याने सांगितले. चें डूला लकाकी आणण्यासाठी पूर्वीपासून लाळेचा वापर करण्यात येत होता. मात्र, करोनाकाळात आरोग्यविषयक खबरदारी म्हणून चेंडूवर लाळेचा वापर करण्यास तात्पुरती बंदी घालण्यात आली होती. पुढे २०२२ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) हा निर्णय कायम ठेवला. या पार्श्वभूमीवर, 'बीसीसीआय'नेही 'आयपीएल'साठी असाच नियम केला होता. 'आयपीएल'मधील सर्व संघांच्या कर्णधारांची मुंबई येथील 'बीसीसीआय'च्या मुख्यालयात गुरुवारी बैठक झाली. ही बैठक दुपारी १२.३० वाजता नियोजित होती. मात्र, काही संघांच्या अधिकाऱ्यांना येण्यास विलंब झाल्याने बैठक उशिराने सुरू झाली.

## अखेर पाकिस्तानचा विजय झाला

## तिसऱ्या टी-२० मध्ये हसन नवाझचं झंझावाती शतक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** हसन नवाझच्या ४५ चेंडूत नाबाद १०५ धावांच्या तडाखेबंद खेळीच्या जोरावर पाकिस्तानने न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या ट्वेन्टी२० सामन्यात दणदणीत विजय मिळवला. न्यूझीलंडने दोन सामने जिंकत तीन सामन्यांची मालिका आधीच जिंकली होती. तिसऱ्या लढतीत पाकिस्तानने शानदार खेळ करत बाजी मारली. चॅम्पियन्स ट्रॉफी आणि त्याआधी घरच्या मैदानावर न्यूझीलंडबरोबर झालेल्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानला पराभव सहन करावा लागला होता. सध्या हलाखीच्या परिस्थितीतून जाणाऱ्या पाकिस्तान संघाला चालू वर्षात हा तिसरा सामना जिंकण्यात यश मिळवले आहे.

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने मार्क चॅपमनच्या ९४ खेळीच्या जोरावर २०४ धावांची मजल मारली. चॅपमनने ४४ चेंडूत ११ चौकार आणि ४ षटकारांसह ही खेळी सजवली. कर्णधार मायकेल ब्रेसवेलने १८ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह ३१ धावा केल्या. पाकिस्तानतर्फे हारिस रौफने ३ तर शाहीन शहा आफ्रिदी, अब्बास आफ्रिदी आणि अबरार अहमदने प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

## महाराष्ट्राच्या सुकांत, प्रेमची उपांत्यपूर्व फेरीत धडक; आजपासून रंगणार ॲथलेटिक्सचा थरार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्राच्या सुकांत कदम, प्रेम अले यांनी अपेक्षेप्रमाणे विजयी सलामी देत खेलो इंडिया पॅरा स्पर्धेचा उपांत्यपूर्व फेरीत मजल मारली आहे. दुसऱ्या पर्वाचे आज स्पर्धेचे शानदार उद्घाटन केंद्रिय क्रीडामंत्री मनसुख मंडविया यांच्या हस्ते झाले.

नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी क्रीडा संकुलातील जिम्नॅस्टिक्स हॉलमध्ये सुरू असलेल्या पॅरा बॅडमिंटनमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सकाळपासूनच दमदार कामगिरीचे प्रदर्शन घडविले. एस एल 4 गटात सांगलीचा सुकांत कदमने महाराष्ट्राच्याच निलेश गायकवाडचा 21-10, 21-19 सेटने पराभव केला. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असणाऱ्या सुकांतने पहिला सेट सहजपणे जिंकून लढतीवर पकड घेतला होती. दुसऱ्या सेटमध्ये त्याना संघर्ष करावा लागला. अनुभवी सुकांतने आघाडी कायम राखत विजयी सलामी दिली. पॅरीस ऑलिम्पिकमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या सुकांत प्रथमच खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत सहभागी झाला आहे. पुण्यात प्रशिक्षक निखिल कानेटकर, मयंक गोळे यांच्या मार्गदर्शनाव्दारे सराव करणाऱ्या सुकांत स्पर्धेतील सुवर्णपदकाचा प्रमुख दावेदार आहे. शुक्रवारी उपांत्यपूर्व फेरीत सुकांतची लढत छत्तीसगडच्या अभिजीत सकुजा विरूध्द रंगणार आहे.

विलचेअरच्या डब्ल्यू एच 1 गटात महाराष्ट्राच्या प्रेमकुमार अले यांनी उत्तरप्रदेशच्या सिराजउद्दीनवर सहज मात केली. 21-12, 21-14 सेटने प्रेमकुमार अले पहिली फेरी जिंकून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला. सेनादलातून निवृत्त झाल्यानंतर पॅरा बॅडमिंटन खेळण्याचा श्रीगणेशा पुण्यातून केला.आंतरराष्ट्रीय स्तरावर 10 सुवर्णपदकांचा कामगिरी करणारे प्रेमकुमार प्रथमच खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

शुक्रवार 21 मार्चपासून ॲथलेटिक्सचा थरार रंगणार आहे. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता सचिन खिलारी दुखापतग्रस्त असल्याने दुसऱ्या स्पर्धेत खेळताना दिसणार नाही. गतस्पर्धेत खिलारीने सुवर्णपदक जिंकले होते. यंदा संदिप सलगर, भाग्यश्री जाधव, दिलीप गावीत या पॅरीस ऑलिम्पिकपटूं ॲथलेटिक्सचे मैदान गाजविताना दिसतील.

## लाल मातीतील कुस्ती जगविण्यासाठी प्रयत्नशील



**पुणे :** "आधुनिक काळातही लाल मातीवर प्रेम करणारे डॉ. विश्वनाथ कराड हे खऱ्या अर्थाने कुस्ती जगविण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. असे विचार हिंदकेसरी दीनानाथ सिंग यांनी व्यक्त केले. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, पुरातन यज्ञभूमी रामेश्वर (रुई) ग्रामस्थ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ संत एकनाथ महाराज षष्ठीचे औचित्य साधून लातूर येथील रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महा-वीर स्पर्धा २०२५ च्या उद्घाटन प्रसंगी सन्माननीय पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी आमदार रमेश अप्पा कराड हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, महाराष्ट्र केसरी अप्पासाहेब कदम, शिवछत्रपती पुरस्कार विष्णुतात्या जोशीलकर, महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, पैलवान बंडा पाटील रेटरेकर, नजरूद्दीन नाइकवडी, शिवछत्रपती पुरस्कार दिनेश गुंड, रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, श्री. काशीराम दा. कराड, डॉ. हनुमंत कराड, श्री. राजेश कराड , ऋषिकेश कराड व प्रा. विलास कथुरे उपस्थित होते. दिनानाथ सिंग म्हणाले, " डॉ. कराड हे पुनम का चाँद आहेत. त्यांनी पैलवानांना जो आधार दिला आहे त्यातून खेळाप्रती प्रेम दिसून येते. ही स्पर्धा सतत अशीच चालत राहावी यासाठी पुढील पिढी तयार आहे." डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,"मऊ मेणाहूनि आम्ही विष्णूदास | कठीण वज्रास भेदू ऐसे ॥' अशी परंपरा असलेल्या रामेश्वर (रुई) या छोट्याशा गावात जागतिक स्तरावरील पैलवान येत आहे ही अभिमानास्पद बाब आहे. आमच्यावर विश्वास ठेऊन येथे येणाऱ्या पैलवानांसाठी आम्ही काबिल ठरण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा खेळ परंपरेचा असून लोकांना जोडणारा असून भावी जीवनाला दिशा देणारा आहे. ही स्पर्धा १८ वर्षापासून सुरू आहे. तसेच येथे सर्वधर्मांचे मंदिर असल्याने हे गांव संपूर्ण जगभर मानवता तीर्थ म्हणून ओळखले जात आहे. मराठवाडा हा साधु संतांची भूमिका आहे.

## रिअल पुणे युनायटेड एफसी, स्निग्मय पुणे एफसी, चेतक फुटबॉल क्लब संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेतर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या अव्वल श्रेणी आणि व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात रिअल पुणे युनायटेड एफसी, स्निग्मय पुणे एफसी, चेतक फुटबॉल क्लब, लिजंड्स युनायटेड एफसी, सनी डेज् आणि स्पोर्टस मेनिया या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

बावधन येथील हॉटफुट गंगा लिजंड्स मैदान आणि कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या अव्वल श्रेणी गटाच्या झालेल्या सामन्यामध्ये अंकित देवी आणि अभिषेक शिंदे यांनी केलेल्या गोलांच्या जोरावर रिअल पुणे युनायटेड एफसी अ संघाने केपी इलेव्हनचा २-१ असा पराभव केला. स्निग्मय पुणे एफसी अ संघाने गनर्स एफसीचा ११-० असा धुव्वा उडविला. सामन्यामध्ये प्रतिक पाटील याने चार गोल तर मेहदी हसन याने तीन गोल केले.

हेमराज सिंग आणि यैमी वसाह यांनी प्रत्येकी एकेक गोल केले. यश कोटेकर याने ५८ मिनिटाला केलेल्या एकमेव गोलामुळे चेतक फुटबॉल क्लबने युकेएम कोथरूड एफसी अ संघाचा १-० असा पराभव केला.

व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यामध्ये आर्यन तांबे आणि सार्थक बी यांनी केलेल्या गोलपूर्ण कामगिरीमुळे लिजंड्स युनायटेड एफसीने राहूल फुटबॉल क्लबचा ३-२ असा पराभव केला. सनी डेज् संघाने अशोका फुटबॉल क्लबचा ३-१ असा पराभव केला. सामन्यामध्ये सुजित जाधव याने दोन तर, प्रज्योत माळी याने एक गोल केला. नील सुदर्शन याने केलेल्या हॅट्रीक गोलांच्या जोरावर स्पोर्टस मेनिया संघाने युनायटेड पुना स्पोर्टस ॲकॅडमीचा ३-२ असा पराभव केला.

## चॅम्पियन्स ट्रॉफीने भारतात व्ह्यूअरशिप रिकॉर्ड तोडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ने भारतातील व्ह्यूअरशिप रेकॉर्ड मोडले आहेत. या स्पर्धेने २०२३ च्या विश्वचषकापेक्षा २३% जास्त कामगिरी केली. भारत विरुद्ध पाकिस्तान सामना १९.५ अब्ज मिनिटे पाहिला गेला. या स्पर्धेचा वॉच टाइम एकूण २५० अब्ज मिनिटे होता ज्यामध्ये स्टार स्पोर्ट्सवर १३७ अब्ज मिनिटे आणि जिओहॉटस्टारवर ११० अब्ज मिनिटे होती. भारत-न्यूझीलंड फायनलला टीव्हीवर १२.२ कोटी आणि जिओहॉटस्टारवर ६.१ कोटी प्रेक्षक होते.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव केला. विश्वचषक सामन्यांव्यतिरिक्त, अंतिम सामना टीव्ही इतिहासातील दुसरा सर्वोच्च रेटिंग असलेला एकदिवसीय सामना ठरला. या सामन्याला टीव्हीवर २३० दशलक्ष आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर ५३ अब्ज वॉच टाइम मिळाला.

स्पर्धेतील सर्वात मोठा सामना दुबईमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लीग टप्प्यातील सामना होता. तो भारतातील सर्वाधिक पाहिलेल्या एकदिवसीय सामन्यांपैकी एक बनला. हा सामना टीव्हीवर २६ अब्ज मिनिटांहून अधिक काळ पाहिला गेला.

## शारीरिकदृष्ट्या दिव्यांग आणि अनाथ मुलांचा पुणे सायक्लोथॉनमध्ये उत्स्फूर्त सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुनीत बालन ग्रुप आणि लोहा फाउंडेशनतर्फे आयोजित आपला पुणे सायक्लोथॉनच्या चौथ्या हंगामात हजारो सायकलस्वारांसह शारीरिकदृष्ट्या दिव्यांग आणि अनाथ मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमाने समावेशकता आणि सामाजिक ऐक्याचा सशक्त संदेश दिला. शारीरिकदृष्ट्या दिव्यांग सायकलस्वारांनी ३ किमी सामाजिक उपक्रम राईड, तर अनाथाश्रमातील मुलांनी १० किमी सायकल राईड पूर्ण केली. त्यांच्या जिद्दीने आणि आत्मविश्वासाने उपस्थित प्रेक्षक भारावून गेले.

पुणे सायक्लोथॉनचे रेस डायरेक्टर आयपीएस कृष्णप्रकाश (ADG, फोर्स वन ) यांनी या विशेष गटांच्या सहभागाचे कौतुक करताना सांगितले, "सायकलिंग हा फक्त खेळ नसून सामाजिक एकात्मतेचे आणि सक्षमीकरणाचे प्रभावी साधन आहे. दिव्यांग सायकलस्वारांची जिद्द आणि अनाथ मुलांची ऊर्जा पाहून मन भारावले." कार्यक्रमादरम्यान आयोजक आणि नागरिकांनी या सायकलस्वारांना मोठ्या उत्साहाने प्रोत्साहन दिले. लोहा फाउंडेशनच्या माध्यमातून समावेशकता, फिटनेस आणि सामाजिक जबाबदारीच्या ध्येयांना बळ मिळाले आहे. पुणे सायक्लोथॉन केवळ सायकल स्पर्धा नसून समाजातील प्रत्येक घटकाला सशक्त करणारा उपक्रम ठरला आहे.

## ११२ स्पर्धकांचा सहभाग

## सहस्रबुद्धे चषक एकेरी कॅरम स्पर्धेस सुरवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "ज्येष्ठ नागरिकांनी आनंदमयी जीवन जगण्यासाठी आपल्या आवडत्या क्रीडा स्पर्धा मध्ये नेहमी भाग घ्यावा,सामाजिक कार्यामध्ये सहभागी व्हावे व समाज जीवनाचा आनंद घ्यावा". सुदृढ आरोग्यासाठी नियमित व्यायाम व योगा बरोबरच कॅरम सारख्या क्रीडा स्पर्धेबरोबरच इतर छंद जोपासवे.क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन नियमित सराव वाढवावा". असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी एरंडवणे ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आयोजित जी पी सहस्रबुद्धे चषक एकेरी कॅरम स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

याप्रसंगी कॅरम पटू विलास सहस्रबुद्धे,माधुरी सहस्रबुद्धे,एरंडवणे ज्येष्ठ नागरिक संस्थांचे अध्यक्ष अजित गोखले,सचिव उर्मिला शेजवलकर ह्यांची मुख्य उपस्थिती होती.प्रमुख पाहुण्यांचा परिचय कार्याध्यक्षा प्राजक्ता मोघे ह्यांनी करून दिला. अध्यक्ष अजित गोखले यांनी पाहुण्यांचे पुषगुच्छ देऊन स्वागत केले. पटवर्धन बाग येथील जेष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांच्या ह्या एकेरी



कॅरम स्पर्धेला सुरुवात झाली असून पुणे शहरांतून ११२ स्पर्धक यात भाग घेत आहेत. स्पर्धा प्रमुख शिरीष जोशी,मुख्य पंच अभय अटकेकर यांचेबरोबर सतीश सहस्रबुद्धे,पंकज कुलकर्णी,माधव तिळगुळकर, सुनील वाघ,रामकुमार ठाकूर हे स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. पहिल्या दिवशी पंकज कुलकर्णी वि वि नंदकुमार झगडे (२२- १५,२५- ८), सुनील शेजवलकर वि वि सुब्रमण्यम अय्यर (१६-१३,२२-६), सतीश सहस्रबुद्धे वि वि माधव देशमुख (१६- ११,९- २६,१४- ७), अजित गोखले वि वि सुभाष चव्हाण (१८- २,१९- ७), मिलिंद रानडे वि वि पद्माकर मेढेकर (१४-११,१३-१२), माधव तिळगुळकर वि वि अलकनंदा भानू ( २५-०,२५-०), शुभदा गोडबोले वि वि भारती आगाशे (१७- ५,१७- ७), शिरीष जोशी वि वि हेमा मांडके (९- १४,२१- ६,१६-५) वसंत रत्नपारखी वि वि अरविंद देशपांडे ( २२- ४,२०- ४) सुनील वाघ वि वि मकरंद बेहरे (२१- ०,२१- ०) यांनी आपल्या प्रतिस्पर्धींना हरवून पुढच्या फेरीत प्रवेश केला.

#रा